REGISTERED N.N. 4

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह............२ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास...................२ आणे

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत....१ रु.
दर ओळीस...........८।०६
दुसरे खेपेस...............८।

Mofussal ... ... ... 2/ With postage
All Subscriptions to be paid in advance
Single copy ......................... 2 as

Advertments
Below 10 lines ... ... 2 Rs
P[illegible] 10 ... ... 3 [illegible]
Repetitions Per line...2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXIX AKOLA MONDAY 6 FEBRUARY 1905 NO 6

वर्ष ३९ आकोला सोमवार तारीख ६ माहे फेब्रुवारी सन १९०५ इ० अंक ६

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं माझ्या बापाच्या वृद्धापकाळामुळें व मतीभ्रंशामुळें मी सर्व जिन्नगीची व्यवस्था करीत असतो व त्यांस कोणत्याही प्रकारें इस्टेटी संबंधाची देवघेव करण्याचा अधिकार व कर्तव्यगारी नाहीं. जो कोणी माझा बाप नामें लक्ष्मण पाटील यांच्याशीं इस्टेटी संबंधाची देवघेव करील तो फसेल. ती देवघेव इस्टेटीला लागू पडणार नाहीं. कळावें तारीख २९ जानेवारी १९०५ इसवे.

सही
रामजी बल्लद लक्ष्मण पाटील
राहणार लाखनवाडा
निशाणीं वखर

---

**हवेंत चालणारी सायकल**— अमेरिकेंत वाशिंग्टन येथें एका शोधकानें हवेंत भ्रमण करणारी एक सायकल तयार केली आहे. तीमुळें हवेंत आपल्या इच्छेप्रमाणें उडतां येतें. सायकलप्रमाणें हिला पायांनीं चालवावें लागतें.

**केवढी ही थंडी**—अमेरिकेंत इतकी थंडी आहे कीं, त्या शहरापासून चार कोसांवर असलेल्या सराधणें गावच्या तलावाचे पाणी गोठून त्याचें बर्फ बनलें.

**हिऱ्याचें सिंव्हासन**—इराणच्या बादशहाच्या हॉलमध्यें त्याचें स्वताचें जें सिंव्हासन आहे तें लांकडी असून त्यांस हिरे, मोती, माणिक वगैरे जवाहिर फारच सुंदर बसविलें असून त्याची किंमत दीडकोट रुपये आहे. आणि त्याच दालनांत गालिच्या आहे ता नुसत्या मोत्यानें भरलेला आहे त्यामुळें त्याच्या खालचा मखमालीचा भाग अगदीं दिसत नाहीं.

**वकिलासाठा सरक्यूलर**—वकिलांची फी दाव्याच्या रकमेवर आकारण्यांत येत असल्यामुळें श्रमाचा योग्य मोबदला त्यांना मिळावा तसा मिळत नाहीं तो मिळावा म्हणून यापुढें दाव्याच्या माल मतेच्या किंमतीवर वकिलांची फी आकारीत जावी असें हायकोर्टानें हल्लीं सरक्युलर काढलें आहे.

कलकत्याचे प्रसिद्ध बाबू देवेंद्रनाथपाल यांनीं हिंदु धर्माचा इतिहास लिहिला आहे. या त्यांच्या कामगिरीबद्दल श्री. सयाजीराव महाराज यांनीं उदारपणें त्यांस १९०० रुपयांची देणगी दिली आहे.

## जपानचे महात्मे

( मागील अंकावरून पुढें. )

श्रीबुद्धापासून जसें धार्मिक शिक्षण जपानी लोकांना मिळालें त्याचप्रमाणें राजकीय शिक्षणाचा पाया शिंटो यांनीं घातला. श्रीसमर्थ रामदासांनीं श्रीशिवाजीच्या कारकिर्दींत जी महत्वाची कामगिरी आपल्या इकडे बजावली तीच शिंटो यांनीं जपानांत बजाविली. साधारणतः शिपाईगडी अति बेपर्वा असावयाचे पण शिंटोच्या राजकीय शिक्षणानें त्याना स्वराजनिष्ठ बनविलें व पूर्वजाविषयीं व आपले कुळाविषयीं पूर्ण अभिमान त्यांचे हृदयांत जागृत केला. शिंटो हा मुख्यतः प्रयत्न वादी होता असें म्हटलें तरी चालेल शिंटोच्या मतांत सृष्टिपूजेचें प्राधान्य आहे व तीं लोकांत प्रचलित झाल्यामुळें सृष्टींतील ज्या ज्या वस्तु आपण आपणाभोंवतीं पाहतों त्या सर्वांबद्दल त्यांचे मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला व अर्थात् पर्यायानें स्वदेश प्रीतीचें बीज रुजलें. ज्या ज्या ठिकाणीं पूर्वी मोठमोठ्या गोष्टी घडल्या व पुराण पुरुष नांदले तीं ठिकाणें अती पावन आहेत असें जपानी लोक समजतात व त्याबद्दल कोणी तिरस्कारबुद्धि दाखविल्यास त्यांच्या अंगाचा तिळपापड होऊन जातो. हें शिंटोचेंच शिक्षण होय व त्यामुळें त्यांना पूर्वजा विषयीं अभिमान व राजाविषयीं पूज्य बुद्धि फार वाटते.

महामुनि बुद्धाकडून जपानला धार्मिक शिक्षण मिळालें, शिंटोनें त्यानां राजकीय वळण लावलें व नैतिक गोष्टीचें ज्ञान करून देण्याचें श्रेय कन्फ्युशियस व मेनशियस यांनीं घेतलें. सुवासिक पुष्प एकीकडे पडलें असलें तरी त्याचा परिमळ सर्व घरभर पसरतो. तसेंच मोठीं माणसें कोणत्याही एका देशांत असलीं तरी तीं कीर्तिरुपानें सर्व देशांत वास करीत असतात. त्या प्रमाणेंच कन्फ्युशियस याची गोष्ट आहे. कन्फ्युशियस जरी चीनदेशस्थ होता तरी त्याचीं उपदेशपर वाक्यें जपानी लोकांचा हृदयावर वज्रलेपाप्रमाणें कायमचीं बठलीं होतीं. आपण ज्या कुळांत जन्म घेतला त्यांतील आपले नातलग व समाजांतील इतर लोक यांचा आपला संबंध काय व त्यांच्या संबंधीं आपलीं काय काय कर्तव्यें आहेत हें ज्ञान कन्फ्युशिअसच्या शिक्षणापासून जपानी लोकांना प्राप्त झालें एकाच कन्फ्युशियसच्या उपदेशा पासून आईबापावर प्रेम करणें आपलें आद्य कर्तव्य आहे असा धडा चीन देशानें घेतला व राजा वरील प्रेमास जपानांत अग्रस्थल मिळालें.

कन्फ्युशिअस व मेनासिअस यांच्या शिक्षणापासून जपानी लोकांच्या अंगीं नीतीचीं तत्वें इतकीं खिळून गेलीं आहेत कीं, चित्तवृत्ती ज्यावेळीं अनावार होण्याचा प्रसंग येता त्या वेळीं सुद्धां ते आपली नीतिमत्ता सोडीत नाहींत. रशियन सेनानायक क्युरोपाट्किन यांनीं सुद्धां ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केलेली आहे व त्याचें मूळ कन्फ्युशिअस व मेनाशिअस यांच्या शिक्षणांतच आहे. परोपकारानें सर्व जग आपलेसें करून घेतां येईल हें मेनशिअसचें बळकट तत्व आहे. परोपकारानें सर्व अडचणी दूर करतां येतात. आपल्या इकडील म्हण

" अपकारिषु यः साधुः "
" स साधुः सद्भि रुच्यत "

ही याच मासल्याची आहे. हें सामाजिक नीतीचें उदात्त तत्व मानण्यास हरकत नाहीं. पण तीच गोष्ट राष्ट्रनीतीला लागूं केली असतां विघातक होईल म्हणून कन्फ्युशिअसनें 'जशास तसें, हा धडा आपले लोकांस घालून दिला व तो जपानी लोक पूर्णपणें गिरवीत आहेत किंवा कसें याचा आपणच विचार करावा. शांति व सहनशीलता या गुणाची मेनशिअसनें फार तारीफ केली आहे क्षुल्लक कारणावरून आकांड तांडव करणें शाहण्या मनुष्यास शोभत नाहीं असें यांचें मत आहे. स्वतःच्या मानापमाना बद्दल मनुष्यानें काळजी न वाहतां राष्ट्रिय अगर सामाजिक मानहानी बद्दल राग येणें हे स्वाभिमानाचें लक्षण होय असें ते समजतात. जपानी महापुरुष वांग यंगमन यानीं पूर्ण ज्ञान व सदाचार यांच्या मधील एक वाक्यता लोकांच्या मनावर पूर्णपणें बिंबविली. हे गृहस्थ जरी चीन देशांत राहणारे असत तरी यांच्या उपदेशामृताचा आस्वाद जपानी लोक मुबलक घेत आहेत, व हीं मतें आपल्या इकडील मतांशीं पुष्कळ अंशीं जुळतात. त्यांच्या म्हणण्या प्रमाणें मनुष्याच्या बुद्धीला अग्राह्य अशी कोणतीच गोष्ट नाहीं. वांगयंगमिंग या तत्ववेत्याच्या शिक्षणापासून जपानी लोकांच्या स्वभावांत समता हा विशेष गुण आज आपणांस दिसत आहे.

ओगसवारा व मासामुने ह्या गृहस्थांची जोडी फार शिष्टाचार संपन्न होती. शिष्टाचारा प्रमाणें वर्तन केलें असतां मनुष्याच्या वृत्तींत एक प्रकारचा भारदस्तपणा व गांभीर्य येतें व त्यामुळें दुसऱ्या कितीही उच्छृंखल मनुष्यांशीं आपली गांठ पडली तर त्याजकडून आपला मानभंग होण्याची भीति नसते. तथापि शिष्टाचार संपन्नतेचा अतिरेक म्हणजे जवळ जवळ असत्याचरण करण्या सारखेंच होय असें मासामुने यानीं सांगून शिष्टाचार मर्यादित केला. शिष्टाचार इतका दाखवावा कीं, त्यामध्यें सत्याचा लोप होऊं देऊं नये.

जपानच्या मोठेपणास जे कांहीं थोडे देशभक्त कारणीभूत झाले आहेत त्यांत योशिडा शोईन हे आहेत. देशाचें हित अमक्या गोष्टींत आहे हें एकदां कळून आलें म्हणजे ती घडवून आणण्यांत मरण आलें तरी त्यास न जुमानणाऱ्या गृहस्थांपैकीं हे एक होत. देशकार्याच्या पायीं या विचाऱ्यास खरोखरच फाशीं जावें लागलें. अनेक पिढ्यापासून मिळालेल्या शिक्षणाप्रमाणें स्वदेशसेवा करीत असतां जर त्यांत अंतर पडूं लागलें तर त्यापेक्षां मरण बरें असें वाटणारे व त्याऐवजीं मरण पतकरणारे पुरुष ज्या देशांत निपजतात तो देश धन्य होय व असे पुरुष जों पर्यंत देशांत वास करीत असतात तों पर्यंत. त्या देशास निकृष्टावस्था कोठून शिवणार ?

हल्लींच्या युद्धांतील सुप्रसिद्ध वीर ओकू, येगो, क्युरोकी वगैरे लोकांचीं नांवें व त्यांचा हृदयंगम इतिहास यापुढें सांगण्यांत येणार म्हणून पुष्कळ मंडळी उत्कंठापूर्वक वाट पाहात असतील. पण नाहीं. हे पुरुष जरी मोठ्या पदवीचे व सन्मानाला अगदीं लायक आहेत तरी ते जी देशसेवा हल्लीं बजावीत आहेत ती बुद्ध, शिंटो, कन्फ्युशिअस व मेनशियस वगैरे महात्म्यांनीं केलेल्या कामाच्या पासंगाला सुद्धां लागणारी नाहीं. देश जिंकण्याचें काम निराळें आहे. तें ज्या जवळ अति भडाका उडवून देणारा दारुगोळा व तीक्ष्ण धारेचीं शस्त्रें असतील त्यास सहज करतां येण्यासारखें आहे. पण लोकांमध्यें सुविचारांचा प्रसार करून त्यांनां अज्ञानांधःकारांतून काढण्याचा अधिकार फार थोड्याच लोकांना पोचतो. तलवार ही राज्यें मिळविण्यास फार तर उपयोगी पडेल पण तीं तिच्या बळावर चिरस्थाई कधींही होणार नाहींत. असें असतें तर अलेक्झांडर, औरंगजेब, जुलियस सीझर व नेपोलियन बोनापार्ट, शिकंदर सारख्या योद्ध्यांनीं केलेल्या पराक्रमाची इतिश्री त्यांच्या मरणाबरोबरच कां व्हावी! ज्या पुरुषांचीं नांवें उच्चारलीं असतां सर्व जपानी राजमंडळ उठून उभें राहतें ते पुरुष थोर नव्हत असें कोण म्हणेल पण ह्या थोडक्यांत वर्णन केलेल्या महात्म्यांचीच महती जास्त आहे इतकेंच सांगावयाचें.

संपूर्ण.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध २ शके १८२६

## नवें वातावरण

आमच्या प्रांताचें राजकीय वातावरण बदललें आहे. मध्यप्रांताचा अंमल हळूं हळूं दृढ होत चाललों असून त्याच्या बरोबर आमच्या संबंधीहि नव्या बनत चालल्या आहेत. सध्यां अलिशान नामदार चीफ कमिशनर सर लेली साहेब हे पश्चमाळ जिल्ह्यांत फिरत असून येत्या सोमवारी साहेब बहादुरांचा मुक्काम येथें व्हावयाचा आहे. साहेब बहादुरांच्या या सफरीचा हेतु असा सांगतात कीं, येथील वस्तुस्थितीचें निरिक्षण स्वतां करावें, नव्या राज्यकारभाराच्या वाटाघाटी विषयीं लोकमत समजून घ्यावें आणि आपल्या संकेताप्रमाणें नवीन अंमलांतील भावी फेरफारांची दिशा लोकांस दाखवून द्यावी. भावी फेरफारांविषयीं नाना लोकवार्ता प्रसृत आहेत आणि त्यांतील पुष्कळशा गोष्टी लवकरच अंमलांत येतील असें ह्मणतात. याच धोरणानें आमच्या स्थानिक सरकाराचे श्रेष्ठ अधिकारी सध्यां या प्रांतांत फिरत आहेत. या फिरतीचा लाभ बहुत प्रकारांनीं होण्यासारखा आहे पण सरकारानें आपल्या अंतःकरणाचा दरवाजा लोकांसाठीं खुला केला पाहिजे. अंमलांत येणाऱ्या गोष्टी हुकुमाच्या वाक्यावलीमध्यें प्रकाशित होण्यापूर्वी त्या लोकसमुहापुढें अगोदर मांडण्यांत याव्यात असा आमचा मनोरथ आहे. सरकारि गोष्टी अशा गुप्ततेनें चालतात कीं त्यांचा स्फोट होणें हें देखील कायद्यानें गुन्ह्याच्या कलमाखालीं आणून सोडलें आहे तेव्हां कोणतीही गोष्ट सरकाराच्या द्वारानें प्रसिद्धीस येण्यापूर्वी त्याबद्दल लोकांस चर्चा करण्याचा अधिकार मिळेल तर मुख्य सरकारच्या मुलाखतीचा लाभ लोकांस फारच मोठा होईल. लोकांची इच्छा सरकारच्या संनिध जाण्याची मोठी बळवत्तर आहे पण त्या इच्छेचें साफल्य होण्यापूर्वी सरकारानें प्रजेला आपल्या सानिध्यांत घेतलें पाहिजे. नवें राजकीय वातावरण आमच्या प्रांतांत आल्यापासून आह्मांस आमचा स्वतंत्रपणा गेला असें वाटूं लागलें आहे. प्रांत लहान खरा पण तो स्वतंत्र, पृथक् व वेगळा होता. आतां मध्यप्रांतांत त्याचा समावेश झाल्यामुळें मनाला चुकल्या चुकल्या सारखें वाटतें पण पुष्कळशा गोष्टी अधिक सुखकारक होतील अशी आशा आहे. नवीन अंमल सुरूं आहे तेव्हां लोकांस अनुकूल करून घेऊन नवीन फेरफार करण्यांत येतील असें धोरण आमच्या स्थानिक सरकारानें ठेवावें असें आह्मी विनयपूर्वक सुचवितों.

या नव्या अंमलाचा पहिला तडाखा नकम ल्यासेन्सच्या रूपानें लोकांस पारच जाणवला आहे. हा कर सर्वैव त्याज्य आहे आणि या संबधांत आमच्या प्रांताला हा कर लागू करण्यासारखा नाहीं असें आह्मीं वस्तुस्थिती सरकारा पुढें मांडून कळविलें होतें. पण लोकांच्या विनंतीला मान कांहींच मिळाला नाहीं इतकेंच नाहीं तर त्या बाबदींत लोकांची समजूत घालण्याचा प्रयत्न देखील सरकारांतून होऊं नये ही गोष्ट बरी नव्हे हें आह्मी मुद्दाम निर्दिष्ट करीत आहों. अशा प्रकारची अवहेलना पुनः होऊं नये, लोकांच्या विनंतीला निदान दोन गोड शब्दांचा तरी मान मिळावा आणि नंतर सरकारानें आपला अंमल झपाट्यानें चालूं करावा असें आमचें आग्रहपूर्वक ह्मणणें आहे.

## लोकवार्ता

लोकवार्ता छापण्याचा मतलब इतकाच कीं, भावी गोष्टी विषयीं लोकांस तर्क वितर्क करीत बसण्यास पुष्कळशी संधि मिळावी. पहिल्या एप्रिल पासून सहा जिल्ह्यांचे चार जिल्हे होणार आहेत आणि ही बातमी नव्या अंमलाच्या प्रारंभापासून दुमदुमत आहे तेव्हा तिची सत्यता अनुभवास येण्याचा काळ समीप आला आहे हें निश्चित दिसतें. मुलकी व न्यायखातें या दोन शाखा मध्यें मोठ्या उलथापालथी व्हावयाच्या आहेत. चार जिल्हे झाले, तालुक्यांची रचना काय ती पक्की ठरली व जिल्ह्यांच्या वर्गवारीनें त्यांची विल्हेवारी लागली ह्मणजे आमच्या प्रांताचा राजकीय भूगोलच निराळा लिहावा लागेल. मुलकी अदलाबदलींच्या धोरणानें न्यायकोर्टांची स्थापनाहि नवीजुनी होणार आहे. किंबहुना, मुलकीच्या मागोमागच न्यायखात्याच्या फेरफाराविषयीं हुकूम सुटतील असा अंदाज आहे. दिवाणी व फौजदारी कोर्टांचीं स्थळें बदलण्यांत येतील त्यांच्या अधिकारांच्या पायऱ्या लहान मोठ्या करण्यांत येतील व कांहीं प्रस्तुतचीं कोर्टें बंदही करावीं लागतील. सध्यां या भावीं चळवळी कडे लोकांची दृष्टी विशेष लागली आहे. उमरावतीचें हायकोर्ट बंद होणार असून नागपुराच्या हायकोर्टाकडे सर्व अष्टाधिकार सोंपविण्यांत येतील असेंही पक्कें आहे अशी बोलवा आहे. पूर्व वऱ्हाडाला एक डिव्हिजन सेशन कोर्ट व पश्चिम वऱ्हाडाला एक डिव्हिजन सेशन कोर्ट अशी योजना सध्यांच अंमलांत आली आहे. फक्त दोन्ही सेशन जज्ज उमरावतीस आपल्या अदालती भरवीत असतात तर त्यांची फांटाफूट होऊन एक अदालत कायमचें आकोल्यास स्थापित व्हावयाचें आहे. जिल्ह्यानिहाय सेशन कचेरि भरून तेथेंच सेशनचे फौजदारी खटले चालविण्यांत यावेत अशाविषयीं हुकूम सुटले आहेत मुलकी व न्यायखातें हीं दोन्ही मध्यप्रांताच्या खात्यांत नीटशी सामील झाली ह्मणजे नवीन अंमलाची वहिवाट पूर्णतेला पोचली असें होईल.

## गदा

आह्मांवर आलेल्या नव्या अंमलानें आकोल्याच्या हायस्कुलावर गदा बसणार आहे असें ह्मणतात. येथील हायस्कूल मोडून वऱ्हाडासाठीं एकच सरकारी हायस्कूल उमरावतीस ठेवावें असा विचार दिसतो. येथील हायस्कूल बंद होणार आहे ही बातमी देखील आमच्या मनाला धक्का देते ही गोष्ट आह्मांस आवडणार नाहीं तरी पण असें दुष्ट वर्तमानच खरें होण्याचा मोठा संभव दिसत आहे. मिडल स्कूलस मात्र मोठी होणार असून त्यांत जुन्या ९ वे इयत्ते पर्यंतचे अभ्यास शिकविण्यांत येतील. मिडल स्कुलासाठीं जी नवी इमारत व्हावयाची आहे तेथें विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होणार आहे. शालागृह व वसतिगृह हीं दोन्ही एकाच स्थळीं ठेवून त्यांची देखरेख शिक्षकाकडे देण्यांत येईल इतकेंच नाहीं तर शिक्षकाची राहण्याची सोयही त्याच इमारतींत करावयाची आहे. ही मिडल स्कुलाची योजना फार नामी आहे. पण या योजनेनें हायस्कूल बंद केल्यामुळें होणारि अडचण नाहींशी होण्याचा संभवच नाहीं कोणतेंच हायस्कूल बंद होऊं नये अशी सर्वांची मूळ इच्छा आहे. पण दोन हायस्कुला पैकीं एकच सरकारास ठेवावयाचें असेल तर उमरावतीचेंच हायस्कूल बंद केल्यास चालण्या सारखें आहे. उमरावतीस खानगी हायस्कूल आहे, त्याची उत्तरोत्तर भरभराट होत आहे व या संस्थेकडे तेथील सरकारि हायस्कुलांतील वर्गाची बदली करून दिली तरी त्या पासून चांगलाच फायदा होईल. सरकारी पद्धतीवर खानगी हायस्कूल चालविण्यासाठीं सरकारानें आपली मदत चांगली दिली ह्मणजे उमरावतीचें खानगी हायस्कूल उत्कृष्टपणें चालेल. आकोल्यास खानगी हायस्कूल स्थापित होण्याचा संभव फार कमी आहे तेव्हां अशा स्थितींत लोकांच्या गरजा लक्ष्यांत आणून येथील हायस्कूलच मोठें टॉलेजंग करण्याविषयीं हुकूम होईल तर ही गोष्ट लोकांस फार फार आवडेल असें आह्मांस वाटतें.

## औद्योगिक शाळा

उमरावतीस औद्योगिक शाळा स्थापणाचा स्थानिक सरकारचा संकल्प इंडिया सरकारास पसंत पडला आहे असें कळतें. ही शाळा नांव घेण्यासारखी होईल व तेथील अभ्यासक्रमही मध्यप्रांताच्या मोठेपणाला शोभेल असा ठेवण्यांत येणार आहे. या संस्थेला अजरामरत्व आणणारें नामाभिधान द्यावयाचें ठरलें आहे. कैलासवासी व्हिक्टोरिआ यांच्या पवित्र नामानें ' व्हिक्टोरिआ टेक्निकल स्कूल ' या संज्ञेमध्यें या संस्थेची श्री चिरकाल नांदेल व त्या श्रीचा उत्कृष्ट लाभ आमच्या प्रांताला मिळणार आहे ही परम संतोषाची गोष्ट होय. व्हिक्टोरिआ स्मारक-फंडाचा विनियोग या कार्याकडे होत आहे आणि ही खर्चाची दिशा त्या कार्याच्या महत्वामुळें लोकमान्य व राजमान्य झालेली आहे. या शाळेला ३० हजार रुपये इंडिया सरकार देणगी ह्मणून देणार असून कायमच्या उत्पन्नासाठीं ११ हजार रुपयांची देणगी देणार आहेत. ही सरकारी कृपेची अमृतवृष्टी खरी, पण आह्मी ह्मणतों कीं आमच्या प्रांतावर जो इनकम-ल्यायस नवीन बसला आहे हा जर सरकारानें माफ न करितां औद्योगिक शाळेकडे समर्पण केला तर आह्मी वरील देणग्या देखील मागणार नाहीं. परंतु ही मागणी सरकाराला रुचण्यासारखी नाहीं, हें निराळें सांगावयाला नको. या शाळेंत कापसाच्या कारखान्यांत लागणारें यांत्रिक कलाशिक्षण देण्याचा विचार केलेला आहे आणि तो फार चांगला असून सर्वमान्य आहे. एकंदरीनें औद्योगिक शिक्षणासंबंधानें सध्यां कांहीं तरी चळवळ चालली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.

## अपूर्व योग

( ब्रह्मवेत्ती बेझंट बाई यांचीं व्याख्यानें )

तुकाराम बोवा ह्मणतात कीं, साधुसंत आपल्या घराला येतात तेव्हां तोच दिवस दसरादिवाळीचा समजला पाहिजे. अशी महोत्सवाची दिवाळी येत्या आठवड्यांत आकोल्यास होणार आहे. दीपोत्सव बाह्यदृष्टीला आनंद देणारा असतो पण या बाईच्या सुश्राव्य, मनोहर व हृदयंगम व्याख्यानांनीं अंतर्दृष्टीला परम आल्हाद होईल. यांच्या संभाषणानें ब्रह्मविद्येची गोडी लागेल असें आह्मांस वाटतें. ब्रह्मविद्येंत या बाई मुख्य गुरुमुख आहत असें ह्मटलें तरी चालेल. यांचीं व्याख्यानें इंग्रजींत होणार आहेत हा एक मोठा कमीपणा होय. तथापि इंग्रजी भाषा जाणणाऱ्या लोकांनीं ही संधी अवश्य साधावी आणि त्यांच्या संभाषणाचा लाभ करून घ्यावा इतकेंच नाहीं तर या श्रीमती बाई सारखी परम पूज्य मूर्ती इंग्रजी विषयीं अनभिज्ञ असलेल्या गृहस्थांनीं देखील जरूर पाहावी. यांची वाणी फार गंभीर, सुनृता व मोहक आहे. यांचें वक्तृत्व अलौकिक आहे आणि यांच्यावर सरस्वतीचा कृपाप्रसाद पूर्ण असून अध्यात्म विद्या त्यांस करतलमलका प्रमाणें अवगत आहे; किंबहुना हल्लीं जो ' थिऑसाफिकल पंथ ' ह्मणून सर्वत्र गजत आहे त्याच्या या अधिष्ठात्री देवता आहेत आणि बनारसच्या हिंदु काॅलेजाच्या मुख्य आधारस्तंभ आहेत. श्रोतृजनांनीं असा हा अपूर्व योग साधावा ह्मणून आह्मी दुसरीकडे सर्व सूचीपत्र निराळें छापलें आहे.

## युद्धकांड.

युद्धाचा पर्वकाळ लागल्या पासून सर्व लोक रुसो-जपानी युद्धाचे चांगले चांगले अध्याय काढून त्यांचें पठण व श्रवण मोठ्या उत्कंठेनें करीत असतात. पोर्टआर्थरचा गोड अध्याय संपला नाहीं तोंच त्यांनीं रशियांतील बंडाच्या अपूर्व अध्यायास प्रारंभ केला. रशियामध्यें येन केन कारणानें लोकांच्या असंतोषवृत्तीची जी भयंकर ज्वाळा

किरकोळ अंकास..................२ आणे

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत....१ रु.
दर ओळीस...........८१०६
दुसरे खेपेस..............८१

Single copy ............................ 2 as
Advertments
..................................... 2 as
Repetitions Per line...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXIX AKOLA MONDAY 6 FEBRUARY 1905 NO 6

वर्ष ३९ आकोला सोमवार तारीख ६ माहे फेब्रुवारी सन १९०५ इ० अंक ६

### जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं माझ्या बापाच्या वृद्धापकाळामुळें व मतीभ्रंशामुळें मी सर्व जिवगीची व्यवस्था करीत असतां व त्यांस कोणत्याही प्रकारें इस्टेटी संबंधाची देवघेव करण्याचा अधिकार व कर्तबगारी नाहीं. जो कोणी माझा बाप नामें लक्ष्मण पाटील यांच्याशीं इस्टेटी संबंधानी देवघेव करील तो फसेल. ती देवघेव इस्टेटीला लागूं पडणार नाहीं. कळावें तारीख २९ जानेवारी १९०५ इसवे.

सही
रामजी वल्द लक्ष्मण पाटील
राहणार लाखनवाडा
निशाणी बखर

हवेंत चालणारी सायकल— अमेरिकेंत वाशिंग्टन येथें एका शोधकानें हवेंत भ्रमण करणारी एक सायकल तयार केली आहे. तीमुळें हवेंत आपल्या इच्छेप्रमाणें उडतां येतें. सायकलप्रमाणें हिला पायांनीं चालवावें लागतें.

केवढी ही थंडी—अल्जिरियाकडे इतकी थंडी आहे कीं, त्या शहरापासून चार कोसांवर असलेल्या सगाथणें गावच्या तलावाचें पाणी गोठून त्याचें बर्फ बनलें.

हिऱ्याचें सिंहासन —इराणच्या बादशहाच्या हॉलमध्यें त्यांचें स्वतांचें जें सिंव्हासन आहे तें लांकडी असून त्यांस हिरे, मोती, माणिक वगैरे जवाहिर फारच सुंदर बसविलें असून त्याची किंमत दीडकोट रुपये आहे. आणि त्याच दालनांत गालिच्या आहे ता जुमत्या मोत्यानें भरलेला आहे त्यामुळें त्याच्या खालचा मखमालीचा भाग अगदीं दिसत नाहीं.

वकिलासाठा सरक्युलर—वकिलांची फी दाव्याच्या रकमेवर आकारण्यांत येत असल्यामुळें श्रमाचा योग्य मोबदला त्यांना मिळावा तसा मिळत नाहीं तो मिळावा म्हणून यापुढें दाव्याच्या माल मतेच्या किंमतीवर वकिलांची फी आकारित जावी असें हायकोर्टानें हल्लीं सरक्युलर काढलें आहे.

कलकत्त्याचे प्रसिद्ध बाबू देवेंद्रनाथपाल यांनीं हिंदु धर्माचा इतिहास लिहिला आहे. या त्यांच्या कामगिरीबद्दल श्री. सयाजीराव महाराज यांनीं उदारपणें त्यांस १९०० रुपयांची देणगी दिली आहे.

### जपानचे महात्मे

( मागील अंकावरून पुढें. )

श्रीबुद्धापासून जसें धार्मिक शिक्षण जपानी लोकांना मिळालें त्याचप्रमाणें राजकीय शिक्षणाचा पाया शिंटो यांनीं घातला. श्रीसमर्थ रामदासांनीं श्रीशिवाजीच्या कारकिर्दीत जी महत्वाची कामगिरी आपल्या इकडे बजावली तीच शिंटो यांनीं जपानांत बजाविली. साधारणतः शिपाईगडी अति बेपर्वा असावयाचे पण शिंटोच्या राजकीय शिक्षणानें त्यांना स्वराजनिष्ठ बनविलें व पूर्वजांविषयीं व आपले कुळाविषयीं पूर्ण अभिमान त्यांचे हृदयांत जागृत केला. शिंटो हा मुख्यतः प्रयत्न वादी होता असें ह्मटलें तरी चालेल शिंटोच्या मतांत सृष्टिपूजेचें प्राधान्य आहे व ती लोकांत प्रचलित झाल्यामुळें सृष्टींतील ज्या ज्या वस्तु आपण आपणाभोंवतीं पाहतों त्या सर्वांबद्दल त्यांचे मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला व अर्थात् पर्यायानें स्वदेशप्रीतीचें बीज रुजलें. ज्या ज्या ठिकाणीं पूर्वी मोठमोठ्या गोष्टी घडल्या व पुराण पुरुष नांदले तीं ठिकाणें अती पावन आहेत असें जपानी लोक समजतात व त्याबद्दल कोणी तिरस्कारबुद्धि दाखविल्यास त्यांच्या अंगाचा तिळपापड होऊन जातो. हें शिंटोचेंच शिक्षण होय व त्यामुळें त्यांना पूर्वजा विषयीं अभिमान व राजाविषयीं पूज्य बुद्धि फार वाटते.

महामुनि बुद्धाकडून जपानला धार्मिक शिक्षण मिळालें, शिंटोनें त्यांना राजकीय वळण लावलें व नैतिक गोष्टीचें ज्ञान करून देण्याचें श्रेय कन्फ्युशियस व मेनशियस यांनीं घेतलें. सुवासिक पुष्प एकीकडे पडलें असलें तरी त्याचा परिमळ सर्व घरभर पसरतो तसेंच मोठीं माणसें कोणत्याही एका देशांत असलीं तरी तीं कीर्तिरूपानें सर्व देशांत वास करीत असतात. त्या प्रमाणेंच कन्फ्युशियस याची गोष्ट आहे. कन्फ्युशियस जरी चीनदेशस्थ होता तरी त्याचीं उपदेशपर वाक्यें जपानी लोकांचे हृदयावर वज्रलेपाप्रमाणें कायमचीं वठलीं होतीं. आपण ज्या कुळांत जन्म घेतला त्यांतील आपले नातलग व समाजांतील इतर लोक यांचा आपला संबंध काय व त्यांच्या संबंधीं आपलीं काय काय कर्तव्यें आहेत हें ज्ञान कन्फ्युशिअसच्या शिक्षणापासून जपानी लोकांना प्राप्त झालें एकाच कन्फ्युशियसच्या उपदेशा पासून आईबापावर प्रेम करणें आपलें आद्य कर्तव्य आहे असा धडा चीन देशानें घेतला व राजा वरील प्रेमास जपानांत अग्रस्थान मिळालें

कन्फ्युशिअस व मेनशिअस यांच्या शिक्षणापासून जपानी लोकांच्या अंगीं नीतीचीं तत्वें इतकीं खिळून गेलीं आहेत कीं, चित्तवृत्ती ज्यावेळीं अनाचार होण्याचा प्रसंग येतो त्या वेळीं सुद्धां ते आपली नीतिमत्ता सोडीत नाहींत. रशियन सेनानायक क्युरोपाट्किन यांनीं सुद्धां ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केलेली आहे व त्याचें मूळ कन्फ्युशिअस व मेनशिअस यांच्या शिक्षणांतच आहे. परोपकारानें सर्व जग आपलेसें करून घेतां येईल हें मेनशिअसचें बळकट तत्व आहे. परोपकारानें सर्व अडचणी दूर करतां येतात. आपल्या इकडील ह्मण

" अपकारिषु यः साधुः "
" स साधुः सद्भि रुच्यते "

ही याच मासल्याची आहे. हें सामाजिक नीतीचें उदात्त तत्व मानण्यास हरकत नाहीं. पण तीच गोष्ट राष्ट्रनीतीला लागूं केली असतां विघातक होईल ह्मणून कन्फ्युशिअसनें ' जशास तसें ' हा धडा आपले लोकांस घालून दिला व तो जपानी लोक पूर्णपणें गिरवीत आहेत किंवा कसें याचा आपणच विचार करावा. शांति व सहनशीलता या गुणाची मेनशिअसनें फार तारीफ केली आहे. क्षुल्लक कारणावरून आकांड तांडव करणें शाहण्या मनुष्यास शोभत नाहीं असें यांचें मत आहे. स्वतःच्या मानापमाना बद्दल मनुष्यानें काळजी न वाहतां राष्ट्रीय अगर सामाजिक मानहानी बद्दल राग येणें हे स्वाभिमानाचें लक्षण होय असें ते समजतात. जपानी महापुरुष वांग यंगमन यानीं पूर्ण ज्ञान व सदाचार यांच्या मधील एक वाक्यता लोकांच्या मनावर पूर्णपणें बिंबविली. हे गृहस्थ जरी चीन देशांत राहणारे असत तरी यांच्या उपदेशामृताचा आस्वाद जपानी लोक मुबलक घेत आहेत, व हीं मतें आपल्या इकडील मताशीं पुष्कळ अंशीं जुळतात. त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें मनुष्याच्या बुद्धीला अग्राह्य अशी कोणतीच गोष्ट नाहीं. वांगयंगमिंग या तत्ववेत्याच्या शिक्षणापासून जपानी लोकांच्या स्वभावांत समता हा विशेष गुण आज आपणांस दिसत आहे.

ओगसवारा व मासामुने ह्या गृहस्थांची जोडी फार शिष्टाचार संपन्न होती. शिष्टाचारा प्रमाणें वर्तन केलें असतां मनुष्याच्या वृत्तींत एक प्रकारचा भारदस्तपणा व गांभीर्य येतें व त्यामुळें दुसऱ्या कितीही उच्छृंखल मनुष्यांशीं आपली गांठ पडली तर त्याजकडून आपला मानभंग होण्याची भीति नसते. तथापि शिष्टाचार संपन्नतेचा अतिरेक ह्मणजे नवल नवल असल्याचा ढोंग करण्या सारखेंच होय असें मासामुने

यांनीं सांगून शिष्टाचार मर्यादित केला. शिष्टाचार इतका दाखवावा कीं, त्यामध्यें सत्याचा लोप होऊं देऊं नये.

जपानच्या मोठेपणास जे कांहीं थोडे देशभक्त कारणीभूत झाले आहेत त्यांत योशिडा शोईन हे आहेत. देशाचें हित अमक्या गोष्टींत आहे हें एकदां कळून आलें ह्मणजे ती घडवून आणण्यांत मरण आलें तरी त्यास न जुमानणाऱ्या पुरुषा पैकीं हे एक होत. देशकार्याच्या पायीं या विचाऱ्यास खरोखरच फांशीं जावें लागलें. अनेक विद्यापासून मिळालेल्या शिक्षणाप्रमाणें स्वदेशसेवा करीत असतां जर त्यांत अंतर पडूं लागलें तर त्यापेक्षां मरण बरें असें वाटणारे व त्याऐवजीं मरण पतकरणारे पुरुष ज्या देशांत निपजतात तो देश धन्य होय व असे पुरुष जों पर्यंत देशांत वास करीत असतात तों पर्यंत त्या देशास निकृष्टावस्था कोठून शिवणार ?

हल्लींच्या युद्धांतील सुप्रसिद्ध वीर ओकू, येगो, क्युरोकी वगैरे लोकांचीं नांवें व त्यांचा हृदयंगम इतिहास यापुढें सांगण्यांत येणार ह्मणून पुष्कळ मंडळी उत्कंठापूर्वक वाट पाहात असतील. पण नाहीं. हे पुरुष जरी मोठ्या पदवीचे व सन्मानाला अगदीं लायक आहेत तरी ते जी देशसेवा हल्लीं बजावीत आहेत ती बुद्ध, शिंटो, कन्फ्युशिअस व मेनशियस वगैरे महात्म्यांनीं केलेल्या कामच्या पासंगाला सुद्धां लागणारी नाहीं. देश जिंकण्याचें काम निराळें आहे. तें ज्या नवळ आति भडाका उडवून देणारा दारुगोळा व तीक्ष्ण धारेचीं शस्त्रें असतील त्यास सहज करतां येण्यासारखें आहे. पण लोकांमध्यें सुविचारांचा प्रसार करून त्यांना अज्ञानांधकारांतुन काढण्याचा अधिकार फार थोड्याच लोकांना पोचतो. तलवार ही राज्यें मिळविण्यास फार तर उपयोगी पडेल पण ती तिच्या बळावर चिरस्थाई कधींही होणार नाहींत. असें असतें तर अलेक्झांडर अटिला, जुलियस सीझर व नेपोलियन बोनापार्ट, शिकंदर सारख्या योद्ध्यांनीं केलेल्या पराक्रमाची इतिश्री त्यांच्या मरणाबरोबरच कां व्हावी! ज्या पुरुषांचीं नांवें उच्चारलीं असतां सर्व जपानी राष्ट्र मंडळ उठून उभें राहतें ते पुरुष थोर नव्हत असें कोण ह्मणेल पण मी येथें ज्यांत वर्णन केलेल्या महात्म्यांचीच महती ज्यास्त आहे इतकेंच सांगावयाचें.

संपूर्ण.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध २ शके १८२६

## नवें वातावरण

आमच्या प्रांताचें राजकीय वातावरण बदललें आहे. मध्यप्रांताचा अंमल हळूं हळूं दृढ होत चालला असून त्याच्या बरोबर आमच्या संवयीहि नव्या बनत चालल्या आहेत. सध्यां अलिशान नामदार चीफ कमिशनर सर लेली साहेब हे यवतमाळ जिल्ह्यांत फिरत असून येत्या सोमवारीं साहेब बहादुरांचा मुक्काम येथें व्हावयाचा आहे. साहेब बहादुरांच्या या सफरीचा हेतु असा सांगतात कीं, येथील वस्तुस्थितीचें निरिक्षण स्वतां करावें, नव्या राज्यकारभाराच्या वाटावाटी विषयीं लोकमत समजून घ्यावें आणि आपल्या संकेताप्रमाणें नवीन अंमलांतील भावी फेरफारांची दिशा लोकांस दाखवून द्यावी. भावी फेरफारांविषयीं नाना लोकवार्ता प्रसृत आहेत आणि त्यांतील पुष्कळशा गोष्टी लवकरच अमलांत येतील असें ह्मणतात. याच धोरणानें आमच्या स्थानिक सरकाराचे श्रेष्ठ अधिकारी सध्यां या प्रांतांत फिरत आहेत. या फिरतीचा लाभ बहुत प्रकारांनीं होण्यासारखा आहे पण सरकारानें आपल्या अंतःकरणाचा दरवाजा लोकांसाठीं खुला केला पाहिजे. अशा गोष्टी हुकुमाच्या वाक्यावलीमध्यें प्रकाशित होण्यापूर्वी त्या लोकसमुहापुढें अगोदर मांडण्यांत याव्यात असा आमचा मनोरथ आहे. सरकारि गोष्टी अशा गुप्ततेनें चालतात कीं त्यांचा स्फोट होणें हें देखील कायद्यानें गुन्ह्याच्या कलमाखालीं आणून सोडलें आहे तेव्हां कोणतीही गोष्ट सरकाराच्या द्वारानें प्रसिद्धीस येण्यापूर्वी त्याबद्दल लोकांस चर्चा करण्याचा अधिकार मिळेल तर मुख्य सरकारच्या मुलाखतीचा लाभ लोकांस फारच मोठा होईल. लोकांची इच्छा सरकारच्या संनिध जाण्याची मोठी बलवत्तर आहे पण त्या इच्छेचें साफल्य होण्यापूर्वी सरकारानें प्रजेला आपल्या सानिध्यांत घेतलें पाहिजे. नवें राजकीय वातावरण आमच्या प्रांतांत आल्यापासून आह्मांस आमचा स्वतंत्रपणा गेला असें वाटूं लागलें आहे. प्रांत लहान खरा पण तो स्वतंत्र, पृथक् व वेगळा होता. आतां मध्यप्रांतांत त्याचा समावेश झाल्यामुळें मनाला चुकल्या चुकल्या सारखें वाटतें पण पुष्कळशा गोष्टी अधीक सुखकारक होतील अशी आशा आहे. नवीन अंमल सुरूं आहे तेव्हां लोकांस अनुकूल करून घेऊन नवीन फेरफार करण्यांत येतील असें धोरण आमच्या स्थानिक सरकारानें ठेवावें असें आह्मी विनयपूर्वक सुचवितों.

या नव्या अमलाचा पहिला तडाखा नकम ट्याक्सच्या रूपानें लोकांस लागणार आहे. हा कर सर्वैव त्याज्य आहे आणि या संबधांत आमच्या प्रांताला हा कर लागूं करण्यासारखा नाहीं असें आह्मी वस्तुस्थिती सरकारा पुढें मांडून कळविलें होतें. पण लोकांच्या विनंतीला मान कांहींच मिळाला नाहीं इतकेंच नाहीं तर त्या बाबदींत लोकांची समजूत घालण्याचा प्रयत्न देखील सरकारांतून होऊं नये ही गोष्ट बरी नव्हे हें आह्मी मुद्दाम निर्दिष्ट करीत आहों. अशा प्रकारची अवहेलना पुनः होऊं नये, लोकांच्या विनंतीला निदान दोन गोड शब्दांचा तरी मान मिळावा आणि नंतर सरकारानें आपला अमल झपाट्यानें चालूं करावा असें आमचें आग्रहपूर्वक ह्मणणें आहे.

## लोकवार्ता

लोकवार्ता छापण्याचा मतलब इतकाच कीं, भावी गोष्टी विषयीं लोकांस तर्क वितर्क करीत बसण्यास पुष्कळशी संधि मिळावी. पहिल्या एप्रिल पासून सहा जिल्ह्यांचे चार जिल्हे होणार आहेत आणि ही बातमी नव्या अंमलाच्या प्रारंभापासून दुमदुमत आहे तेव्हा तिची सत्यता अनुभवास येण्याचा काल समीप आला आहे हें निश्चित दिसतें. मुलकी व न्यायखातें या दोन शाखा मध्यें मोठ्या उलथापालथी व्हावयाच्या आहेत. चार जिल्हे झाले, तालुक्यांची रचना काय ती पक्की ठरली व जिल्ह्यांच्या वर्गवारीनें त्यांचा विल्हेवारी लागली ह्मणजे आमच्या प्रांताचा राजकीय भूगोलच निराळा लिहावा लागेल. मुलकी अदलाबदलींच्या धोरणानें न्यायकोर्टांची स्थापनाहि नवीजुनी होणार आहे. किंबहुना, मुलकीच्या मागोमागच न्यायखात्याच्या फेरफाराविषयीं हुकूम सुटतील असा अंदाज आहे. दिवाणी व फौजदारी कोर्टाचीं स्थळें बलदण्यांत येतील त्यांच्या अधिकारांच्या पायऱ्या लहान मोठ्या करण्यांत येतील व कांहीं प्रस्तुतचीं कोडतें बंदही करावीं लागतील. सध्यां या भावीं चळवळी कडे लोकांची दृष्टी विशेष लागली आहे. उमरावतीचें हायकोर्ट बंद होणार असून नागपुराच्या हायकोर्टाकडे सर्व अष्टाधिकार सोंपविण्यांत येतील असेंही पक्कें आहे अशी बोलवा आहे. पूर्व वऱ्हाडाला एक डिव्हिजन सेशन कोर्ट व पश्चिम वऱ्हाडाला एक डिव्हिजन सेशन कोर्ट अशी योनना सध्यांच अमलांत आली आहे. फक्त दोन्ही सेशन जज उमरावतीस आपल्या अदालती भरवीत असतात तर त्यांची फांटाफूट होऊन एक अदालत कायमचें आकोल्यास स्थापित व्हावयाचें आहे जिल्ह्यानिहाय सेशन कचेरी भरून तेथेंच सेशनचे फौजदारी खटले चालविण्यांत यावेत अशाविषयीं हुकूम सुटले आहत मुलकी व न्यायखातें ही दोन्ही मध्यप्रांताच्या खात्यांत नीटशी सामील झाली ह्मणजे नवीन अंमलाची वहिवाट पूर्णतेला पोचली असें होईल.

## गदा

आह्मांवर आलेल्या नव्या अमलानें आकोल्याच्या हायस्कुलावर गदा बसणार आहे असें ह्मणतात. येथील हायस्कूल मोडून वऱ्हाडासाठीं एकच सरकारी हायस्कूल उमरावतीस ठेवावें असा विचार दिसतो. येथील हायस्कूल बंद होणार आहे ही बातमी देखील आमच्या मनाला धक्का देते ही गोष्ट आह्मांस आवडणार नाहीं तरी पण असें दुष्ट वर्तमानच खरें होण्याचा मोठा संभव दिसत आहे. मिडल स्कूलस मात्र मोठी होणार असून त्यांत जुन्या ९ वे इयत्ते पर्यंतचे अभ्यास शिकविण्यांत येतील. मिडल स्कुलसाठीं जी नवी इमारत व्हावयाची आहे तेथें विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होणार आहे. शालागृह व वसतिगृह हीं दोन्ही एकाच स्थळीं ठेवून त्यांची देखरेख शिक्षकाकडे देण्यांत येईल इतकेंच नाहीं तर शिक्षकाची राहण्याची सोयही त्याच इमारतींत करावयाची आहे. ही मिडल स्कुलाची योजना फार नामी आहे. पण या योजनेनें हायस्कूल बंद केल्यामुळें होणारि अडचण नाहींशी होण्याचा संभवच नाहीं कोणतेंच हायस्कूल बंद होऊं नये अशी सर्वांची मूळ इच्छा आहे. पण दोन हायस्कुला पैकीं एकच सरकारास ठेवावयाचें असेल तर उमरावतीचेंच हायस्कूल बंद केल्यास चालण्या सारखें आहे. उमरावतीस खानगी हायस्कूल आहे, त्याची उत्तरोत्तर भरभराट होत आहे व या संस्थेकडे तेथील सरकारि हायस्कुलांतील वर्गाची बदली करून दिली तरी त्या पासून चांगलाच फायदा होईल. सरकारी पद्धतीवर खानगी हायस्कूल चालविण्यासाठीं सरकारानें आपली मदत चांगली दिली ह्मणजे उमरावतीचें खानगी हायस्कूल उत्कृष्टपणें चालेल. आकोल्यास खानगी हायस्कूल स्थापित होण्याचा संभव फार कमी आहे तेव्हां अशा स्थितींत लोकांच्या गरजा लक्ष्यांत आणून येथील हायस्कूलच मोठें टीचिंग करण्याविषयीं हुकूम होईल तर ही गोष्ट लोकांस फार फार आवडेल असें आह्मांस वाटतें.

## औद्योगिक शाळा

उमरावतीस औद्योगिक शाळा स्थापणाचा स्थानिक सरकारचा संकल्प इंडिया सरकारास पसंत पडला आहे असें कळतें. ही शाळा नांव घेण्यासारखी होईल व तेथील अभ्यासक्रमही मध्यप्रांताच्या मोठेपणाला शोभेल असा ठेवण्यांत येणार आहे. या संस्थेला अजरामरत्व आणणारें नामाभिधान द्यावयाचें ठरलें आहे. कैलासवासी व्हिक्टोरिआ यांच्या पवित्र नामानें ' व्हिक्टोरिआ टेक्निकल स्कूल ' या संज्ञेमध्यें या संस्थेची श्री चिरकाल नांदेल व त्या श्रीचा उत्कृष्ट लाभ आमच्या प्रांताला मिळणार आहे ही परम संतोषाची गोष्ट होय. व्हिक्टोरिआ स्मारक-फंडाचा विनियोग या कार्याकडे होत आहे आणि ही खर्चाची दिशा त्या कार्याच्या महत्वामुळें लोकमान्य व राजमान्य झालेली आहे. या शाळेला ३० हजार रुपये इंडिया सरकार देणगी ह्मणून देणार असून कायमच्या उत्पन्नासाठीं ११ हजार रुपयांची देणगी देणार आहेत. ही सरकारी कृपेची अमृतवृष्टी खरी, पण आह्मी ह्मणतों कीं आमच्या प्रांतावर जो इनकम-ट्याक्स नवीन बसला आहे हा जर सरकारानें माफ न करितां औद्योगिक शाळेकडे समर्पण केला तर आह्मी वरील देणग्या देखील मागणार नाहीं. परंतु ही मागणी सरकाराला रुचण्यासारखी नाहीं, हें निराळें सांगावयाला नको. या शाळेंत कापसाच्या कारखान्यांत लागणारें यांत्रिक कलाशिक्षण देण्याचा विचार केलेला आहे आणि तो फार चांगला असून सर्वमान्य आहे. एकंदरीनें औद्योगिक शिक्षणासंबंधानें सध्यां कांहीं तरी चळवळ चालली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.

## अपूर्व योग

( ब्रह्मवेत्ती बेझंट बाई यांचीं व्याख्यानें )

तुकाराम बोवा ह्मणतात कीं, साधुसंत आपल्या घराला येतात तेव्हां तोच दिवस दसरादिवाळीचा समजला पाहिजे. अशी महोत्सवाची दिवाळी येत्या आठवड्यांत आकोल्यास होणार आहे. दीपोत्सव बाह्यदृष्टीला आनंद देणारा असतो पण या बाईच्या सुश्राव्य, मनोहर व हृदयंगम व्याख्यानांनीं अंतर्दृष्टीला परम आल्हाद होईल. यांच्या संभाषणानें ब्रह्मविद्येची गोडी लागेल असें आह्मांस वाटतें. ब्रह्मविद्येंत या बाई मुख्य गुरुमुख आहत असें ह्मटलें तरी चालेल. यांचीं व्याख्यानें इंग्रजींत होणार आहेत हा एक मोठा कमीपणा होय. तथापि इंग्रजी भाषा जाणणाऱ्या लोकांनीं ही संधी अवश्य साधावी आणि त्यांच्या संभाषणाचा लाभ करून घ्यावा इतकेंच नाहीं तर या श्रीमती बाई सारखी परम पूज्य मूर्ती इंग्रजी विषयीं अनभिज्ञ असलेल्या गृहस्थांनीं देखील जरूर पाहावी. यांची वाणी फार गंभीर, सुनृता व मोहक आहे. यांचें वक्तृत्व अलौकिक आहे आणि यांच्यावर सरस्वतीचा कृपाप्रसाद पूर्ण असून अध्यात्म विद्या त्यांस करतलमलका प्रमाणें अवगत आहे; किंबहुना हल्लीं जो ' थिआसाफिकल पंथ ' ह्मणून सर्वत्र गाजत आहे त्याच्या या अधिष्ठात्री देवता आहेत आणि बनारसच्या हिंदु कालेजाच्या मुख्य आधारस्तंभ आहेत. श्रोतृजनांनीं असा हा अपूर्व योग साधावा ह्मणून आह्मी दुसरीकडे सर्व सूचीपत्र निराळें छापलें आहे.

## युद्धकांड.

युद्धाचा पर्वकाळ लागल्या पासून सर्व लोक रुसो-जपानी युद्धाचे चांगले चांगले अध्याय काढून त्यांचें पठण व श्रवण मोठ्या उत्कंठेनें करीत असतात. पोर्टआर्थरचा गोड अध्याय संपला नाहीं तोंच त्यांनीं रशियांतील बंडाच्या अपूर्व अध्यायास प्रारंभ केला. रशियामध्यें येन केन कारणानें लोकांच्या असंतोष वृत्तीची जी भयंकर ज्वाळा

चोहोंकडे भडकली होती ती साम धाम दंड या त्रिविध उपायांनी विझूं लागली. झार साहेबांनीं लोकांच्या मागण्यांचा विचार करण्याचें आश्वासन दिल्यापासून सर्व लोक आपापल्या नित्य कार्यास लागूं लागले. परंतु राष्ट्राच्या संकटकाळीं असमंजस लोकांच्या चिथावणी वरून लोकांनीं जो बंडाळीचा मार्ग आक्रमिला तो झार साहेबांस बिलकुल आवडला नाहीं. ह्या अत्याचाराबद्दल ते लोकांस क्षमाच करणार आहेत. परंतु पुन्हां असा अनिष्ट प्रकार घडूं नये ह्मणून बंडाच्या पुढारी लोकांना मात्र देहान्त प्रायश्चित्त देण्याचा त्यांचा विचार आहे.

रशियन राष्ट्राची युद्धांत झालेली अपकीर्ति दूर व्हावी ह्मणून सर्व रशियन लोकांनीं मोठ्या एकीनें शत्रूशीं लढण्यास टीं कंबर बांधण्याचें सोडून देऊन आपसांतच धुमाकूळ घालावा ही फार वाईट गोष्ट होय. ही यादवी माजविण्यामध्यें दुसऱ्या राष्ट्राचा हात असावा असा संशयहि रशियन सरकारास आला आहे. लढाई आवडो वा न आवडो प्राप्तकालाप्रमाणें ती करणें अवश्य आहे असें असतांना लोकांनीं आपला पाय मागें घ्यावा व राज्यांतच उलट बंडाळी मांडावी यावरून रशियन प्रजा फारच दुःखीकष्टी आहे असें अनुमान निघतें. कारण दुःखाचा अतिरेक झाल्या खेरीज लोक अशा भयकर उपायांचा अवलंब करीत नसतात. ह्या वरून जुलमी राजांनीं व त्यांच्या प्रजाजनांनीं मोठा बोध घेणें अवश्य होय.

गेल्या आठवड्यामध्यें म्यांचुरियांत लढाईचें तोंड लागलें आहे. कांहीं चकमकी चांगल्या झडल्या व त्यांत पुष्कळ रशियन लोक प्राणास मुकले. या रणांगणांत एक दोन निकराचे सामने झाल्या खेरीज येथील लढाई बंद होणार नाहीं. येथील लढाई ी जाळभाज लौकरच आटोपली असती परंतु तेथें अतिशय बर्फ व थंडी पडत असल्यामुळें लढवय्ये शिपायांचा नाइलाज झाला आहे. अनुकूल हवामान झाल्या बरोबर लढाई जोरांत येईल. बाल्टिक फ्लीट समुद्रांत हवा खात असल्यामुळें सध्यां कांहीं दिवस तरी त्याची भिती जपानास उरलेली नाहीं.

× × ×

पोर्ट आरथरचा किल्ला शत्रूच्या स्वाधीन झाल्या पासून तेथील माजलेलें रण अगदीं थंड झालें. हा किल्ला, पराजित मोहरा जो जनरल स्टोअल त्यांनीं अगदीं निरुपाय होऊन शत्रूच्या स्वाधीन केला; तरी पुष्कळ दिवस पावेतों त्याचें रक्षण करण्यांत त्यांनीं जें अप्रतिम शौर्य व जो निश्चय दाखविला त्या बद्दल प्रत्यक्ष त्यांच्या वैऱ्यांनीही त्यांचे गुण गाइले होते; परंतु आतां ह्या वीरांच्या गुणकीर्तीस काळे फासणारी अशी गोष्ट ऐकूं येऊं लागली आहे. ती गोष्ट ही कीं, ज. स्टोसेल यांनीं किल्ला शत्रूच्या हातीं दिला हें अगदीं भागुबाईचें कृत्य केलें. किल्ला सोडून देण्याची बिलकूल जरूरी नव्हती. त्यांच्या जवळ पुष्कळ माणसें असून लढाईचें साहित्यहि मुबलक होतें. आपल्या सैन्याच्या दुःखद स्थिती संबंधानें यांनीं मनास वाटेल तशा खोट्या नाट्या गोष्टी कळविल्या. ह्याच्या इतक्या लांछनास्पद रीतीनें शरण गेल्याचें उदाहरण कोणत्याही इतिहासांत सांपडणार नाहीं. परंतु ज० स्टोसेल सारख्या वीरावर लादलेला हा दारुण आरोप सर्वथैव खोटा असावा अशीच सर्वांची मनोदेवता सांगते. वीरास लाजविणारें, त्यास खालीं पाहण्यास लावणारें, व त्याची मान खंडणा करून त्यास मरणप्राय दुःख देणारें असें कृत्य ज० स्टोसेल यांच्या हातून चुकूनही घडेल असें संभवत नाहीं. खरे शूर व धीर पुरुष असल्या नीच कृत्या पासून किती पराङ्मुख असतात व थोर मनास असल्या कर्माचा किती त्राहि नसतो ही गोष्ट एक तज्ज्ञ पुरुषच ओळखूं शकतील. हें भलत्याचें काम नव्हे!

× × ×

जनरल स्टोसेलच्या बरोबर जे रशियन लोक शरण गेले त्यांस जपानी सरकारानें दोन अटी कळविल्या होत्या. त्यांनीं एक कैदी होऊन तरी राहावें अगर पुन्हा लढाई करणार नाहीं अशी शपथ घेऊन स्वदेशीं परत जावें. बहुतेक रशियन शिपायांनीं कैदी होऊन राहाण्याचेंच पतकरलें. पुनः लढाई वर येणार नाहीं अशी शपथ घेणें त्यांस विषवत् वाटलें. शूर सरदारांनीं

॥ धरीना शस्त्रातें कदन समयीं मी निज करीं ॥

अशी शपथ घेणें ह्मणजे जिवंत असून मेल्याप्रमाणें ह्या मृत्यु लोकींच्या वस्तींत दिवस काढणें होय. असले मेलेलें जिवंत राहण्यापेक्षां शत्रूचा कारागृहवास किती तरी भूषणावह आहे. कारागृहवास, तलवार बंदुकींनीं अंगावर केलेलीं अक्षयीचीं क्षतें व वार हींच शूरांचीं अमोल भूषणें होत. हीं भूषणें दाखवितांना त्यांस जो अपरिमित आनंद होतो व जी जीवाची यथार्थता वाटते ती शब्दांनीं सांगणें अशक्य आहे. लढाईच्या वेळीं मी शस्त्र धरणार नाहीं अशी भीष्मप्रतिज्ञा करणारे व ती तडीस नेणारे आपले एक हिंदुस्थानचेच लोक ! यांची सर त्या रशियन, जपानी, युरोपियन वा आफ्रिकन लोकांना कोठून येणार ?

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— या सप्तकांत थंडी फारच कडक पडली. अंगाला झोंबणारा इतका तीक्ष्ण वारा क्वचितच अनुभवला असेल. ही विलक्षण थंडी उत्तर हिंदुस्थानाकडून आली असून अलाहाबादेला उघड्या हवेंत पारा १८।१९ अंशापर्यंत उतरल्यामुळें पाणी गोठूं लागलें होतें. या वाऱ्याच्या लपेटी मुळें रोगराई बरीच वाढली असून प्लेगाच्या रोगालाही जोर आला आहे. आकोला व बुलढाणा या दोन जिल्ह्यांत प्लेग वाढला आहे.

रा. रा. धोंडू हरी लाळिंगकर तहशिलदार, आकोट यांस आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमण्यांत आलें असून त्यांस वाशीमास बदललें आहे. आणि आकोटच्या तहशिलदारीवर रा. रा. शेख महमद अबदूल अजीज नायब तहशिलदार मेहकर यांस आकोटास नेमण्यांत आलें.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे तहशिलदार केळापूर यांस आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमून यवतमाळास बदललें आहे. व रा. रा. शेख महमद इशाक नायब तहशिलदार जळगांव यांस केळापूरास तहशिलदार नेमण्यांत आलें.

रा. रा. रामराव गोविंद तहशिलदार यांस खामगांवाहून जळगांवास बदलण्यांत आलें.

—येथील भाटे राजश्री कोतवाल चारमी यांजवर तुरुंगांतील चोरीचें सूत विकल्याबद्दल चौकशी चालू आहे. तुरुंगाचे माजी जेलर आपल्या कर्माची शिक्षा भोगीत आहेत व तुरुंगाचे सुपरिंटेंडंट डाक्टर रेली यांच्या माजी कारभाराविषयीं चौकशी चालू आहे. इतका भोंगळा कारभार चालूं असतांना ज्या गोष्टी घडल्या त्याबद्दल त्या बिचाऱ्या कसेनदासावर सरकाराची इतकी कडी नजर कां ! कसेनदासाला न्याय मिळेलच. पण शहाणपणा शिकावयाचा तो असा कीं वाईट गोष्टींतील भागीनदारी घातुक असतेच पण तिच्याशीं असलेला बादरायण संबंध देखील कधीं कधीं मोठा भोंवत असतो !

—केळीवेळीला एक टुमदार वक्तृत्वोत्तेजक समारंभ होत असतो. यंदाचा हा समारंभ २० वा होय. तेथील शाळा मास्तर रा. रा. सूर्यभान जानजी यांस या कामाचें सर्व श्रेय आहे. यंदा येत्या १८ वे व १९ वे तारखेला ही सभा भरून तेथें विद्यार्थ्यांचीं संभाषणें व कसरती होतील.

रा० रा० रुस्तुमजी फर्दूनजी डेपुटी कमिशनर आकोला यांची स्वारी महागांव, पातुरनंदापूर, कुरणखेड व बोरगांव या गांवावरून आकोल्यास येऊन दाखल होईल. येत्या सोमवारा पासून तीन दिवस अखिलान नामदार चीफ कमिशनर यांच्या स्वागता निमित्त येथें खूप गर्दीच गर्दी उडणार आहे.

—'सुंदर शृंगार कार्यालय मदुरा' यांच्या जाहिराती आजच्या अंकाबरोबर पाठविल्या आहेत. त्यांचें यथायोग्य अवलोकन होईल असा त्या कार्यालयाच्या मालकांस भरंवसा आहे.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें २४। | चांदी ७६ |
| जवारी ४२-४६ | जवस ७४ |
| गहूं काठे ६० | बनशी ८९ |
| सरकी | ४॥। |
| तूप | ९ रु. मण |
| तेल | ४॥। रु. मण |
| रुई | रु. ९० |
| कपाशी | रु. ३६।३७ |

### विदुषी ॲनी बेझंट बाई

या तारीख ७।२।०५ मंगळवारीं दुपारच्या गाडीनें येथें येणार आहेत. आणि त्यांचा येथील कार्यक्रम येणेंप्रमाणें आहेः—

**मंगळवार** ता. ७।२।०५ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां कादरभाईचे थिएटरमध्यें Education in India या विषयावर व्याख्यान होईल.

**बुधवार**—तारीख ८।२।०५ रोजीं सकाळीं ८ ते ९॥ पर्यंत लोकांशीं संवाद व प्रश्नोत्तरें.

दुपारीं १॥ ते २॥ खाजगी भेटी. (भेटीची व्यवस्था रा. सखाराम गणेश पंडित या जवळ अगोदर करावी.)

सायंकाळीं ६ वाजतां कादरभाईचे थिएटरमध्यें Exertion & Destiny या विषयावर व्याख्यान होईल.

**गुरुवार** ता. ९।२।०५ ब्रँच मिटिंग.

रा. ब. भागवत यांचे घरीं बाई उतरणार आहेत. तेथें भेटी घ्याव्यात. बाईंच्या इच्छेवरून व्याख्यानांस टिकिटाशिवाय सर्व लोकांस येण्याची परवानगी आहे. मात्र खुर्चीवर बसूं इच्छिणारांनीं सेक्रेटरीकडून फ्री पास घेतला पाहिजे.

आकोला थिऑसाफिकलॉज ता. ४।२।०५ } वा. ल. चिपळूणकर सेक्रेटरी थिऑसाफिकलॉज.

### नोटीस

मेहेरबान रहीमखा वल्लद अमीरखा पठाण मुसलमान राहणार पेठ औरंगपूर तालुके आकोट. यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे दुकानावर येऊन कापूस खंडी २५ पंचवीस दर ९९ रु. खंडी प्रमाणें तुह्मी घेतला, मित्ती कार्तीक शुद्ध १४ संमत १९६१ रोजी सवदा केला व लागलीच कापुस ८ दिवसानी मोंजून न्यावा असे ठरले त्या प्रमाणें तसे केले नाहीं या सवद्यांत तुह्मी आह्मास बयान्या बद्दल रुपये शंभर मात्र दिले आहेत. मित्ती कार्तिक वद्य १ रोजी ते वजा करून बाकी जे होतील ते आमचे कापसाचे दाम आणून द्यावे त्याप्रमाणें तुह्मी केले नाहीं सबब ही नोटीस तुह्मास करणे भाग पडलें. तरी ही नोटीस पावल्या पासून ४ चार दिवसाचे आंत सदहूं कापूस मोंजुन घेऊन जावे व आमचे राहिलेले रुपये आह्मास चुकून द्यावे. तसें तुह्मी न केल्यास ज्या तारखेस सवदा झाला त्या तारखे पासून रुपये येई पर्यंत व्याज आणि हल्लीच्या चालू बाजारभावा प्रमाणें कापूस विकेल त्या प्रमाणें विकून टाकून बाकी राहिलेले नुकसानीचे रुपये व व्याजाचे आणि या नोटिसीचे व कोर्ट खर्चासुद्धां तुमचे जवळून भरून घेऊ. कळावे तारीख २।२।१९०५ इ०

सही

शेडमल बागमल तर्फे वहिवाटदार रामप्रसाद चुन्नीलाल औरंगपूर

दस्तुर खुद.

## नोटीस

वेशमी रा. रा. सखारामजी पाटील वारुकार राहणार इसापूर तालुका आकोट यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं मौजे इसापूर प्रगणे अडगाव तालुका आकोट येथील सर्व्हे नंबर ३१ यांतील सपाईकीतील ⅓ हिस्सा माझ्या मालकीचा असून तो मी वाहिला परंतु यंदा तुह्मी माझ्या हिश्याचें पीक घरी नेलें. त्याची मागणी अनेक वेळां केली असतां तुह्मी कांहींच उत्तर देत नाहीं. तुह्मासारख्या माणसाला ही गोष्ट शोभत नाहीं ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत मालाचा हिशेब देऊन आमचा माल आमच्या स्वाधीन करावा असें करण्यास चुकाल तर तुह्मा वर दिवाणींत दावा करून नोटीशीच्या व इतर खर्चासुद्धां सर्व नुकसानी भरून घेतली जाईल. कळावें. ता. ३१ जानेवारी १९०५ इ.

सही
अंबी मर्द रवूजी तेली
राहणार अडगांव निशाणी
दस्तुर खुद.

## नोटीस

वेशमी जनी मर्द पेंकू राहणार अय्याची कोठी, खामगांव यांसः—

खाली सही याजकडून कळविण्यांत येतें कीं आज पांच सहा वर्षां पासून तूं आपल्या माहेरीच राहतेस. तुला घेऊन जाण्यासाठीं पुष्कळदां निरोप व मूळ धाडलें पण तूं आपल्या आईच्या अयोग्य नादानें वागतेस व त्यामुळें तुला घरीं घेऊन जनरीतीप्रमाणें संसार करावेसें वाटत नाहीं असें दिसतें. ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत तूं चांगुलपणानें घरीं येऊन रहावेंस. असें करण्यास चुकलीस तर तुझ्यावर व तुझ्या आईवर दावा करून तुझा ताबा केला जाईल. अशा लबाडीच्या रितीनें मी तुला फारकत तर देणार नाहींच पण तुझ्या आईच्या घरींही राहूं देणार नाहीं. कळावें तारीख २५ जानेवारी १९०५ इसवी.

सही
पेंकू वल्लद लक्ष्मण राहणार
आकोला निशाणी
हातोडा दस्तुर खुद

## नोटीस

तीर्थरूप राजश्री लक्ष्मण वल्लद नारायण पाटील राहाणार लाखनवाडा तालुका खामगांव यांसः—

खालीं सही करणार नम्रपणानें कळवितो कीं आपला वृद्धापकाळ झाला आहे आपणांस दुसरे लोक फसवितात, व सावत्र आईच्या नाना सांगासांगी मुळें व दारूच्या व्यसनामुळें सर्व जिनगीची वाताहात चालू आहे ह्मणून मी सर्व जिनगीचा वहिवाट स्वतांच करूं लागलों आहे. आणि आपलें सर्व खर्च वेच मी चालवीत असतो. फक्त विज्ञापना एवढीच कीं आपण स्थावरजंगम इस्टेट कोणाला गहाण विक्री वगैरेनें देऊं नये. आपल्या मतीला देखील वारंवार भ्रंश पडतो. ह्मणून स्थावरजंगम इस्टेटीवर आपण कोणतीही गैर सत्ता चालवूं नये. तशी गोष्ट करण्यापूर्वी माझा हिस्सावांटा अलग तोडून द्यावा. सर्व इस्टेट उभयतांच्या मिळकतीची व कांहीं वडिलोपार्जित अशी आहे. आपला या पुढील व्यवहार माझ्या इस्टेटीला कोणत्याही प्रकारें बांधूं शकणार नाहीं. हें ध्यानांत धरावें. कळावें तारीख २९ जानेवारी १९०५ इसवी.

सही
रामजी वल्लद लक्ष्मण पाटील
राहणार लाखनवाडा
निशाणी वखर

## नोटीस

वेशमी तानी मर्द नारायण वंड रा. आकोलखेडा हल्लीं रा. सांगवी बाजाराची ता. आकोला इसः—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तूं माझी लग्नाची बायको आहेस सुमारें एक वर्ष झाले तूं आपलें आई बापाचे घरीं गेलीस. त्या अवधींत मी तुला तीन चार वेळां नेण्या करितां आलों असतां तूं येत नाहींस करितां ही नोटीस पावतांच आठ दिवसांत माझे घरीं यावें मी तुला वागविण्यास तयार आहे. तूं गेली तेव्हां तुझे अंगावर माझे असलेले डागिनें सोन्याची नथ एक तोळ्याची व गुंडबाळ्या, हस व कोपर बाळ्या हे तीन मिळून एकंदर ६० साठ तोळे चांदीचे डागिने असलेले यासह तूं माझे घरीं यावें. असे मुदतींत न केल्यास मी रीतशीर कोर्टांत फिर्याद करून तुला कबजांत घेईन. तूं आपखुषीनें आपले आईबापाचे घरीं राहातीस सबब मी खावटी बद्दल जबाबदार नाहीं. माझे परवानगीशिवाय तूं दुसरा घरठाव केल्यास तुला व तुझ्याशी गंधर्व करणारा असे दोघांस जबाबदार धरले जाऊन फौजदारींत फिर्याद करीन हे खूप समजावें. कळावें. ता. ४।२।०५ इ०

सही
नारायण वल्लद हंबीरजी वंड कुणबी
रा. आकोलखेड ता. आकोट
दस्तुर खुद.

## जाहिरात

म्युनिसिपल निवडणुकीचे नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोलें म्युनिसिपाल कमिटींतील ज्या मेंबरांच्या जागा सदर्हू नियमांतील नियम ३१ अन्वयें खालीं होतील त्या भरण्याकरितां ता० २१।२२।२३ माहे फेब्रुवारी सन १९०५ इसवी रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे. खालीं लिहिलेल्या तक्त्यांत वार्डवेरीज मेंबर निघाले त्यांचीं नांवें, त्या वार्डां करितां होणारे निवडणुकीची तारीख, जागा, पोलिंग आफिसरचें नांव, उमेदवार यांनीं कोणत्या तारखेपर्यंत पोलिंग आफिसरकडे म्युनिसिपल नियम १३ अन्वयें आपले अर्ज द्यावे. वगैरे माहिती दिली आहे. ता० ३-२-१९०५ इ०

*A. Haidar Ali*
व्हाईस चरमन
म्युनिसिपाल कमिटी अकोले.

| वार्ड नं. | निघणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख. | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसरचें नांव. | उमेदवारांनीं कोणत्या तारखेस अर्ज नांवें कळवावे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि० महंमद युसुफ, रा. वि. महाजनी | २१-२-०५ | पाटील चावडी | मे. सी. एच. प्राईस साहेब ए० असि० कमिशनर | १४-२-०५ |
| २ | मि० महंमद अली हाजी, केशव गोविंद दामले, विठोजी नारायण | २२-२-०५ | ग्रेनमार्केट आफिस | | १५-२-०५ |
| ३ | मि० बा० ना० मुधोळकर | २३-२-०५ | टाऊनहाल | | १६-२-०५ |

*A. Haidar Ali*
व्हाईस चेअरमन म्यु. कमिटी आकोला.

## NOTICE

—:o*o:—

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby pulished for general information that the election to fill up the vacancies caused by the retirment of the members in the Akola Municipal Committee under operation of rule 31 of the said rules will take place, from 7 A. M. to 5 P. M. on the 21st 22nd. and 23rd. February 1905. The following table gives for each Ward the name of the out—going members, the date and place of election, the name of the Polling Officer and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to the Polling Officer.

Akola 3-2-05 — A. Haidar Ali, Vice—Chairman Municipal Committee Akola.

| Ward | Names of out—going members | Date of election | Place of election | Name of the Polling Officer | Dates before which nomination papers should be delivered | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| I | Mr. Mohommad Usuf (Already resigned) Ramchandra Vishnu Mahajani | 21st. February 1905 | Patel's Chavri, | C. H. Price Esquire Extra Assistant Commissioner | 14th. February 1905 | |
| II | " Mohd. Ali Anwar Ali. " K. Govind Damle " Vithoojee Narayan. | 22nd. February 1905 | Grain Maket Office, | | 15th. February 1905 | |
| III | " B. N. Mudholkar. | 23rd. February 1905 | Town Hall. | | 16th. February 1905 | |

Date Akola 3rd. February 1905

A. Haidar Ali
Vice—Chairman
Municipal Committee Akola.

चोहोंकडे भडकली होती ती साम धाम दंड या त्रिविध उपायांनीं विझूं लागली. झार साहेबांनीं लोकांच्या मागण्यांचा विचार करण्याचें आश्वासन दिल्याप सून सर्व लोक आपापल्या नित्य कार्यास लागूं लागले. परंतु राष्ट्राच्या संकटकाळीं असमंजस लोकांच्या चिथावणी वरून लोकांनीं जो बंडाळीचा मार्ग आक्रमिला तो झार साहेबांस बिलकुल आवडला नाहीं. ह्या अत्याचाराबद्दल ते लोकांस क्षमाच करणार आहेत. परंतु पुन्हां असा अनिष्ट प्रकार घडूं नये ह्मणून बंडाच्या पुढारी लोकांना मात्र देहान्त प्रायःचित्त देण्याचा त्यांचा विचार आहे.

रशियन राष्ट्राची युद्धांत झालेली अपकीर्ति दूर व्हावी ह्मणून सर्व रशियन लोकांनीं मोठ्या एकीनें शत्रूशीं लढण्यास टीं कंबर बांधण्याचें सोडून देऊन आपसांतच धुमाकूळ घालावा ही फार वाईट गोष्ट होय. ही यादवी माजविण्यामध्यें दुसऱ्या राष्ट्राचा हात असावा असा संशयहि रशियन सरकारास आला आहे. लढाई आवडो वा न आवडो प्राप्तकालाप्रमाणें ती करणें अवश्य आहे असें असतांना लोकांनीं आपला पाय मागें घ्यावा व राज्यांतच उलट बंडाळी मांडावी यावरून रशियन प्रजा फारच दुःखीकष्टी आहे असें अनुमान निघतें. कारण दुःखाचा अतिरेक झाल्या खेरीज लोक अशा भयकर उपायांचा अवलंब करीत नसतात. ह्या वरून जुलमी राजांनीं व त्यांच्या प्रजाजनांनीं मोठा बोध घेणें अवश्य होय.

गेल्या आठवड्यामध्यें म्यांचुरियांत लढाईचें तोंड लागलें आहे. कांहीं चकमकी चांगल्या झडल्या व त्यांत पुष्कळ रशियन लोक प्राणास मुकले. या रणांगणांत एक दोन निकराचे सामने झाल्या खेरीज येथील लढाई बंद होणार नाहीं. येथील लढाई ी जाळभाज लौकरच आटोपली असती परंतु तेथें अतिशय बर्फ व थंडी पडत असल्यामुळें लढवय्ये शिपायांचा नाइलाज झाला आहे. अनुकूळ हवामान झाल्या बरोबर लढाई जोरांत येईल. बाल्टिक फ्लीट समुद्रांत हवा खात असल्यामुळें सध्यां कांहीं दिवस तरी त्याची भिती जपानास उरलेली नाहीं.

× × ×

पोर्ट आरथरचा किल्ला शत्रूच्या स्वाधीन झाल्या पासून तेथील मानलेलें रण अगदीं थंड झालें. हा किल्ला, पराजित मोहरा जो जनरल स्टोअल त्यांनीं अगदीं निरुपाय होऊन शत्रूच्या स्वाधीन केला; तरी पुष्कळ दिवस पावेतों त्याचें रक्षण करण्यांत त्यांनीं जें अप्रतिम शौर्य व जो निश्चय दाखविला त्या बद्दल प्रत्यक्ष त्यांच्या वैऱ्यांनीही त्याचें गुण गाइले होते; परंतु आतां ह्या वीरांच्या गुणकीर्तीस काळें फासणारी .शी गोष्ट ऐकूं येऊं लागली आहे. ती गोष्ट ही कीं, ज. स्टोसेल यांनीं किल्ला शत्रूच्या हातीं दिला हें अगदीं भागुबाईचें कृत्य केलें. किल्ला सोडून देण्याची बिलकूल जरूरी नव्हती. त्यांच्या जवळ पुष्कळ माणसें असून लढाईचें साहित्यहि मुबलक होतें. आपल्या सैन्याच्या दुःखद स्थिती संबंधानें यांनीं मनास वाटेल तशा खोट्या नाट्या गोष्टी कळविल्या. ह्याच्या इतक्या लांछनास्पद रीतीनें शरण गेल्याचें उदाहरण कोणत्याही इतिहासांत सांपडणार नाहीं. परंतु ज० स्टोसेल सारख्या वीरावर लादलेला हा दारूण आरोप सर्वथैव खोटा असावा अशीच सर्वांची मनोदेवता सांगते. वीरास लाजविणारें, त्यास खालीं पाहण्यास लावणारें, व त्याची मान खंडणा करून त्यास मरणप्राय दुःख देणारें असें कृत्य ज० स्टोसेल यांच्या हातुन चुकूनही घडेल असें संभवत नाहीं खरे शूर व धीर पुरुष असल्या नीच कृत्या पासून किती पराङ्मुख असतात व थोर मनास असल्या कर्माचा विटाळहि नसतो ही गोष्ट एक तज्ज्ञ पुरुषच ओळखूं शकतील. हें भलत्याचें काम नव्हे!

× × ×

जनरल स्टोसेलच्या बरोबर जे रशियन लोक शरण गेले त्यांस जपानी सरकारानें दोन अटी कळविल्या होत्या. त्यांनीं एक कैदी होऊन तरी राहावें अगर पुन्हा लढाई करणार नाहीं अशी शपथ घेऊन स्वदेशीं परत जावें. बहुतेक रशियन शिपायांनीं कैदी होऊन राहाण्याचेंच पतकरलें. पुनः लढाई वर येणार नाहीं अशी शपथ घेणें त्यांस विषवत् वाटलें. शूर सरदारांनीं

॥ धरीना शस्त्रातें कदन समयीं मी निज करीं ॥

अशी शपथ घेणें ह्मणजे जिवंत असून मेल्याप्रमाणें ह्या मृत्यु लोकींच्या वस्तींत दिवस काढणें होय. असले मेलेलें निवंत राहण्यापेक्षां शत्रूचा कारागृहवास किती तरी भूषणावह आहे. कारागृहवास, तलवार बंदुकींनीं अंगावर केलेलीं अक्षयीचीं क्षतें व वार हींच शूरांचीं अमोल भूषणें होत. हीं भूषणें दाखवितांना त्यांस जो अपरिमित आनंद होतो व जी जीवाची यथार्थता वाटते ती शब्दांनीं सांगणें अशक्य आहे. लढाईच्या वेळीं मी शस्त्र धरणार नाहीं अशी भीष्मप्रतिज्ञा करणारे व ती तडीस नेणारे आपले एक हिंदुस्थानचेच लोक! यांची सर त्या रशियन, जपानी, युरोपियन वा आफ्रिकन लोकांना कोठून येणार ?

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— या सप्तकांत थंडी फारच कडक पडली. अंगाला झोंबणारा इतका तीक्ष्ण वारा क्वचितच अनुभवला असेल. ही विलक्षण थंडी उत्तर हिंदुस्थानाकडून आली असून अलाहाबादेला उघड्या हवेंत पारा १८।१९ अंशापर्यंत उतरल्यामुळें पाणी गोठूं लागलें होतें. या वाऱ्याच्या लपेटी मुळें रोगराई बरीच वाढली असून प्लेगाच्या रोगालाही जोर आला आहे. आकोला व बुलढाणा या दोन जिल्ह्यांत प्लेग वाढला आहे.

रा. रा. धोंडू हरी लाळिंगकर तहशिलदार, आकोट यांस आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमण्यांत आलें असून त्यांस वाशिमास बदललें आहे. आणि आकोटच्या तहशिलदारीवर रा. रा. शेख महमद अबदूल अजीज नायब तहशिलदार मेहकर यांस आकोटास नेमण्यांत आलें.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे तहशिलदार केळापूर यांस आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमून यवतमाळास बदललें आहे. व रा. रा. शहा महमद इशाक नायब तहशिलदार जळगांव यांस केळापुरास तहशिलदार नेमण्यांत आलें.

रा. रा. रामराव गोविंद तहशिलदार यांस खामगांवाहून जळगांवास बदलण्यांत आलें.

—येथील भाटे राजश्री करंदास चारसी यांजवर तुरुंगांतील चोरीचें सूत विकल्याबद्दल चौकशी चालूं आहे. तुरुंगाचे माजी जेलर आपल्या कर्माची शिक्षा भोगीत आहेत व तुरुंगाचे सुपरिन्टेंडेंट डाक्टर रेली यांच्या माजी कारभाराविषयीं चौकशी चालूं आहे. इतका भोंगळा कारभार चालूं असतांना ज्या गोष्टी घडल्या त्याबद्दल त्या बिचाऱ्या करसनदासावर सरकाराची इतकी कडी नजर कां! करसनदासाला न्याय मिळेलच. पण शहाणपणा शिकावयाचा तो असा कीं वाईट गोष्टींतील भागीनदारी घातुक असतेच पण तिच्याशीं असलेला बाद्रायण संबंध देखील कधीं कधीं मोठा भोंवत असतो!

—केळीवेळीला एक टुमदार वक्तृत्वोत्तेजक समारंभ होत असतो. यंदाचा हा समारंभ २० वा हेय. तेथील शाळा मास्तर रा. रा. सूर्यभान जानजी यांस या कामाचें सर्व श्रय आहे. यंदा येत्या १८ वे व १९ वे तारखेला ही सभा भरून तेथें विद्यार्थ्यांचीं संभाषणें व कसरती होतील.

रा० रा० रुस्तुमजी फर्दूनजी डेपुटी कमिशनर आकोला यांची स्वारी महागांव, पातुरनंदापूर, कुरणखेड व बोरगांव या गांवावरून आकोल्यास येऊन दाखल होईल. येत्या सोमवारा पासून तीन दिवस अलिशान नामदार चीफ कमिशनर यांच्या स्वागता निमित्त येथें खूप गर्दीच गर्दी उडणार आहे.

—'सुंदर शृंगार कार्यालय मदुरा' यांच्या जाहिराती आजच्या अंकाबरोबर पाठविल्या आहेत. त्यांचें यथायोग्य अवलोकन होईल असा त्या कार्यालयाच्या मालकांस भरंवसा आहे.

---

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। | | |
| सोनें २४। | | चांदी ७६ | |
| जवारी ४२-४९ | | कवस ७४ | |
| गहू काठे ६० | | बनशी ८९ | |
| सरकी | ४॥। | | |
| तूप | ९ रु. मण | | |
| तेल | ४॥। रु. मण | | |
| रुई | रु. १० | | |
| कपाशी | | | |

## विदुषी ॲनी बेझंट बाई

या तारीख ७।२।०५ मंगळवारीं दुपारच्या गाडीनें येथें येणार आहेत. आणि त्यांचा यथील कार्यक्रम येणेंप्रमाणें आहेः—

मंगळवार ता. ७।२।०५ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां कादरभाईचे थिएटरमध्यें Education in India या विषयावर व्याख्यान होईल.

बुधवार—तारीख ८।२।०५ रोजीं सकाळीं ८ ते ९ प र्यंत लोकांशीं संवाद व प्रश्नोत्तरें.

दुपारीं १॥ ते २॥ खाजगी भेटी. (भेटीची व्यवस्था रा. सखाराम गणेश पंडित या जवळ अगोदर करावी.)

सायंकाळीं ६ वाजतां कादरभाईचे थिएटरमध्यें Exertion & Destiny या विषयावर व्याख्यान होईल.

गुरुवार ता. ९।२।०५ ब्रँच मिटिंग.

रा. ब. भागवत यांचे घरीं बाई उतरणार आहेत. तेथें भेटी घ्याव्यात. बाईंच्या इच्छे वरून व्याख्यानांस टिकिटाशिवाय सर्व लोकांस येण्याची परवानगी आहे. मात्र खुर्चीवर बसूं इच्छिणारांनीं सेक्रेटरीकडून फ्री पास घेतला पाहिजे.

आकोला थिऑसाफिकलॉज ता. ४।२।०५ } वा. ल. चिपळूणकर सेक्रेटरी थिऑसाफिकलॉज.

---

## नोटीस

मेहेरबान रहीमखा वल्लद अमीरखा पठाण मुसलमान राहणार पेठ औरंगपूर तालुके आकोट. यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे दुकानावर येऊन कापूस खंडी २९ पंचवीस दर ९९ रु. खंडी प्रमाणें तुह्मी घेतला, मित्ती कार्तीक शुद्ध १४ संमत १९६१ रोजी सवदा केला व लागलीच कापुस ८ दिवसानी मोजून न्यावा असे ठरले त्या प्रमाणें तसे केले नाहीं या सवद्यांत तुह्मी आह्मास बयान्या बद्दल रुपये शंभर मात्र दिले आहेत. मित्ती कार्तिक वद्य १ रोजी ते वजा करून बाकी जे होतील ते आमचे कापसाचे दाम आणून द्यावे त्याप्रमाणें तुह्मी केले नाहीं सबब ही नोटीस तुह्मास करणे भाग पडलें. तरी ही नोटीस पावल्या पासून ४ चार दिवसाचे आंत सदहू कापूस मोजून घेऊन जावे व आमचे राहिलेले रुपये आह्मास चुकून द्यावे. तसें तुह्मी न केल्यास ज्या तारखेस सवदा झाला त्या तारखे पासून रुपये येई पर्यंत व्याज आणि हल्लीच्या चालू बाजारभावा प्रमाणें कापूस विकेल त्या प्रमाणें विकून टाकून बाकी राहिलेले नुकसानीचे रुपये व व्याजाचे आणि या नोटिसीचे व कोर्ट खर्चासुद्धां तुमचे जवळून भरून घेऊ. कळावे तारीख २।२।१९०५ इ०

सही

शेडमल बागमल तर्फे वहिवाटदार
रामप्रसाद चुन्नीलाल औरंगपूर

## नोटीस

वेशमी रा. रा. सखारामजी पाटील दारूकार राहणार इसापूर तालुका आकोट यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं मौजे इसापूर प्रगणें अडगाव तालुका आकोट येथील सर्व्हे नंबर ३१ यांतील समाईकींतील ½ हिस्सा माझ्या मा कीचा असून तो मी वाहिला परतु यंदा तुह्मी माझ्या हिश्याचें पीक घरी नेलें. त्याची मागणी अनेक वेळां केली असतां तुह्मी कांहींच उत्तर देत नाहीं. तुह्मासारख्या माणसाला ही गोष्ट शोभत नाहीं ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आंठ दिवसांच्या आंत मालाचा हिशोब देऊन आमचा माल आमच्या स्वाधीन करावा असें करण्यास चुकाल तर तुह्मा वर दिवाणींत दावा करून नोटीशीच्या व इतर खर्चासुद्धां सर्व नुकसानी भरून घेतली जाईल. कळावें. ता. ३१ जानेवारी १९०५ इ.

सही
अंबी मर्द रखुजी तेली
राहणार अडगांव निशाणी
दस्तुर खुद.

## नोटीस

वेशमी जनी मर्द पेंकू राहणार अय्याची कोठी, खामगांव यांसः—

खाली सही याजकडून कळविण्यांत येतें कीं आज पांच सहा वर्षे पासून तूं आपल्या माहेरींच राहेतस. तुला घेऊन जाण्यासाठीं पुष्कळदां निरोप व मूळ धाडलें पण तू आपल्या आईच्या अयोग्य नादानें वागेतस व त्यामुळें तुला घरीं येऊन जनरीतीप्रमाणें संसार करावेसें वाटत नाहीं असें दिसतें. ही नोटीस पोंचल्या तारखे पासुन आठ दिवसांच्या आंत तूं चांगुलपणानें घरी येऊन रहावेंस. असें करण्यास चुकलीस तर तुझ्यावर व तुझ्या आईवर दावा करून तुझा ताबा केला जाईल. अशा लबाडीच्या रितीनें मी तुला फारकत तर देणार नाहींच पण तुझ्या आईच्या घरींही राहूं देणार नाहीं. कळावें तारीख २९ जानेवारी १९०५ इसवी.

सही
पेंकू वल्लद लक्ष्मण राहणार
आकोला निशाणी
हातोडा दस्तुर खुद

## नोटीस

तीर्थरूप राजश्री लक्ष्मण वल्लद नारायण पाटील राहाणार लाखनवाडा तालुका

खाली सही करणार नम्रपणानें कळवितो कीं आपला वृद्धापकाळ झाला आहे आपणांस दुसरे लोक फसवितात, व सावत्र आईच्या नाना सांगासांगी मुळें व दारूच्या व्यसनामुळें सर्व जिनगीची वाताहात चालूं आहे ह्मणून मी सर्व जिनगीचो वाहिवाट स्वतांच करूं लागलों आहे. आणि आपलें सर्व खर्च वेच मी चालवीत असतो. फक्त विज्ञापना एवढीच कीं आपण स्थावरजंगम इस्टेट कोणाला गहाण विक्री वगैरेनें देऊं नये. आपल्या मतीला देखील वारंवार भ्रंश पडतो. ह्मणून स्थावरजंगम इस्टेटीवर आपण कोणतीही गैर सत्ता चालवूं नये. तशी गोष्ट करण्यापूर्वी माझा हिस्साचा अलग तोडून द्यावा. सर्व इस्टेट उभयतांच्या मिळकतीची व कांहीं वडिलोपार्जित अशी आहे. आपला या पुढील व्यवहार माझ्या इस्टेटीला कोणत्याही प्रकारें बांधूं शकणार नाहीं. हें ध्यानांत धरावें. कळावें तारीख २९ जानेवारी १९०५ इसवी.

सही
रामजी वल्लद लक्ष्मण पाटील
राहणार लाखनवाडा
निशाणी वखर

## नोटीस

वेशमी तानी मर्द नारायण बंड रा. आकोलखेडा हल्लीं रा. सांगवी बाजाराची ता. आकोला इसः—

खाली सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तूं माझी लग्नाची बायको आहेस. सुमारें एक वर्ष झालें तूं आपलें आई बापाचे घरीं गेलीस. त्या अवधींत मी तुला तीन चार वेळां नेण्या करितां आलों असतां तूं येत नाहींस करितां ही नोटीस पावतांच आठ दिवसांत माझे घरीं यावें मी तुला वागविण्यास तयार आहे. तूं गेली नेव्हां तुझे अंगावर माझे असलेले डागीनें सोन्याची नथ एक तोळ्याची व गुंडबाळ्या, हस व कोपर वाळ्या हे तीन मिळून एकंदर ६० साठ तोळे चांदीचे डागिने असलेले यासह तूं माझे घरीं यावें. असे मुदतींत न केल्यास मी रीतशीर कोर्टांत फिर्याद करून तुला कबजांत घेईन. तूं आपखुषीनें आपले आईबापाचे घरीं राहातीस सबब मी खावंदी बद्दल जबाबदार नाहीं. माझे परवानगीशिवाय तूं दुसरा घरठाव केल्यास तुला व तुझ्याशी गंधर्व करणारा असे दोघांस जबाबदार धरले जाऊन फौजदारींत फिर्याद करीन हे खूप समजावें. कळावें. ता. ४।२।०५ इ०

सही
नारायण वल्लद हंबीरजी बंड कुणबी
रा. आकोलखेड ता. आकोट
दस्तुर खुद.

## जाहिरात

म्युनिसिपल निवडणुकीचे नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोलें म्युनिसिपाल कमिटीतील ज्या मेंबरांच्या जागा सदरहू नियमांतील नियम ३१ अन्वयें खालीं होतील त्या भरण्याकरितां ता० २१।२२।२३ माहे फेब्रुवारी सन १९०५ इसवी रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे. खालीं लिहिलेल्या तक्त्यांत वार्डापैकीं मेंबर निघाले, त्यांचीं नावें, त्या वार्डा करितां होणारे निवडणुकीची तारीख, जागा, पोलींग आफिसराचें नांव, उमेदवार यांनीं कोणत्या तारखेपर्यंत पोलींग आफिसरकडे म्युनिसिपल नियम १३ अन्वयें आपलें अर्ज द्यावें. वगैरे माहिती दिली आहे. ता० ३-२-१९०५ इ०

*A. Haidar Ali*
व्हाईस चरमन
म्युनिसिपाल कमिटी अकोलें.

| वार्ड नं. | निघणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख. | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसरचें नांव. | उमेदवारांनीं कोणत्या तारखेच आत नांवचे कागद द्यावयाचे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि० महंमद युसफ<br>,, रा. वि. महाजनी | २१-२-०५ | पाटील चावडी | मे. सी. एच. प्राईस साहेब ए० असि० कमिशनर | १४-२-०५ |
| २ | मि. महंमद अली दरोगे<br>,, केशव गोविंद दामले<br>,, विठूजी नारायण | २२-२-०५ | ग्रेनमार्केट आफस | | १५-२-०५ |
| ३ | मि. ब० न० मुधोळकर | २३-२-०५ | टाऊनहाल | | १६-२-०५ |

*A. Haidar Ali*
व्हाईस चेअरमन म्यु. कमेटी आकोला.

## NOTICE

—:o*o:—

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby pulished for general information that the election to fill up the vacancies caused by the retirment of the members in the Akola Municipal Committee under operation of rule 31 of the said rules will take place, from 7 A. M. to 5 P. M. on the 21st 22nd. and 23rd February 1905. The following table gives for each Ward the name of the out—going members, the date and place of election, the name of the Polling Officer and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to the Polling Officer.

Akola
3—2—05

A. Haidar Ali
Vice—Chairman
Municipal Committee
*Akola.*

| Ward | Names of out—going members | Date of election | Place of election | Name of the Polling Officer | Dates before which nomination papers should be delivered | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| I | Mr. Mohommad Usuf (Already resigned)<br>,, Ramchandra Vishnu Mahajani | 21st. February 1905 | Patel's Chowri, | C. H. Price Esquir Extra Assistant Commissioner | 14th. February 1905 | |
| II | ,, Mohd. Ali Anwar Ali.<br>,, K. Govind Damle<br>,, Vithoojee Narayan. | 22nd. February 1905 | Grain Maket Office, | | 15th. February 1905 | |
| III | ,, B. N. Mudholkar. | 23rd. February 1905 | Town Hall. | | 16th. February 1905 | |

Date Akola
3rd. February 1905

A. Haidas Ali
Vice—Chairman
Municipal Committee Akola.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत....१ रु.
दर ओळीस............०।०।६
दुसरे खेपेस..............०।३

All Subscriptions to be paid in advance
Single copy ........................ 2 as

Advertments
Below 10 lines ... ... 2 Rs
Per line over 10 ... ... 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXIX AKOLA MONDAY 13 FEBRUARY 1905 NO 7

वर्ष ३९ आकोला सामवार तारीख १३ माहे फब्रुवारी सन १९०५ इ० अंक ७

### नोटीस

बेहमी ( १ ) रा. रा. मोतीलाल वल्लद रुषीराम मारवाडी राहणार उमरावती.

(२) आसाराम व. लक्ष्मणदास मारवाडी राहणार अडगाव ता० दर्यापूर पोस्ट-ता-सेगांव जिल्हा इलिचपूर उभयतांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं आह्मी तुह्मास सुमारें एक वर्ष झालें मुकत्यार दिले होतें ते तुह्मी नवकरी सोडल्यापासूनच रद्द आहे. नोकरी सोडल्यापासून तुह्मी जीं आमचेसंबंधानें देवेवघीची कामें केली असतील अगर पुढे कराल त्याची जबाबदारी सर्वस्वी तुमचे शिर वर राहील. आह्मी व आमची इस्टेट जबाबदार होणार नाहीं. नोकरी सोडल्यापासून जो कांहीं तुह्मी आमचे संबंधानें देवघेवीचा व्यापार केला असेल अगर कराल त्याची नुकसानी तुमचे पासून भरून घेऊं. कळावे ता. ७ फब्रुवारी सन १९०५.

( सही )

नवनी बाई जाजे किसनलाल तर्फे मु त्यार दुर्गालाल वल्लद केवळ द राहणार आकोली जाहागीर ता. आकोट दस्तुर खुद.

### इलिचपूर

ता. १०।२।०५

**हवामान.**— हल्लीं थंडी फार पडते. चिखलदरा येथें तारीख ३।४ रोजीं बर्फ पडलें.

**कपास**— खेळबाट तालुक्यांतून आज पर्यंत यंदा इतका कापूस कधीं विकण्यासाठीं येथील बाजारांत आला नव्हता. कारण पुष्कळ पाऊस पडल्यानें नेहमीं सवीस पीक शेत असे. परंतु गेल्या सालीं कमी पाऊस झाल्यानें कपाशीचें उत्पन्न फार झालें.

**आगपेट्याचा कारखाना**— येथें सदर कारखान्या करतां एक कंपनी उभारली आहे. त्या कंपनीचें भांडवल एक लक्ष रुपये आहे. एक एक हिस्सा पाचशें रुपयांचा आहे. त्या प्रमाणें सर्व शेअर भरलें गेलें झाले तरी चालेल कारण १९।२० शेअर राहिले आहेत ह्मणजे विशेष नाहींत. त्या शेअरांची मागणी झाल्यासारखीच आहे. मुख्य गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी ही आहे. कीं, सर्व भांडवल इलिचपूर जिल्ह्यांतील लोकांचेंच आहे. अद्यापपर्यंत दुसऱ्या जिल्ह्यांना शेअर घेतां का ह्मणण्याचा प्रसंग आला नाहीं. हें श्रेय येथील पुढारी मंडळींना आहे कारखाना सुरू करण्याचीं यंत्रें आणविण्यासाठीं पत्रें व रुपये सर्वांत पाठविले आहेत. कारखान्यांतून पांच वर्षांसाठीं सामान वगैरे उपयुक्त लांकडाबद्दल सवलती कांहीं मिळाल्या आहेत. इमारतीचे कामास सुरवात झाल्या सारखीच आहे. इलिचपूर—उमरावती रस्त्यावर हा कारखाना होणार आहे सामान सुद्धां येऊं लागलें आहे. या बाबतींत रा. रा. बापूराव पेंडसे आदि करून मंडळींनां फार पुढाकार घेऊन काम करून दाखविलें आहे. कारखान्या करितां रा. रा. करमरकर एक्सपर्ट आणले आहेत.

**सभा**— तारीख १७ रोजीं येथें सभा भरणार आहे त्या वेळीं कापसाची सुधारणा कशी करतां येईल या प्रश्नाचा निकाल होणार आहे. सरकार या पिकाबद्दल फार खटपट करण्यास तयार आहे. व जर सरकारानें दिलेल्या बियानीं शेतें पेरलीं व कदाचित शेजारच्या शेतापेक्षां दिलेल्या सरकीचें पीक कमी आलें तर पंच ठरवतील तितकी खरोखर नुकसानी देण्यास तयार आहे वगैरे अनेक प्रश्नांचे निकाल होणार आहेत.

**येणार**— अझिशान चिफ कमिशनर साहेब हे तारीख १९ रोजीं इलिचपूर जिल्ह्यांत येणार आहेत.

### पिंपळगांवराजा

**दंतकथा**— या गांवीं मातीचा एक मोठा कोट किल्ला आहे. याचें काम चाललें असतां त्याचा बुरुज वर चढेना ह्मणून येथील एका 'राजा' नांवाच्या अतिशूद्रानें या किल्ल्याचे पायांत जिवंत समाधी घेतली व तेव्हांपासून या गांवास 'राजा'चें पिंपळगांव असें ह्मणूं लागले.

**दुःखद मृत्यु**— येथील सुप्रसिद्ध श्रीमती लक्ष्मी बाई देशमुख यांस गेल्या २० तारखेस देवाज्ञा झाली. यांचें वय ७० वर्षां जवळ जवळ होतें. बाई फार साध्या, सुस्वभावी व मनाच्या मोठ्या दिलदार होत्या. ह्या गरिबगुरिबांचा मोठा परामर्ष घेत असत व यांचा दानधर्म मोठा असे. यांच्या प्रेतयात्रेबरोबर गांवांतील हिंदु, मुसलमान व स्त्रिया मिळून तीन हजारावर मनुष्य लोटलें होतें. सर्व लहान थोर मंडळी यांच्या मृत्यूबद्दल हळहळत आहेत. बाईच्या थोर आत्म्यास ईश्वर सद्गति देवो ! बाईच्या मागें त्यांचे लोकप्रिय चिरंजीव आपल्या घराण्याचा जुना नांवलौकिक चांगला राखतील असा सर्वांस भरंवसा आहे.

### जमिनीची मशागत व अउतें.

**देशी नांगर**— या नांगरानें एकदां जमिन नांगरल्या [illegible] असतां मातीचीं मोठमोठीं ढेकळ जमिनीतल्या जमिनींत हललेली दिसतील. यावरून असें दिसतें कीं एकदां नांगरणी केली असतां शेत अर्धेच गिरलें जाऊन नांगरणी अपुरी होते. पहिल्या नांगरणीच्या वेळीं राहिलेलीं ढेकळें नाहींशीं करण्याकारतां आतां नांगर आडवीकडून फिरविला पाहिजे. अर्थात् या नांगरणीच्या वेळींही कांहीं बिन नांगरलेली जमीन राहिलीच. व असें प्रत्येक वेळीं नांगरतांनां होण्याचा संभव आहे. पण खरें पाहिलें असतां पांच चार वेळ जमीन नांगरली ह्मणजे सर्व जमिनींतील कण परस्परापासून विलग होतात. पहिल्या नांगरणीच्या वेळीं सैर्व जमीन नांगरली जात नाहीं. तत्रापि वरचा पृष्ठभाग सर्व नांगरल्या सारखा दिसतो. असें होण्याचें कारण हें आहे कीं आपल्या नांगरानें केलेला तास वर पासून खालीं निमुळता गेलेला असतो, व त्याचा परिछेद इंग्रजी अक्षर व्ही प्रमाणें दिसतो. ह्या प्रकारच्या दोन तासामधलि जी बिन नांगरलेली जागा दिसते तिचा ही परिच्छेद पाळण्या व्ही सारखा दिसला पाहिजे.

नांगराचा जो भाग जमिनींत शिरतो त्याचा वरचा भाग सपाट असून खालच्या कडेला परीच धार असते. नांगर चालविला ह्मणजे त्याच्या सपाट बाजूस माती चिकटते व मोठमोठीं ढेकळेंच सुटूं लागतात. त्या मुळें नांगर ओढण्यास त्रास पडतो. दक्षिण कानड्यांत एक प्रकारचा नांगर आहे त्यांत हा उणेपणा नाहीं. हा नांगर मध्यें पोकळ असून जो भाग जमिनींत शिरावयाचा असतो तो त्रिकोणाकृति असतो त्यामुळें जमीन लवकर फाटून नांगरलेली माती समसमान दोन्ही बाजूस विभागली जाते. लोखंडापेक्षां लांकडास माती फार चिकटते आणि आपल्या नांगरांत इतर भागापेक्षां लांकूडच फार मोठें असतें. त्यामुळें नांगर ओढण्यास जड जातो.

**देशी नांगराचें काम**— देशी नांगर साधारणपणें फार खोल जात नाहीं त्यामुळें त्याला ओढण्यास बैलही फार लागत नाहींत. साधारण चिकण मातीची जमीन असली ह्मणजे त्यामध्यें पडलेला तास वर पांच इंच रुंद व खालीं अर्धा इंच रुंद व त्याची खोली चार पांच इंच असते. तासाची साधारण मानानें रुंदी पावणे तीन इंच धरली. यास खोलीनें गुणलें ह्मणजे तासाच्या छेदाचें क्षेत्रफळ अकरा चौरस इंच होईल. [illegible] उभ्या व आडव्या कांहीं बाद्या करून सव जमिन नांगरली ह्मणजे किती जमीन नांगरली गेली हें पाहण्याचें असल्यास नांगरलेल्या जमीनाच्या क्षेत्रफळास खोलीनें ह्मणजे या उदा- [illegible] एकरांतील ६१२८ घन यार्ड जमीन चाळविली आहे.

जाते. तास जरी जवळ जवळ असले तरी तासाची उंची वरच्या बाजूस कायती पांचच इंच असल्यामुळें एक एकर जमीन नांगरण्याला बैलानां वीस मैल लांबी इतकें चालावें लागतें. इतकें अंतर चालण्याला बैलानां कमींत कमी ह्मटलें तरी बारा तास लागतील, व जातां जातां त्यांच्या कडून सुमारें ३०० घनयार्ड जमीन नांगरली जाईल. परंतु देशी नांगरानें सर्व जमीन चांगली नांगरावयाची ह्मणजे तिजवरून नांगर निदान तीनदां फिरविला पाहिजे तेव्हां त्यांस साठ मैल चालावें लागून रोज नऊ तास प्रमाणें काम केलें असतां चार दिवस पाहिजेत. परंतु शेतांत प्रत्यक्ष नांगरताना प्रत्येक तासांत थोडी तरी बिन नांगरलेली जागा राहतेच तेव्हां एक एकर जमीन नांगरण्याला कायते चाळीस मैल चालावें लागून तीन दिवस पुरण्या सारखे आहेत.

पुष्कळ शेतकऱ्या जवळ स्वतःचे नांगर नसतातच पण असतात त्याजपाशीं एखाद असतो. एखादा धनवान शेतकरी असला तर तो आपल्या ऐपती प्रमाणें व पिकाच्या मानाप्रमाणें तीन चार नांगर ठेवतो. निरनिराळ्या जमिनीसही निरनिराळ्या प्रकारचे नांगर लागतात. एका नांगराची किंमत दीड दोन रुपये असते. पण ते एक दोन वर्षांतच निरुपयोगी होतात. त्यांचे वजन दहा बारा शेरा पासून पाऊणशें ऐंशी शेरा पर्यंत असते. हलक्या जमिनीत लहान व हलका नांगर चालतो पण चिकण मातींत मात्र जड व मोठा नांगर लागतो.

नांगराचे निरनिराळ्या भागांस १ फाळ, दांत, किंवा कुशा; २ ओंढका किंवा ठेंकें; ३ दांडी; ४ रूमणें अशीं नांवें आहेत; पण सर्व प्रकारच्या नांगरांत फाळ व ओंढका हे दोन भाग मुख्य आहेत. त्यांचे उपयोग खालीं लिहिल्याप्रमाणें होत—

**फाळ**— नांगर सुरू केला ह्मणजे हाच भाग प्रथम जमिनींत शिरतो फाळ लोखंडी किंवा पोलादी असून त्याला जमीन नांगरतां येईल अशी धार व जमिनींत शिरला ह्मणजे पुढची जमीन सहज दुभागली जावी ह्मणून फाळाची वरची बाजू त्रिकोणकृती असावी. कठीण जमिनीला घांसून फाळ बोथट किंवा निरुपयोगी होतो तो काढून दुरुस्त करितां येतो; किंवा त्याच्या जागीं दुसरा चांगला फाळ कोणत्याही मनुष्यास बसवितां येतो. फाळ व ओंढयाचा खालचा निमुळता भाग हे लोखंडाच्या सुच्या वेढणीनें एके जागीं बसवितां येतात. व नांगर उलगडावयाचा असला ह्मणजे ही वेढणी काढली ह्मणजे

ओंडका अगर डोके— नांगर जड व्हावा ह्मणून हा एक लांकडाचा ठोकळा फाळाच्या पाठीमागल्या बाजूस बसविला असतो. त्या मुळें नांगर चालवितांना ते दोन्ही भाग विलगलेले दिसतात. नांगर सुरू केला ह्मणजे माती फाळावरून ओंडक्यावर येते व ओंडक्याची पुढील बाजू गोल केलेली असल्यामुळें हळूंच पाठी मागें जाऊन पडते.

या शिवाय प्रत्येक नांगरास एक लांकडाचा लांब बांसा लावलेला असतो त्यास दांडी असें ह्मणतात. ह्याच्या एका टोकांस जूं लावून त्यास बैल जुंपतात व दुसऱ्या टोंकास ह्मणजे फाळाच्या पाठीमागें नांगर फिरविण्यासाठीं किंवा नांगर खाली वर करितां यावा ह्मणून हातांत धरण्यासाठीं एक वांकडें लांकूड असतें त्यास रुमणें असें ह्मणतात. दांडाला पुढच्या बाजूस करवतीं सारखे दांत कधीं कधीं असतात या पैकीं कोणत्याही एका किंवा दुसऱ्या दात्यांत जूं बांधलें ह्मणजे नांगर जमिनींत ज्यास्त किंवा कमी खोल घालतां येतो.

---

## वऱ्हाडसमाचार

---

मिती माघ शुद्ध ९ शके १८२६

---

## प्रयत्नवाद.

प्रयत्न बलवत्तर कीं प्रालब्ध बलवत्तर असा फार जुना प्रश्न आहे. या प्रश्नाचें उत्तर पितामह भीष्मांनीं महाभारतांत फार समर्पक दिलें आहे. प्रयत्न व प्रालब्ध या दोन्ही वादांची मीमांसा करून त्यांनीं असा निर्णय केला कीं, प्रयत्न बलवान आहे व प्रयत्नच प्रालब्धाचा पुरुषकार आहे. प्रालब्धालाच दैव, नशीब किंवा कर्म अशा अनेक संज्ञा आहेत. कर्म ह्मणजे कृती हा धात्वर्थ झाला. परंतु त्याचा व्यवहारिक अर्थ दोन प्रकारचा आहे. पहिला अर्थ असा करितात कीं, कर्म ह्मणजे कांहीं दैवी अद्भुत शक्ती. मोठमोठे शककर्ते राजे, पराक्रमी विजयी योद्धे, लोककल्याणकारी महान् ब्रह्मवेत्ते, राज्यक्रांती करणारे अलौकिक मुत्सद्दी इत्यादिकांच्या चरित्रांमध्यें अशा दैवी संपदेच्या गोष्टी दिसून येतात. त्यांच्या सर्वच क्रिया जयश्रीनें अलंकृत असतात. असे पुरुष जेव्हां कार्यें करितात तेव्हां त्यांच्या कृतीमध्यें कांहीं अद्भुत प्रभाव दिसून येतो. कांहीं पूर्व संचिताचा ओघ, पूर्व पुण्याचा प्रताप किंवा ईश्वरी कृपेचा प्रसाद त्यांच्या चरित्रामध्यें पदोपदीं व्यक्त होत असतो. या भूलोकोत्तर कारण समुदायाला पूर्व पुण्याई किंवा पूर्व कर्म असें ह्मणत असतात. कर्माची ही प्रेरणा इतकी विलक्षण असते कीं, त्या कर्माच्या प्रभावापुढें सर्व गोष्टी शरण येतात. या दृष्टीनें पाहतां कर्म ह्मणजे लोकोत्तर व अनिर्वचनीय पुरुषकारच होय. अशा कर्माला अप्रस्थान वस्तुतःच मिळेल.

पण व्यवहारांत कर्माचा दुसरा अर्थ असा घेतात कीं, भागलव्य [illegible] नाहीं या कर्माकडून दैवापुढें किंवा नशिबापुढें कोणाचें गती नाहीं. या दृष्टीनें मनुष्य कर्तव्यापासून पराङ्मुख होतो, त्याला सर्वत्र निराशा वाटते आणि कर्माच्या प्रचंड ओघाबरोबर तो परवशतेनें वाहूं लागतो. कर्माचा हा अर्थ मनुष्याच्या प्रगतीला मोठा घातुक आहे. त्याचे प्रयत्न सर्व बंद पडतात व तो क्रियाशून्य होतो. कर्मवादानें इंडियांत अशा प्रकारचें नैराश्य फारच प्रसृत आहे. हें औदासिन्य सर्व सुधारणेला बाधक आहे. हा कर्माचा कायदा प्रयत्नालाच तिलांजली देतो. कर्मावर ह्मणजे नशिबावर हवाला सोंपवितात तेव्हां कर्माचा खरा अर्थच चुकलेला असतो. जसा एखादा कायदा असतो तसेंच नशीब समजतात. चोरी करूं नये किंवा मातापितरांनीं अर्भकाचा प्रतिपाळ केलाच पाहिजे इत्यादि आज्ञा जशा कायद्यानें घालून दिलेल्या असतात तशीच नशिबाची आज्ञा आहे असें लोक समजतात. पण माणसांनीं प्रणीत केलेला कायदा व सृष्टिशास्त्रा प्रमाणें निर्णित झालेला कर्माचा कायदा या मध्यें फार अंतर आहे. मानवी कायदा जो मोडील त्याला राजा शासन करितो. शासनाच्या भितीनें मनुष्याचा कायदा पाळला जातो. पण असें शासन सृष्टीच्या कायद्याला लागूं पडत नाहीं. सृष्टीचें शास्त्र सदा सर्वकाळ अबाधित आहे; सृष्टीचा कायदा मोडलाच जात नाहीं. जो सृष्टीचा नियम तोच कर्मवादाला लागूं पडतो सृष्टीचे नियम मनुष्याचें शरीर, बुद्धि, अंतःकरण व जीव या सर्वांसही सारखेच लागूं पडतात. सृष्टीचा मुख्य नियम हा कीं इतर सर्व उपाधि व परिस्थिती सारख्याच असतील तर ज्या कारणानें जें कार्य घडतें तें कारण व तें कार्य यांची जोड गोळी सृष्टीमध्यें सदा सर्वकाळ तशीच दिसून येईल. समान परिस्थितींतील कार्यकारणभावाचा हा परिवर्त ह्मणजे सृष्टीची मुख्य गुरुकिल्ली होय. रसायन शास्त्रज्ञ हायड्रोजन व आक्सिजन यांच्या विशिष्ट मिश्रणानें पाणी केव्हांही उत्पन्न करूं शकतो. रसायन शास्त्रज्ञाला त्याची विद्या शिकविते कीं सर्व दृश्य सृष्टी पुनः पुनः तयार करण्याची त्याच्या जवळ एक किमियाच आहे. सृष्टीचा हा अबाधित नियम ह्मणजे कार्यकारणाची परंपराच होय. ही परंपरा कधींच चुकावयाची नाहीं. एका मागून दुसरा अशा गोष्टी कार्यकारण भावाच्या परंपरेनें घडत जातील. हीच कार्यकारण परंपरा कर्मवादाला देखील सारखीच लागूं पडते.

कर्माविषयीं कार्यकारणाचा हा समवायी संबंध प्रथम समजून घेतला पाहिजे ह्मणजे प्रालब्धाहून प्रयत्न बलवत्तर आहे असें कळून येईल. कर्मामध्यें मुख्य अंगें तीन आहेत. पहिलें अंग ह्मणजे जसे त्याचे विचार तशीच त्याची अहंवृत्ती असते. दुसरें अंग वासनेचें होय. पूर्वीच्या वासनावादाच्या प्रमाणें त्याला कुल, गृह, ग्राम, राष्ट्र इत्यादि जन्मतःच उपलब्ध होतात. तिसरें अंग क्रियेचें होय. जशी त्याची चांगली वाईट क्रिया असते तसेंच उलट चांगले वाईट परिणाम त्याच्यावर घडत असतात. क्रियेच्या आघाता बरोबरच प्रत्याघात होत असतो. आपण दुसऱ्यास सुख दिलें तर त्या क्रियेचा प्रत्याघात सुखपरिणामी होतो. व दुःखकारक क्रिया दुःखदायक प्रत्याघाताला कारणीभूत होत असते.

मनुष्याला उपजतांच विशिष्ट अहंवृत्ती प्राप्त होत असते. कांहीं मुलें धीट, उदार, उतावळी व सत्यवादी असतात; त्याच्या उलट कांहीं मुलें भित्रीं, कृपण, विचारी व असत्यवादी असतात. पूर्व जन्मींच्या सात्विक रजोमय व तामसी कल्पनांचे परिणामभूत सार ह्मणजे जन्मतःच प्राप्त असलेली अहंवृत्ती होय. जसे पूर्वीचे विचार असतात तशी वृत्ती बनलेली असते. मनुष्याच्या वृत्ती मध्यें जेव्हां तामस गुणांचें प्राबल्य असतें तेव्हां त्या तामसी दुर्गुणा विरुद्ध जो सात्विक शुद्ध सद्गुण तो प्रत्यहीं जर थोडा वेळ आपण आठवीत गेलों तर दुर्गुणाचा लोप होऊन त्या ठिकाणीं सद्गुणाचा उद्गम होऊं लागतो असा अनुभव आहे. बुद्धीच्या स्फूर्तीला चालन देतां येते; त्या तामसी असल्या तर त्या सत्वगुणी बनवितां येतात. अशा रितीनें सुविचारांनीं हळूं हळूं व क्रमाक्रमानें अहंवृत्ती फार शुद्ध, प्रेमळ व मोहक बनवितां येते. भित्रें मूल धैर्यवान होतें, लहानपणींचा कृपणपणा उदारबुद्धींत मिसळून जातो, उतावळेपणा जाऊन विरुद्ध दिशेचा दूरदर्शीपणा अंगीं येतो, आणि अप्रामाणिकपणा लोपून त्या ठिकाणीं सत्यशील वृत्ती होते. इतक्या सर्व गोष्टी त्या त्या दुर्गुणाच्या विरुद्ध असलेल्या सद्गुणांच्या स्मरणीनें व चिंतनेनें तो तो सद्गुण अंगीं बसूं लागतो. सृष्टीमध्यें ज्ञान अज्ञान, सुखदुःख अंधार प्रकाश इत्यादि द्वंद्वें आहेत. हीं द्वंद्वें परस्पर विरोधी आहेत. तेव्हां ज्या विरोधी गोष्टीकडे बुद्धीचा पूर्ण भर होईल त्याचा तेथें विकास होत जाईल हें उघड आहे.

मनुष्याचे विचार बदलण्यापूर्वीं त्या त्या विचाराला स्फूर्ती देणाऱ्या वासनांचा संगम लक्षांत घेतला पाहिजे. वासना ह्मणजे विचारांची पूर्व बीजें आहेत. जी वासना प्रबळ असते ती विचार व कृती यांच्या प्रांतांमध्यें आपल्याला अनुकूल असें अंतरंग तयार करिते. पूर्वील जन्मांतील सर्व वासनांचा संचय जेवढा फलोन्मुख झालेला असेल, त्या मानानें आपणांस जन्म पृथ्वीवरील चांगल्या किंवा वाईट परिस्थितींत होत असतो; आणि ह्मणूनच आपण जो दृढ आशा धरून बसूं व जिच्याकरितां आपलें सर्वस्व खर्चूं तीच आशा फलोन्मुख होते आणि तीच फलोन्मुख वासना आपलें सर्व आयुष्य प्रचलित करीत असते. वासना ही लोहचुंबका प्रमाणें आहे. ती सर्वच आपलेंसें करित. तिचें साम्राज्य अबाधित चालतें या कारणामुळें सद्वासना नेहमीं जागृत व प्रचलित ठेविल्या पाहिजेत. ह्मणजे तिच्यामुळें विचार पवित्र राहतात आणि कृतीही शुद्ध शुद्ध होत जातात.

आपल्या क्रिया देखील पदोपदीं शिकवीत असतात कीं, आपण लोकांस आनंद दिला ह्मणजे त्याचा मोबदला आपणास आनंदांतच मिळतो. ज्या कृतीनें दुसऱ्यास दुःख होतें ती कृती दुःखपरिणामी असते. वासना, विचार व क्रिया यांचे परस्परांवर आघात व प्रत्याघात होत असतात. एकमेकांचा चांगुलपणा किंवा वाईटपणा परस्परास संस्कृत व दूषित करीत असतो. याच कारणासाठीं सद्वासना, सद्बुद्धि व सत्क्रिया हीं जागृत ठेविली पाहिजेत. जन्मतःच प्राप्त असलेल्या दोषांचें परिमार्जन हीं करूं शकतात आणि परिणामीं हीं परस्परांस पारिपोषक होतात एवढ्याच दृष्टीनें प्रयत्नांचें वर्चस्व भीष्मांनीं प्रतिपादन केलेलें आहे. पण कांहीं कर्में इतकी परिणामाभिमुख असतात कीं तेथें प्रयत्न चालतच नाहीं. ती गोष्ट अपरिहार्य असते. ती आपल्या प्रयत्नाच्या प्रांताबाहेरची असते व ती तशीच घडून येते. उदाहरणार्थ, एखादा संतापी पुरुष. तो सद्गुणी असतो, तो लोकांस फार आवडतो व तो उदार व धैर्यवान असतो. पण तो तापसी असल्यामुळें त्याला राग आला व तो क्रोधाधीन झाला ह्मणजे त्या आवेशांत त्याच्या हातच्या काठीनेंच दुसरा मनुष्य गतप्राण होतो. अशा बऱ्याच गोष्टींत त्याचें कर्म अनिवार्य होतें असें ह्मणावें लागेल. जेथें विचाराला अवसरच मिळत नाहीं, विचाराला जेथें स्थळ मिळूं शकत नाहीं व जेथें विचाराला स्फुरण मिळण्यापूर्वीच ती गोष्ट आकस्मिकपणें घडून जाते. तेथें संचित कर्म परिणामाला पोंचतें व प्रयत्न कांहीं करूं शकत नाहीं. तथापि या अपरिहार्य गोष्टी विषयीं देखील एक मोठी शंका आहे. अपरिहार्य गोष्ट कोणती याचा निर्णय होणेंच मोठें दुरापास्त किंबहुना, असंभवनीय आहे. उदाहरणार्थ, दोन सारखीं वजनें तराजूंत समतोल आहेत. दोन्हींचें गुरुत्वाकर्षण परस्परांस तोलून धरीत आहेत. तराजूंच्या कोणत्याही बाजूला नुसत्या अंगुलीचा स्पर्श झाला तरी तराजूचा कांटा त्या बाजूला तात्काळ झुकता होतो. तद्वत् कर्माची गोष्ट आहे दोन माणसांचीं कर्में उभयतांस घातुक व विच्छेदक अशीं बनलीं असतील पण अशा प्रसंगीं कचित् क्षणार्धांत विचाराचें स्फुरण एकदम त्या दोन कर्मांचें पारडें वर खालीं करून टाकील. तेव्हां सारांश हा निघतो कीं, मनुष्याच्या बहुविध व अगम्य कर्ममाले मध्यें अमूक एक कर्म अपरिहार्य आहे असें कधींच निश्चयानें सांगतां येणार नाहीं. मनुष्याची बुद्धि अगदीं कोती पडते. आणि ह्मणूनच प्रयत्न हा सर्वैव केलाच पाहिजे. प्रयत्न चालू असतानां एखाद्या अपरिहार्य कर्मानें उचल घेतली तरी देखील त्या प्रयत्नाच्या संस्कारानें पुढली सिद्धता फार सुखप्रद होत असते. प्रयत्नानें आपलें ज्ञान वाढतें, आणि ज्ञान ह्मणजे कर्माच्या नाना कार्यकारणशृंखला आपणांस समजतात त्यानंतर कर्मावर आपलें साम्राज्य होतें. आपण कर्माधीन रहात नाहीं. आणि कर्माची परंपरा कळल्यामुळें आपण कर्माचा दास्यत्व आणितों व कर्माची सृष्टी ह्मणजे आपल्या प्रयत्नाचीच सृष्टी बनते.

कर्माचा परिपाक होतो व तीं सुख व दुःख उत्पन्न करितात तेव्हां त्यांचा सुखदपणा किंवा दुःखदपणा तात्त्विक दृष्ट्या इतका तीव्र रहात नाहीं; कर्माची घटना समजल्या मुळें व त्यांची यवितव्यता प्रयत्नाच्या मार्गांत ध्वनित होत गेल्यामुळें सर्व जगाचीं राहटी पाहून दुःखांतही मनाचें समाधान नाहींसें होत नाहीं आणि संसारांतील दुःखाचा डोंगर वलांडून सुखाच्या नदी तीराला पोहोंचण्याची युक्ति प्रयत्नानें व तदनुगामी तात्त्विक दृष्टीनें चांगली करून येते.

## शिक्षण

मनुष्य जसजसा शिकतो तसतसा तो उन्नत होत जातो. शिक्षणानें त्याचें शरीर पूर्ण वाढीला पोचतें. शिक्षणानें त्याची बुद्धि विकसित होते शिक्षणानें त्याच्या मनोवृत्ती संस्कृत बनतात व शिक्षणानें तो धार्मिक व नीतीमान होतो असें हें शिक्षणाचें चतुरंग कार्य आहे. खरें शिक्षण ह्मटलें ह्मणजे मनुष्याची या चाऱ्ही अंगांनीं उन्नती झाली पाहिजे. जेव्हां शिक्षण एकदेशीय होतें तेव्हां मनुष्याचा पूर्ण विकासच होत नाहीं. शिक्षणाचें कार्य या रितीनें चुकलें ह्मणजे मनुष्याच्या पूर्ण विकासांत मोठा दोष उत्पन्न होतो. शरीर, बुद्धि, अंतःकरण व आत्मा या चार अंगा पैकीं कांहीं लंगडी पडतात इतकेंच नाहीं तर एकाच अंगाचा परिणाम अतिरेकाला पोंचून दुसऱ्या अंगाच्या विकासाची हानी होते.

शिक्षणाचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. मनुष्य सर्व जन्मभर शिकतच असतो, परंतु लहान वयामध्यें शिक्षणाचे ह्मणून जे कांहीं संस्कार त्यास घडतात त्यांवरच त्याच्या सर्व आयुष्याच्या इमारतीची उभारणी होत असते. आपल्या हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रांत फारच संकुचित व मर्यादित असा आंखलेला आहे. शिक्षण या शद्बानें मुलांचेंच शिक्षण असा अर्थ समजतात; पण शिक्षण या शब्दाची व्याप्ती मोठी आहे. त्यांत मुलींच्या शिक्षणाचा अंतर्भाव होतो. शिक्षण जसें मुलांना तसेंच मुलींनाहि अत्यंत आवश्यक आहे, आणि अलीकडे आपले लोक आपल्या मुलींच्याहि शिक्षणाकडे थोडेंसें लक्ष्य पुरवूं लागले आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

सांप्रत काळीं आपल्याकडे शिक्षणाचा एकच धोपट मार्ग चालू आहे. शिक्षणाचा सर्व भार व सर्व जबाबदारी एकट्या सरकारावर येऊन पडली आहे सरकारी शाळा गृहांतून जें एका ठरीव किंवा वर हुकूम शिक्षण मिळतें तेंच संपूर्ण शिक्षण होय असा लोकांचा पक्का ग्रह झालेला आहे. सरकारी शाळेंत घातल्या नंतर आपल्या मुलामुली संबंधानें आपणावर कांहीं जबाबदारी आहे असें लोकांस वाटत नाहीं. शाळेंतील लेखनवाचनादि व्यवसायापलीकडे शिक्षणाची कार्यभूमि फार विस्तृत आहे ही गोष्ट लोक अजिबात विसरून गेले आहेत. शाळेंतील पुस्तकी परीक्षा पास होण्या मध्येंच सर्व शिक्षणाचें सारभूत तत्व एकवटलें आहे अशा वेड्या समजुतीनें लोक खऱ्या शिक्षणाचा अनादर व अव्हेर करितात. परंतु सध्यांची क्रमिक शिक्षणपद्धती ह्मणजे केवळ अपरिमित ज्ञान भांडारगृहांत शिरण्याची एक किल्ली होय. ह्या साधनानें सर्व ज्ञानाची सिद्धी प्राप्त झाली असें समजू नये. खऱ्या शिक्षणाच्या सीमांत रेखा ह्मटल्या ह्मणजे एका बाजूस बुद्धिबलाची रेषा, दुसऱ्या बाजूस शरिरबलाची रेषा, तिसऱ्या बाजूस मनःप्रवृत्तींची रेषा, आणि चवथी कडे आत्मोन्नतीची धार्मिक रेषा होय. ह्या चतुःसीमेंतील शिक्षणाच्या प्रान्तभर आपल्या मुली व मुलगे फिरविले पाहिजेत. सध्याच्या शिक्षण पद्धतीनें बुद्धिसामर्थ्याच्या दिशेकडेस फार ओढ घेतली आहे. व बाकीच्या दिशेकडे शिक्षणानें पाठ फिरविली आहे. अशा एकतंत्री बुद्धिशिक्षणानें शरीरशिक्षणाची फारच आबाळ होत आहे. मुलांना बुद्धिशिक्षणाची कातणी सहन करण्याचा शक्तीच उरली नाहीं. मुलें अशक्त, दुबळी, फिकट व निस्तेज निपजूं लागलीं आहेत. मुलांची शरीरकाठी धष्टपुष्ट होण्यासाठीं, त्यांची शरीरकांती सतेज बनण्यासाठीं व मुलें पराक्रमी, धिप्पाड, व शूर व्हावी ह्मणून त्यांस शारीरिक शिक्षण दिलें पाहिजे. विद्यापठण जोरयंत चालू आहे तें पावेतों मुलामुलींनीं ब्रह्मचर्य व्रतानें राहावें हें फार इष्ट आहे. लहानपणी लग्नें होऊं नयेत कारण गृहसंसारानें शिक्षणावर पाणी पडतें असा अनुभव आहे.

हल्लींच्या शिक्षण पद्धतीमध्यें पुष्कळसें बुद्धीचें व थोडेसें शारीरिक ह्या दोन अंगांचेंच शिक्षण मिळतें. नैतिक व धार्मिक हीं दोन्ही अंगें वगळलीं आहेत. आणि ह्या दोन्ही अंगांचें शिक्षण मिळाल्या खेरीज विद्यार्थीजन सुशिक्षित झाला असें ह्मणणे मोठी कोती विचारदृष्टी होय. चतुर्विध शिक्षणा शिवाय शिक्षणाची परिपूर्तता होत नाहीं. पहिल्या दोन अंगांपेक्षांहि दुसरी दोन अंगें फार महत्वाचीं होत. परंतु त्या शिक्षणाचा श्रीगणेशा सुद्धां शिकविला जाऊं नये ही फार वाईट गोष्ट होय. राष्ट्राची उन्नती शरीर शक्तीवर व बुद्धि सामर्थ्यावर जितकी अवलंबून आहे तितकीच किंबहुना जास्त लोकांच्या नीती मत्तेवर व धार्मिकपणावर अवलंबून आहे: राष्ट्रांत रणशूर शिपाई पाहिजेत, बुद्धिवान् व कल्पक विद्वान पाहिजेत, तसेंच नीतिमान व धर्मनिष्ठ महात्मे पाहिजेत. ह्या सर्वांच्या जोरावर राष्ट्राचा जोर, शक्ती व सामर्थ्य वाढत असतें हिंदुस्थानांतील पूर्वीचे इतिहासप्रसिद्ध शूर गडी नामशेषच झाले आहेत. त्या पूर्वजांचें रक्त आपल्या अंगांत खेळतें आहे असें ह्मणण्याची सुद्धां आपणास लाज वाटत आहे अंगांत पुरुषार्थ नाहीं, व स्वदेशभक्तिहि नाहीं इतके हिंदुस्थानचे लोक खालावले आहेत. बुद्धिशिक्षण संबंधानें पहातां, सर्वांची उडी इकडेच पडत आहे. डाक्टर, बी. ए, व वकील हे अतोनात झाले आहेत. ही दिशा सोडून दुसऱ्या औद्योगिक व यांत्रिक गोष्टीकडे लोक आपली मुलें घालू लागतील तर धनोत्पादक धंदे नांवारुपास येऊन राष्ट्र संपन्न बनेल. पण इकडे लोकांनी अगदीं कानाडोळा केला आहे हें बरें नव्हे.

## कापसाची लागवड

बुलढाणें जिल्ह्यांत कुमार श्रीहरभामजी साहेब यांनीं चांगल्या प्रतीचा कापूस लागवडींत यावा ह्मणून सधन लोकांकडून प्रयत्न चालविला आहे. हाच उपक्रम आमचे डिपुटी कमिशनर रा. रा. रुस्तुमजी साहेब यांनीं चालू केला आहे. गेल्या शनिवारीं त्यांनीं आकोल्यास या जिल्ह्यांतील प्रमुख शेतकरी लोकांस मुद्दाम बोलाविलें होतें आणि प्रत्येक तालुक्यांतून दोन ठिकाणीं पन्नास पन्नास एकर जमिनींत जडी व बनी जातीच्या उत्कृष्ट कापसाचें बीं पेरण्याची योजना ते करवीत आहेत. हा अनुभव घेऊन पहावा आणि नंतर लोकांस चांगल्या कापसाच्या लागवडीची गोडी लावावी असा त्यांचा हेतु आहे. या संबंधानें सरकारांतून विशेष सवलती देवविण्यांत येतील तर हा उपक्रम चांगला सिद्धीस जाईल असा आह्मांस भरंवसा आहे.

## सत्कालक्षेप

गेल्या मंगळवारीं विदुषी विशांट बाई येथील थिआसाफिकल लॉजच्या निरीक्षणासाठीं मुद्दाम आल्या होत्या. त्यांच्या या भेटीचा योग मोठा आनंदप्रद झाला. त्यांनीं मंगळवारीं सायंकाळीं येथील नाटकगृहांत ' इंडियाची शिक्षण पद्धती , या विषयावर फारच सुरस, बोधप्रद व रमणीय असें व्याख्यान दिलें. दुसरें दिवशीं सायंकाळीं ' प्रालब्ध व प्रयत्न ' या विषयावर त्यांचें सुश्राव्य संभाषण झालें. भाषणाचा विषय गहन होता तथापि या बाईच्या यालवोध विचार सरणीनें, हृदयंगम वाणीनें व मनोरम शद्ब लालित्यानें हा विषय फार सुगमसा करून दिला. या ब्रह्मवेत्त्या बाईच्या जिव्हाग्रावर वक्तृत्व जणूं काय खेळत आहे असें वाटतें. थिऑसॉफिकल पंथाच्या या बाई एक महात्मा आहेत व त्यांच्या ग्रंथांनीं ब्रह्मविद्या सर्वांस समजण्या सारखी सुलभ करून ठेविलेली आहे. बुधवारीं सकाळीं या बाईंनीं लोकांच्या निरनिराळ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन त्यांचें समाधान केलें.

गुरुवारीं विदुषी बाई उमरावतीस गेल्या व त्याच संध्याकाळीं त्यांचे हातून तेथील ब्रह्मविद्यालयाच्या मंदिराचा प्रवेशसमारंभ करविण्यांत आला. या मंदिराचा उपयोग प्रभु कार्याकडे, करण्या विषयीं त्यांनीं फार कळकळीचा बोध केला. ईश्वरभक्तीचा सर्व जिव्हाळा भूतदयेंतच आहे. मनुष्यमात्राविषयीं दया जागृत ठेवली ह्मणजे ईश्वरसेवा घडते. ईश्वर सर्व सुखांचा दाता आहे तेव्हां अशा सेवेनें तें मंदिर पवित्र होतें आणि असें मंदिर ही एक आनंदाची भूमी बनते. येथें लोकांच्या मनांला गायनादिकांनीं आल्हाद वाटावा, येथील पुस्तकांच्या वाचनानें ज्ञानवृद्धि होत जावी, येथील समारंभांना लोकांमध्यें सहनुभूतीची प्रेरणा व्हावी, येथील वादाविवादा पासून शांतता व समाधान हीं लोकांस प्राप्त व्हावीं आणि या मंदिराच्या वातावरणामध्यें सुरम्य विचार सदोदित भरल्या मुळें येथील चुंबककर्षणानें सर्व लोकसमूह ईश्वरी सच्चिदानंदाला पावला असें बाईंनीं आपल्या संभाषणांत चांगलें व्यक्त करून सांगितलें.

काल व आज मिळून दोन व्याख्यानें नागपुरास होणार आहेत. विदुषी बाईच्या या सफरीनें मध्यप्रांतांतील या भागाच्या लोकांचा एक आठवडा फार आनंदांत गेला. इतक्या विद्वद् गोष्टी क्वचितच ऐकण्यास मिळतात. कारण

। सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति ।

## वऱ्हाडवृत्त

**आगमन**— अलिशान नामदार चीफ कमिशनर सर ले‍ली साहेब यांचा मुक्काम चार दिवस आकोल्यास आहे या मुळें हें शहर अगदीं गजबजून गेलें आहे. व अधिकारी मंडळी आदरसत्काराच्या कार्यचक्रांत अगदीं गढून गेलेली आहेत.

येत्या एप्रिल १ ले तारखेपासून इंग्रजीमराठी शाळांतील १ ली व २ री या इंग्रजी इयत्तांचा अभ्यासक्रम मध्यप्रांतांच्या म्यानुअल प्रमाणें सुरूं करण्याविषयीं हुकूम झाला आहे.

### कडक थंडी

गेल्या दहा बारा दिवसां पासून फार कडक थंडी पडत असते. इतकी थंडी गेल्या तीस चाळीस वर्षांमध्यें पडली नव्हती असें सांगतात. थंड व झोंबणारा वारा सुटतो व त्यानें सर्व अंग फुटून जात. अंगाला या थंडीनें एका प्रकारची फूट लागली आहे; कितीही वस्त्रावरणें अंगावर असलीं तरी त्यांच्या आंतून शरीराचीं रंध्रें बंद झालेलीं उलत आहेत कीं काय असा भास होतो. गेल्या दोन दिवसापासून हें हवामान पालटत आहे. या हवामानाचा संबंध सध्यां सूर्यावर दृश्यमान होऊं लागलेल्या डागाशीं लोक लावीत आहेत. उत्तर हिंदुस्थानांत ही थंडी फारच विलक्षण असून पाणीही गोठत असतें.

कापसी येथें व तसेंच कांहीं खेड्या पाड्यांतून प्लेगाची वृद्धि होत आहे. जानेवारीच्या शेवटील सप्तकांत वऱ्हाडांतील प्लेगाचें प्रमाण येणें प्रमाणें:—

| जिल्हा | प्लेगाचे मृत्यु |
|---|---|
| आकोला | ७८ |
| बुलढाणा | ४२ |
| उमरावती | ७ |
| इलिचपूर | ३४ |
| | १३१ |

या वरून सध्यां आमच्या जिल्ह्यांत या रोगाचें मान जोरावर आहे.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें २४। | चांदी ७६ |
| ज्वारी ४६-४७ | जवस ८? |
| गहूं काठे ६० | बनशी ८९ |
| सरकी | ९ |
| तूप | ९॥ रु. मण |
| तेल | ४॥। रु. मण |
| रुई | रु. १४ |
| कपाशी | ३९।४० |

**नामी तोंड**— लहानपणीं मुलांचीं लग्नें करण्याची अनिष्ट चाल बंद करण्याच्या उद्देशानें हेसूर सरकारनें एक कायदा केला. मुलींचीं बाळपणीं लग्नें करून देणाऱ्यास ह्या कायद्यानें दंडाची शिक्षा सांगितली आहे पण ह्या कायद्यानें ती अपायकारक चाल बंद न पडतां बालविवाहांचा क्रम त्या संस्थानांत सपाट्यानें चालूंच आहे जे लोक अशीं लग्नें करून देण्यास तयार होतात, त्यांनीं कायद्यांतून सुटण्यासाठीं दंडाच्या रकमा लग्न-खर्चांत आधींच निराळ्या काढून ठेवण्याचा क्रम सुरू केला आहे. व दंडाचें प्रमाण कमी असल्यामुळें दंड खुषीनें भरून लोक पूर्वीप्रमाणेंच अशीं लग्नें करण्यांत कायद्याचें भय मुळींच मानीतनासे झाले आहेत.

**अंगास खिळे बोंचत नाहींत**— ट्रान्सव्हालांतील एक तरुण मनुष्य बारीक टोंकाचे खिळे उभे करून टेवून त्यांवर हवा तितका तो लोळतो, परंतु त्याची कातडी कासवासारखी असल्यामुळें खिळे त्यांत रुतत नाहींत; एवढेंच नव्हे, करकोचा देखील चामडीला पडत नाहींत ! ! !

**सूर्यावर डाग**— सूर्यावर एक फार मोठा डाग हल्लीं दृष्टीस पडतो व तो साध्या काजळ धरलेल्या कांचेंतून-ही सकाळीं ९ वाजण्यापूर्वी सहज दिसतो असें पुण्याच्या वेधशाळेनें प्रसिद्ध केलें आहे.

### चुक नव्हे मोठा खिळा आहे—

एक विलायती नवविवाहित तरूण दंपत्य आगगाडींत बसून जात होतें. वाटेंत एका स्टेशनावर कोणी एक तरुण स्त्री त्याच डब्यांत येऊन बसली. या दंपत्यांपैकीं नवरा एक गमतीचें पुस्तक वाचण्यांत गर्क होऊन गेल्यामुळें त्याला ती परकी स्त्री केव्हां येऊन बसली हें समजलें नाहीं. पुढें एक मोठा बोगदा आला. गाडी बोगद्यांत शिरतांच चहुंकडे अंधेर झाला, तेव्हां सहजच त्या राजश्रीनें हातांतलें पुस्तक खालीं टेऊन अंधेर आहे तोच गमतीनें आपल्या बायकोचें चुंबन घेण्याचा प्रयत्न केला. पण जागा चुकून बायको ऐवजीं त्या परक्या स्त्रीचेंच त्यानें चुंबन घेतलें ! अर्थात ती अतिशय संतापली. तो प्रकार पाहून बायकोहि मत्सरानें लाल "झाली. शेवटीं नाकदुऱ्या काढून दोघींचीं समजूत घालतां घालतां त्या गृहस्थाला पुरेवाट झाली !

**मोटार गाडीची क्रांति**— लंडन शहरांत मोटारगाड्यांचा प्रसार इतका झाला आहे कीं, कांहीं दिवसांनीं तेथें घोड्याची गाडी पाहण्यास सुद्धां मिळावयाची नाहीं असें लोक ह्मणूं लागले आहेत.

### सबंध घर उचलून दुसरीकडे नेलें

—अमेरिकेंत नुकताच एका कारखानदाराची मोठी इमारत पहिल्या जागेपासून उचलून सुमारें तीन चार मैल दूर नेऊन उभी करण्यांत आली. हें करितांना मध्यें नदी आली, ती ओलांडण्या साठीं तें घर एका कोळशाच्या जहाजावर चढविण्यांत येऊन ठरलेल्या ठिकाणीं नेमण्यांत आलें. अमेरिकन लोकांच्या बुद्धिचातुर्याची कमाल झाली.

### दुष्ट हवामान

—सिंधप्रांतांत अतिशय थंडी पडत आहे. गेल्या २२ साव्या तारखेस जाकोबाबाद येथें पारा बावीस डिग्रीवर उतरला होता. ह्या शहरच्या उत्तरेकडील प्रांतांत तर ज्यास्तच थंडी पडली होती. वरांतील भांड्यांतील सर्व पदार्थ बर्फ बनलें होतें. व अग्नीच्या साह्याशिवाय पाण्याचा बिंदुही कोणास लभ्य नव्हता. बर्फ पडल्याच्या योगानें पिकाची अतिशय नासाडी झाली आहे व थंडीनें पुष्कळ पक्षीही मरून पडलेले आढळण्यांत आले.

—गेल्या आठवड्यांत पडलेली थंडी कोठेवाडांत इतकी कडक होती कीं, उघड्यावर निजलेले शेतकरी वगैरे लोक सकाळीं मेलेले आढळले ! आग्र्याकडे तर ओढे डबकीं गोठून गेलीं. माणसेंही दरीच दगावून थंडीच्या कडाक्यानें गहूं, हरभरे हीं पिकें निखे नाश पावलीं आहेत ! शेतकऱ्यांस सारा की सूट देण्यावांचून आतां गत्यंतर नाहीं असें समजतें !

—यंदा सर्व हिंदुस्थानभर भयंकर थंडी आहे. गेल्या आठवड्यात पारा अंशाच्या खाली १९ अंशावर होता व सिमल्यास ० अंशाखाली १४ अंश होता.

— काश्मिरांत सुमारें पंधरा मैल पर्यंतचा सगळा रस्ता बर्फानें झांकला गेला आहे.

**नवी टारपेडो**— निकोला टेस्ला नांवाच्या प्रसिद्ध विद्युत शास्त्रज्ञांनें एक नवी टार्पेडो शोधून काढली आहे. ती सध्याच्या अतिशय मोठ्या तोफेपेक्षांही जास्त नाश करणारी व बिनचूक नेम मारणारी असून तिला कशानेंही अडथळा येऊं शकणार नाहीं अशी आहे.

### देदीप्यमान दिवा.

युनायटेड किंगडममधील आइल आफ वाइटच्या सेंट कॅथेराइन लाइट हौसमध्यें एक अत्यंत मोठा प्रकाश पाडणारा दिवा ठेवण्यांत आला आहे. या दिवाच्या प्रकाश पांच पांच सेकंडांनीं १९०००००० मेणबत्यांच्या प्रकाशा इतका पडतो.

**नागाशीं झटापट**—सोलापूर येथें अण्णाराव महालिंगप्पा ढंगे हा रात्रीं आपल्या दुकानांत निजला असतां, एका नागानें त्याच्या गळ्यास विळखा घालून त्याच्या डोक्यावर त्यानें आपली फणी धरली होती. आणखीहि बराच प्रकार त्या नागानें केला. व अखेर कोणास दुखापत न करतांच तो नाग निघून गेला.

### मोठा परिवार

—थर्सो नांवाच्या एका शहरीं ८७ वर्षांचे एक वृद्ध गृहस्थ एका मोठ्या कारखान्याचे सुपरिंटेंडेंट आहेत, व याच कारखान्यांत त्यांचे सात मुलगे, सहा जावई, २९ नातू, चार नातजावई, आणि दोन पणतू काम करीत असतात या प्रमाणें एका घराण्यांतील ४९ मनुष्यें एकाच कारखान्यांत एकच धंदा करीत एकाच ठिकाणीं गहत असलेलीं पहावयास सांपडणें ही गोष्ट विशेष आश्चर्याची आहे.

### मंत्राचें सामर्थ्य

बेळगांव येथें नुकताच एक चमत्कार घडून आला. तेथील माळावर गुरें चरत असतां त्यांपैकीं दोन ह्मशींस एका मोठ्या सर्पानें दंश केला. त्याबरोबर एक ह्मैस तत्काळ मरण पावली. दुसरी संध्याकाळीं परत घरीं येत असतां अर्ध्या रस्त्यांत तोंडाला फेस येऊन पडली. हें वर्तमान ह्मशीच्या मालकांस समजतांच त्यानें एका मंत्र्यास बोलावून आणलें त्यानें तरवडाचा पाला आणिला व तोंडानें मंत्र ह्मणत दंश झालेल्या ठिकाणीं त्या पाल्याचा मार चालविला. या प्रमाणें सुमारें अर्धा तास चालल्यावर ह्मैस चांगली शुद्धीवर येऊन तेथून पळत आपल्या घरीं गेली या वरून अद्याप आपल्या लोकांत मंत्रसामर्थ्य प्रसंगीं दृष्टोत्पत्तीस येतें.

**नवी युक्ति**—रशियांत प्रेत जपून ठेवण्याची एक नवीन युक्ति निघाली आहे ती ही कीं, प्रेतावर कांचेच्या रसा एक पुट देऊन त्याच्या भाजूबाजूनें कांचेचा रस ओततात त्या योगानें आंतील प्रेत दिसून आंत हवेचा प्रवेश न होतां तें ज्यास्त दिवस तसेंच रहातें.

**लबाड कंपनी**—जमिनी गहाण ठेवून कर्जाऊ पैसा देणारी एक कंपनी कलकत्त्यास निघून तिनें इकडील कित्येक वर्तमानपत्रांत जाहिराती दिल्या होत्या. जेवढें कर्ज पाहिजे असेल त्यांवर शेंकडा ९ प्रमाणें बयाणा घेण्याचा या कंपनीचा परिपाठ होता. त्या प्रमाणें पुष्कळ पैसा कलकत्त्यास रवाना झाला हल्लीं असें बाहेर आलें आहे कीं ही कंपनी राय नांवाच्या एका बंगाली बाबूची लोकांस ठकविण्याची युक्ति होती. बाबू साहेबांचे दोन एजंट खाडीलकर उपनांवाचे सांगली येथील तरुण गृहस्थ होते, त्यांवर हल्लीं खटला चालूं आहे.

### कोहिनूरपेक्षां मोठा हिरा

ट्रान्सवालमधील प्रिमियर नांवाच्या खाणींत एक मोठा हिरा सांपडला असून तो कोहिनूरच्या हिऱ्यापेक्षां मोठा आहे. ही खाण सर्व जगांत मोठा असून तींत मोल्यवान हिरे सांपडतात. ह्या नवीन हिऱ्याचें वजन ३०३२ कॅरेट आहे. ज्यावेळीं कोहिनूरचा हिरा साफ करण्यांत आला त्यावेळीं त्याचें वजन १८६॥ कॅरेट होतें. पण जशा स्थितींत तो सांपडला तशा स्थितींत त्याचें वजन केलें असतें तर तो ३०० पासून ८०० कॅरेट वजनाचा भरला असता असा अंदाज आहे. ह्यावरून कोहिनूर हिऱ्यापेक्षां हा नवीन हिरा सोळा पटीनें अधिक वजनाचा असावा असें दिसतें.

**लांकडाच्या टोप्या**—जपानांत एक प्रकारचें चमत्कारिक लांकूड सांपडतें. त्याचा तेथील लोक स्त्रियांस घालण्यासाठीं उत्तम टोप्या बनवितात. ह्या टोप्यांचा उपयोग अमेरिकेंतील लोक फार करितात. प्रत्येक वर्षी जपानांतून १९ लक्ष ९० हजार रुपयांच्या टोप्या अमेरिकेला रवाना होतात. जपानांत ह्या टोप्या तयार करण्याचे कारखाने १२० असून तेथील माल सर्व युरोपभर खपतो.

### एक नबाब पदभ्रष्ट झाले.

कर्नूल जिल्ह्यांतील नबाब सय्यद फत्तअली खानबहादूर सी. एम. आय. यांनीं उधळपट्टीनें खर्च करून कर्ज करून ठेविलें, त्यावरून सरकारांनीं त्यांस वरंवार इषारा केला असतांही त्यांचें वर्तन सुधारलें नाहीं. सबब मद्रास सरकारानें हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें सदर नबाबास पदभ्रष्ट केलें आहे. त्यांच्या राज्याचा कारभार हिंदुस्थान सरकारने आपल्या हातीं ठेविला आहे. नबाबाला त्यांच्या राज्याच्या उत्पन्नातून कांहीं नेमणूक मिळणार आहे.

### एक अपूर्व चमत्कार

काश्मीरांत तिबेटांतून दोन लामा आले आहेत ते ह्मणतात कीं, आमचा गुरू तिबेटांत होता. त्यानें मरणापूर्वी आह्मांस बोलावून सांगितलें होतें कीं मी अमक्या दिवशीं मरणार आहे. व त्यानंतर माझा अवतार काश्मीरच्या राजघराण्यांत हल्लींच्या महाराजाचे येथें होणार आहे. तेथें भुझी भेटण्यास यावें म्हणजे मी तुमच्याशीं बोलेन. त्याच्या दिवसानीं काश्मीरांत युवराजाचा जन्म झाल्यावर ते दोघ शिष्य लामा काश्मीरास आले व त्यांनीं महाराजांच्या भेटीची इच्छा दर्शविल्यावरून महाराजांनीं भेट दिली. राजपुत्र हा आमचा गुरू आहे. व याची खण ते दोन महिन्यानें मूल आमच्याशीं बोलूं लागेल असें त्यांनीं सांगितलें. महाराजांनीं त्यांनीं आणखी चार महिने थांबण्यास सांगितलें आहे. हे दोघे लामा भविष्य बरोबर सांगतात असा काश्मीरच्या लोकांचा विश्वास बसला आहे ही गोष्ट खरी होईल तेव्हां होवो पण मौजेची आहे खचीत.

**रेडीयमचा विलक्षण गुण**—रेडियम धातूत असा विलक्षण गुण आहे कीं नासुरासारखा रोग त्यापासून बरा होतो इतकेंच नव्हे परंतु अंधळेपणाही जातो असें राबर्ट जॉन्स नांवाच्या एका युरोपियन डाक्टरानें प्रयोग करून पाहून प्रसिद्ध केलें आहे.

### तांब्याचा गुण

—तांब्याच्या भांड्यांत पाणी भरून ठेवल्यानें तें शुद्ध रहातें; व रोगकारक जंतूंचा नाश होतो असा नुकताच शोध युरोपच्या शास्त्रज्ञांनीं लावला बाहेर आला आहे.

**दुसऱ्याशीं कसें बोलावें**—बोलतांना दीन वाणें तोंड करूं नये. दुसरा मनुष्य बोलत असतां आपण त्याच्या घरांतील जिनसाकडे दृष्टी फिरवूं नये. आपण थोडें बोलावें व दुसऱ्याचें पुष्कळ ऐकावें, तें मूर्खपणाचें असलें तरी चिंता नाहीं. बोलतांना प्रश्न पुष्कळ करावेत, पण उद्गारवाचक शब्दांचा उपयोग कमी करावा.

**आनंदाचें वृत्त**—सातारच्या छत्रपतींचे वंशज श्रीमंत अण्णासाहेब महाराज व श्रीमंत भाऊसाहेब महाराज ह्मांस त्यांच्या कैलासवासी वडिलांची दरमाहा २९०० रुपयांची नेमणूक तहहयात देण्याचें इंग्रज सरकारानें ठरविल्याचें आनंदवृत्त प्रसिद्ध झालें आहे.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत....१ रु
दर ओळीस..........८।०६
दुसरे खेपेस..............८।

All Subscriptions to be paid in advance
Single copy ........................ 2 as

Advertments
Below 10 lines ..... 2 Rs
Per line over 10......3 as
Repetitions Per line...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXIX AKOLA MONDAY 20 FEBRUARY 1905 NO 8

वर्ष ३९ आकोला सोमवार तारीख २० माहे फेब्रुवारी सन १९०५ इ० अंक ८

श्रीमंत रा. सा. मल्लापाअण्णा वारद,
सोलापूर–यांनीं अनुभव घेऊन पसंत केलेल्या

**वझेकृत कफनाशक गोळ्या.**

लहान मुलांस कफ दाटून श्वास लागतो, खोकला येतो, कफ थुंकतां येत नाहीं, दूध किंवा अन्न खावेनासें होऊन मुखें घाळ पडतात, ज्याला–

**पोटांतलें, डबा, सुशी,**

असें म्हणतात, त्यांवर अगदीं रजा न होतां खातरीनें

**दोन तासांत गुण देणाऱ्या**

अनेक डॉक्टर, वैद्य यांच्या वीस वर्षांच्या अनुभवानें आबालवृद्धादि सर्वांस सारख्या उपयोगी ठरलेल्या.

अनुपान कागदावर
५ गोळ्यांची कुपी ० ५.
२५ ,, ,, १ रु.
१०० ,, ,, ३ रु.

गोळीनें असर न्हा. वे. फार्मसीनें मिळतील. ग्राहकांना फक्त पोष्टानें नावासह सुबक अमाप. व्यापाऱ्यांस कमिशन मिळेल त्याचा भाव समक्ष अगर पत्रद्वारें करावा.
मालक—वि. वि. वझे, सावंतवाडी.

### नोटीस

रा. रा. पंढरी बद्दल मानाजी मांकडे कुणबी राहणार सद्रामपुर तालुके मळकापूर जिल्हा आकोला यास:—

नोटीस देणार देवकरण गिरधारीलाल साहु दुकान पिंपळगांव काळे ता. मलकापूर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमची शेती मौजे पळशी येथील सर्वे नंबर १२६ व नीरो येथील सर्वे नंबर २४. अशीं दोन्ही शेतें तुह्मास मी आहण्यास संमत १९५८ साला पासून वहितीस दिली असून त्याचें स्वमक्तेव दरसाल १९१ घेण्याचें ठरले असून त्या-प्रमाणें समंत १९५८ सालचे रुपये १९९ तुह्मी वसूल दिला बाकीचे संमत १९०९ ते समंत १९६१ पावेतों तीन वर्षांची रक्कम रुपये ५८९ व शिवाय व्याज तुमचे कडून येणें असून अद्यापि दिले नाहीत करितां ही नोटीस पावल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत रकम व्याजासुद्धां न पटविल्यास तुमचेवर फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धां रकम वसूल केली जाईल. व आमची शेती आमचे ताब्यात घेऊं. कळावें ता. १६।२।०५ इ०

सही
देवकरण गिरधारीलाल तर्फे
कुलमुखत्यार शिवराम जय-
कृष्ण पिंपळगांवकाळे

### धर्मार्थ

**विंचवावर औषधी**

वृश्चिक दंशावर रामबाण व झटपट गुण देणारें १२ मनुष्यांस पुरेल इतकें औषध धर्मार्थ. ट. ह. अर्धा आण्याचें तिकिट पाठवा.
कुलकर्णी कंपनी.
गिरगांव बॅंक रोड
मुंबई.

### जमिनी संबधानें माहिती

मशागत व नांगरणी यांतील फरक—हे दोन शब्द अगदीं भिन्न आहेत नांगरणी म्हणजे नांगरानें जमीन नांगरून मागच्या जागींच हलवून टाकणें. मशागत या शब्दाचा अर्थ ज्यास्त व्यापक आहे. नांगरणी म्हणजे मशागतीचा एक प्रकार जाहला. वखरणें, खणणें, मोगलणें वगैरे मशागतीचे किंवा लागवडीचे अनेक प्रकार आहेत त्यांस नांगरणी असें म्हणतां येत नाहीं ह्याच्या योगानें जमीन साफ व मऊ होते मशागत चांगली केली असतां ती जमीन खालपर्यंत मऊ, साफ व आर्द्र राहते

जमिनीची मशागत खोल केल्या पासून फायदे:–जमिनीची मशागत खूप खोल करणें फार फायदेशीर आहे. अशा जमिनींत पिकांची मुळें पुष्कळ खाल जाऊन त्यांना आपलीं पोषकद्रव्यें व जमिनींतील आर्द्रता शोषून घेण्यास ठीक पडतें मशागत अगदीं खोल पर्यंत केल्यानें जमिनींतील वनस्पतिपोषक द्रव्याचा सांठा वाढविला जातो व अधोभूमिकेंत हवा शिरून तिची क्रिया अद्राव्य पदार्थावर होते व ते वनस्पति पोषणास योग्य अशा द्राव्य रितींत येतात. शिवाय वनस्पतीस अपायकारक जे क्षार जमिनीच्या पोटांत असतात ते जमिनीच्या कणांतील केशाकर्षणशक्ती मोडल्यामुळें वर येत नाहींत. जमिनीवर जो पाऊस पडतो तो सर्व अधोभूमिकेंत जिरतो आणि चांगली नांगरली सवरलेली जमीन हवेंतून अधिक आर्द्रता व हवा शोषून घेते त्यामुळें वनस्पती व पिकें यांना पाणी मुबलक मिळतें व त्यामुळें ती सूर्याच्या अति प्रखर उष्णतेपासून सुद्धां बचावतात.

खोल नांगरणी केल्यापासून तोटे:- जमिनीची खोल नांगरणी करणें वाईट नाहीं हें खरें तथापि वरच्या जमिनी पासून सर्व प्रकारें भिन्न अति माती नांगरून एकदम वरच्या सुपीक अशा जमिनींत मिसळणें कधींही हितावह होणार नाहीं. अशी भूमिका ( जमिनी खालचा थर ) फारच हलकी आतशय चिकण, अगदीं मोकळी अथवा कीं तींत वनस्पतींना अपायकारक असे कांहीं पदार्थ असतील तर ती खोल नांगरून वर आणण्यांत शेताच्या सुपीकतेस पुष्कळ धक्का बसण्याचा संभव आहे. अशी जमीन दरसाल अर्धा अर्धा इंच या मानानें खोल नांगरीत जावी, म्हणजे क्रमा क्रमानें तींत सुपीकता येते.

---

### शिक्षण

सध्यां पाश्चिमात्य लोकांच्या सर्व गोष्टींचें आंधळ्या दृष्टीनें अनुकरण करण्याचा सपाटा चालला आहे. परंतु हिंदुस्थानाला त्याच्या कालदेश वर्तमाना प्रमाणें जें इष्ट असेल तेंच घेतलें पाहिजे. आपलेंपणा म्हणून जो एक अभिमान पाहिजे आहे तो हिंदुस्थानच्या लोकांस अगदीं परका झाला आहे. स्वत्व व राष्ट्रीयत्व त्यांच्यांतलें लोपत चाललें आहे. पाश्चिमात्य गोष्टींनीं त्यांस इतकें आपलेंसें करून सोडलें आहे कीं, आपली स्वकीयत्वाची लूगच ते विसरले आहेत. दुसऱ्याच्या चांगल्या गुणांचें अनुकरण करणें इष्ट आहे परंतु ज्या प्रमाणें दुसऱ्या राष्ट्रांतील रुपें असलें तरी त्यावर आपल्या राष्ट्राचा शिक्कामोर्तब पडल्यावर ते रुपये चलनी होतात त्याचप्रमाणें दुसऱ्यांचें आपण कांहींहि घेतलें तरी तें जशाचें तसें कोरें न घेतां त्यावर आपल्या राष्ट्रीयत्वाचा छाप मारून नंतर आपल्या व्यवहारांत तें आणावें. हें युक्त होय.

शिक्षण कसें पाहिजे, कोणतें पाहिजे वगैरे गोष्टी राष्ट्राच्या स्थितीपरिस्थितीवरून ठरवाव्या लागतात. इंग्लंडाकडे स्त्रियांना व पुरुषांत एकच शिक्षण दिलें जातें आणि तेंच वळण आपल्याकडे ओढलें आहे. पण तिकडे स्त्रियांना पुरुषा प्रमाणेंच आपल्या पराक्रमावर पोट भरावें लागतें आणि यामुळें स्त्रिया व पुरुष हे जीवनयात्रेंत एकमेकांचे प्रतिस्पर्धी बनतात. परंतु तशी स्थिती इकडे नाहीं. पुरुषांचीं व बायकांचीं कर्तव्यें निरनिराळीं असून दोघेहि परस्परांचे सहाय करीत असतात. सर्व संसाराची मांडणी दोघांच्याएक विचारानें करावयाची असते. पुरुषांची कार्यभूमि बाह्यसृष्टी होय. व स्त्रियांची गृहसृष्टी होय, नुसतें लिहिणें वाचणें शिकल्या म्हणजे त्या सुशिक्षित झाल्या असें नव्हे. हिंदुस्थानांतील स्त्रिया पाकशास्त्रपारंगत असल्या पाहिजेत. त्यांना वैद्यशास्त्राची थोडी माहिती पाहिजे; त्यांना गृहकर्माचें ज्ञान पाहिजे. मुलाबाळांची जोपासना कशी करावी हें त्यांस समजलें पाहिजे. सारांश स्त्रिया मातृपदवीला योग्य होऊन त्या थोरपदाचीं कृत्यें करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं आली पाहिजे. त्या चांगल्या बायका होतील, चांगल्या आया होतील. चांगल्या मुली होतील व चांगल्या बहिणी होतील असेंच शिक्षण त्यांस पाहिजे. सध्यांच्या स्त्रियांत व पूर्वीच्या स्त्रियांत महदंतर दृष्टीस पडतें. सध्यांच्या स्त्रिया अक्षरशत्रु नाहींत पण सुशिक्षित आहेत असें म्हणतां येत नाहीं. पूर्वीच्या आयाबायांना लिहितां वाचतां येत नसेल पण त्या खरोखर सुशिक्षित होत्या यांत शंका नाहीं. पूर्वीच्या स्त्रियांची धार्मिक, नैतिक, मानसिक व शारीरिक चारही बाजूंनीं परिणती होत असे, आणि त्या गृहसंसारांत आपल्या पतीस बापास, मुलास, भावांस कार्यकर्त्री मंत्री असत. आपल्या कीर्तन पोथ्यापुराणांतुन व कथाकीर्तनांतून जें उच्च शिक्षण स्त्रियांना मिळत असे त्याचा आतां लोप झाला आहे. तसलें शिक्षण आपल्या स्त्रियांना पाहिजे आहे. खरें पाहतां सध्याचें स्त्रीशिक्षण म्हणजे शिक्षणच नव्हे.

शिक्षणाची जबाबदारी आईबापांनी म्हणजे घरच्या कर्त्या मनुष्यांनीं ओळखली पाहिजे. सरकारी शाळांच्या यंत्रद्वारें खऱ्या शिक्षणाची प्राप्ती होणें अशक्य आहे. युरोपांतील प्रत्येक शाळेंत आपापल्या धर्माचें शिक्षण मुलांस मिळत असतें. परंतु हिंदुस्थानांतील मुलांना धर्मशिक्षण बिलकुलच मिळत नाहींसें झालें आहे. या मुळें लोकांचा कल नास्तिक होण्याकडे फार वळला आहे. धर्माचीं बंधनें मनुष्यास मोठा नीतिमान, सद्गुणी व सद्वर्तनी करितात. धर्माचा शास्ता नसला तर नुसतें नीतिशिक्षण सुफलदायी होत नाहीं असा फ्रान्संत चांगला अनुभव आलेला आहे. धर्माच्या तत्वांनीं नीतितत्वें चांगलीं ठसतात. धर्मशिक्षण देतांना एक गोष्ट मात्र विशेष लक्षांत ठेविली पाहिजे कीं, दुसऱ्याच्या धर्माबद्दल अनुदारता किंवा द्वेष उत्पन्न होऊं नये. बनारस येथील सेंट्रल हिंदुकॉलेज व अलीगर येथील मुसलमानी कॉलेज ह्या दोन संस्थांनीं हें धार्मिक शिक्षणाचें कार्य मनावर घेतलें आहे. व त्यांत त्यांस चांगलें यश येत आहे. अशा तऱ्हेनें धार्मिक शिक्षण देण्याचें काम सर्वांनीं आपण होऊन आरंभिलें पाहिजे. धर्मशिक्षणांत हात घालावयाचा नाहीं असें सरकारी धोरण आहे, अर्थात सरकारावर अवलंबून न राहतां या धर्मशिक्षणाच्या कामीं सर्वांनीं झटणें अवश्य आहे.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १ शके १८२६

## राजदर्शन

राजपुरुषांचा समागम रयतेला मोठा कल्याणप्रद होत असतो. अलिशान नामदार सर लेली साहेब हे सध्यां आमच्या प्रांतांत फिरत आहेत तेव्हां त्यांच्या या सफरीचा लाभ बहुत प्रकारें आह्मांस होईल असा भरंवसा आहे. प्रत्यक्ष पाहणीनें पुष्कळशा गोष्टींचा सहज उलगडा होतो. आमच्या प्रांताच्या कारभाराची जी मोठी क्रांती चालू आहे तिची पूर्णता होण्यापूर्वी असा प्रत्यक्ष भेटीचा योग आला आहे हें सुचिन्ह होय. पण सरकारि मौनव्रत अशा समागमाचा हेतु किंचितही सिद्धीस जाऊं देत नाहीं; आणि तशीच निराशा लोकांस वाटू लागली असेल तर त्यांत लोकांचा मोटासा दोष नाहीं.

मौनव्रताची दीक्षा सर लेली साहेबांनीं घुगारून दिलेली नाहीं, तथापि ते फार सदगुणी, मनमिळाऊ व प्रेमळ अधिकारी दिसतात. रयतेशीं सुखसंवादाच्या गोष्टी करण्यात अशी त्यांची मनापासून इच्छा आहे. लोकांचे मनोरथ समजून घेण्याची त्यांस मोठी हौस आहे आणि या संबंधानें गुजराथेंत जो त्यांचा चांगला लौकिक आहे त्याची प्रचिती आमच्या येथेंही आली. सर लेली हे लवकरच पेनशनदार होणार आहेत तरी देखील त्यांस वऱ्हाडाची पूर्ण माहिती मिळवि ण्याचा व नव्या स्थानिक सरकाराचे संकल्प मुखेंसेनें विदित करण्याचा कंटाळा तिळमात्र नाहीं.

## सुखसंवाद.

येथील मुक्कामाला सर लेली साहेबांनीं जिल्ह्यांतील प्रमुख वतनदार मंडळी बोलावून आणविली होती. ठळक ठळक अधिकारी एकत्र जमविले होते. व्यापारी, वकील व इतर सुखवस्तु रयत यांच्यापैकीं निवडक गृहस्थांच्या निरनिराळ्या रितीनें भेटी घेतल्या. रा. रा. रुस्तुमजी साहेब यांनीं मुद्दाम आमंत्रणें पाठवून सर्व जिल्ह्यांतून नानाविध धंद्यातील अग्रणी लोक एकत्र केलें व सर्वांच्या भेटी करून दिल्या. गेल्या बुधवारीं रात्रीं ९॥ वाजतां चीफ कमिशनर साहेबांच्या तंबूवर ही सर्व मंडळी जमली होती. सर लेली साहेब त्यांच्याशीं बोलत बोलत पुष्कळांस व्यक्तिशः कुशलप्रश्न विचारीत असत, हवामानाच्या गोष्टी करीत, दुष्काळांत मदत देणाऱ्या सद्गृहस्थांचें अभिनंदन करीत, व्यापार उदिमाच्या गोष्टी काढून या प्रांताची माहिती मिळवीत, कपाशीच्या व्यापारावर असलेला या जिल्ह्याचा सर्व श्रेष्ठपणा निदर्शनास आणीत आकोल्याच्या मुनसिपालिटींत करांची योजना करण्या संबंधानें आपला अभिप्राय ध्वनित करीत; आणि अशा प्रकारें संभाषणाचा क्रम चालू ठेवून वरील वर्णनाच्या नानाविध गोष्टी त्यांनीं सरासरी एक तासभर चालविल्या होत्या. हा सुखसंवाद फार गोड व मनोरंजक वाटला; पण अशा संभाषणामुळें लोकांस त्यांच्या दर्शनाचा चांगला लाभ झाला पण सरकारी बाजूच्या गोष्टी अगदीं काळजी पूर्वक वगळल्यामुळें लोकांच्या उतावळ्या मनाचा मोठाच हिरमोड झाला. या सुखसंवादाचा खरा लाभ लोकांस जितका व्हावा तितका झाला नाहीं हें व्यक्तविण्यास आह्मास संकोच वाटतो.

---

## शिष्टाचारलोप.

सरकारी पुरुषाच्या दर्शनाला लोक जातात तेव्हां त्यांस आपला पूर्ण सन्मान व्हावा असें वाटत असतें. लौकिकी मोठेपणा, दरबारीशिष्टाचार व राजमान्य संप्रदाय हे अक्षरशः पाळले जावेत अशा विषयीं सर्व राष्ट्रांचें एक मत आहे. पण या संबंधानें वरील सुखसंवादाच्या प्रसंगीं एका विवक्षित गोष्टींत मोठें न्यून दिसलें. अलिशान नामदार चीफ कमिशनर यांनीं आमंत्रित मंडळीच्या करमणुकीसाठीं ब्यांड मुद्दाम आणविला होता व उपहारार्थ देखील योजना करविली होती. या उपहारांत चहा, काफी, दारू वगैरे पदार्थ मांडले होते व हे पदार्थ हिंदु लोक खेरीज इतर जातीवाल्यांस चालण्या सारखे होते. पाहुण्या मध्यें पुष्कळजण हिंदु होते पण त्यांच्या संबंधानें कांहींच योजना नव्हती इतकेंच नाहीं तर त्यांस साहेबी उपहाराच्या तंबूकडे जाण्यास विनंतीही करण्यांत आली तेव्हां अपमानावर दुःशद्वाचें ताडण केल्यासारखें बहुतजणास वाटलें हा जो अनादर झाला तो रा. रा. रुस्तुमजी साहेब यांस बिलकूल आवडला नसला पाहिजे. तो अनादर ह्मणजे त्यांनीं निमंत्रण केलेल्या पाहुण्यांचा होता. हिंदु गृहस्थांसाठीं निराळी फळफळावळीची योजना करितां येण्यासारखी होती. साहेबांच्याही उपहाराची योजना नसती ह्मणजे कोणीच कांहीं एक उद्गार काढला नसतां वरील प्रकारची चूक फार मोठी आहे आणि ती चूक याच दृष्टीनें क्षम्य आहे. उपहाराची गोष्ट सोडा, पण सामान्य पानसुपारी, अत्तरगुलाब, व पुष्पगुच्छ हीं देखील निरोप देण्यापूर्वी वाटली नाहींत ह्मणून मोठी दिलगीर वाटते. नामदार सर लेली साहेब या शिष्टाचाराच्या गोष्टी कसे विसरले याचें नवल वाटतें; कदाचित् हाताखालील लोकांच्या विस्मरणामुळें किंवा नजरचुकीमुळें हा प्रकार घडला असावा असें आह्मी अनुमान करितों. हा शिष्टाचाराचा लोप इतस्त्र पुनरुक्त होऊं नये ह्मणून आह्मी वरील दोष दाखविण्याचें धार्ष्ट केलें आहे. आमचा संप्रदाय अशा गोष्टींचा उल्लेख करण्याचा नाहीं पण भावी सुधारणेवर दृष्टी देऊन हें सीमोल्लंघन आह्मी केलें आहे.

---

## सलाम

सलामा विषयीं अलिकडे फार दंडेली दिसते. ही दंडेली शाळांतील मुलांवर होऊं लागली आहे. विद्यार्थ्यांस चांगली रीत लागावी ह्मणून केव्हां केव्हां शिष्टाचाराची गोष्ट रा. रा. क्यांडी साहेब मुद्दाम करवितात असा अनुभव आहे. पण विद्यार्थ्यांनें सलाम केला नाहीं ह्मणून त्यास वेत्रदंडाची शिक्षा करावी असा नवा नियम त्यांनीं नुकतांच घालून दिला आहे. हा नियम त्यांनीं कोठें लिहून ठेविलेला नाहीं पण शिष्टाचाराच्या इतर नियमा प्रमाणें सलामाच्या नियमाचा बोध सर्वत्रांनीं करून घ्यावा असा त्यांचा मानस दिसतो. या नियमाची व्याप्ती सर्वत्र कळावी ह्मणून आमच्या येथील एका गृहस्थांनीं एक घडलेली गोष्ट इंदुप्रकाशांत प्रसिद्ध केली आहे. त्या गोष्टीचा मावार्थ इतकाच कीं, रा० रा० क्यांडी साहेब हे रस्त्यानें चालले होते व त्यांच्या बाजूनें दोन विद्यार्थी जात होते व त्यांनीं इनस्पेक्टर साहेबांस सलाम केला नाहीं ह्मणून त्यांनीं रागानें छडीचा उपयोग केला व त्या मुलांस हेडमास्तराकडे पाठवून त्यांस शिक्षा करविली. राजश्री क्यांडी साहेब यांना स्वतांस सलामाचें महत्व नाहीं असें आह्मी समजतों. पण विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठीं त्यांचा भगीरथ प्रयत्न चालू आहे ह्मणून आह्मी त्यांचे आभार मानावें तितके थोडेच. विद्यार्थ्यांस सद्रीति लावण्या संबंधानें त्यांचा संकल्प फार स्तुत्य आहे,

पण वरील प्रकारांत चूक मोठी होत आहे. याचें कारण राजश्री क्यांडी साहेब यांचें अज्ञान होय. विद्यार्थ्यांनीं सलाम केला नाहीं ही त्यांची चूक नाहीं. तो त्यांचा पिढीजाद सभ्यपणा होय. आमच्या समाजाचा असा कायदा आहे कीं, गुरुस्थानाच्या मंडळीचें पादवंदन करावें. पादवंदन प्रसंगानें व स्थळ महात्म्यानें करावें आणि नित्याच्या परिपाठांत मौनवंदनाचा प्रकार चालू ठेवावा. मौनवंदनाचा प्रकार असा कीं विद्यार्थ्यानें मर्यादेच्या अंतरावर तटस्थ राहावें, थोर वडील माणसाला पुढें चालू देऊन नंतर मागून चालावें, दक्षिण भागाला त्यास घेऊन बाजूस सरावें. नेत्रादि संकेतानें आदर प्रदर्शित करावा, मुखाची किंचित् लीनता ठेवावी इत्यादि श्रेष्ठजनांचें वंदन करण्याचे प्रकार पुष्कळसे मुग्ध आहेत. ते अनुवंशिक रितीनेंच व्यक्त होत असतात व विद्यार्थी मंडळी मध्यें उपमर्दाचा प्रकार आह्मांस निदान दिसत नाहीं.

शिवाय आमच्या समाजाच्या रूढीप्रमाणें सलाम करण्याचा अधिकार विद्यार्थ्यांस पोंचतच नाहीं. जो नमस्कार करितो त्याला नमस्कृत माणसानें नमस्कार केलाच पाहिजे असा नियम आहे. तेव्हां विद्यार्थ्यानें नमस्कार केला तर आशीर्वाद देण्याच्या अधिकारी गृहस्थाला आशीर्वचनाच्या स्थळीं नमस्काराचा पवित्रा स्वीकारावा लागेल. ही गोष्ट नमस्काराची अनवस्था करील ह्मणून विद्यार्थी सलाम किंवा नमस्कार करीत नाहींत. हा गढ शिष्टाचार रा० क्यांडी साहेबांस कळत नाहीं हें आमचें दुर्भाग्य होय. पश्चिम व पूर्व या दोन्ही दिशा समोरा समोर आहेत. पश्चिमेकडील कल्पना व पूर्वेकडील कल्पना अगदीं भिन्न व विपरीत आहेत शिष्टाचाराच्या प्रकरणांत निदान पश्चिमेला पूर्वे पासून पुष्कळशा गोष्टी शिकल्या पाहिजेत असें आह्मी पुनः पुनः राजश्री क्यांडी साहेबांस विनयपूर्वक कळवितों.

मातापितर, विद्यागुरु, अन्नदाता, इत्यादिकांस तीर्थाचा महिमा देत असतात पण त्या गुरुस्थानाची मंडळी जेव्हां स्थानास्थित असतील व जेव्हां त्यांचा आशीर्वाद मागण्याचा योग असेल तेव्हांच "लहान मंडळी गुरुचरणीं" नमस्कार घालतात. परंतु नित्यशः कोणी आइबापाला नमस्कार करीत नाहीं. वधूवर गृहप्रवेश करितात तेव्हां गुरु जनांचें पादवंदन करून त्यांचा आशीर्वाद घेतात. तसेंच विद्यार्थी जेव्हां बक्षीस मिळवितो तेव्हां तो गुरुचरणीं लीन होतो. हे शिष्टाचार सलामाचा हात फिरवितांना कधींही पाळले जाणार नाहींत. सलामाच्या दंडेलीनें सद्रीतीचे अंकूर मात्र नष्ट होतील.

---

व्यवहार हा मोठा खोटा आहे. तो उभय पक्षामध्यें फार वितुष्ट आणितो. जी जीवस्य कंठस्य अशी प्रेमी मंडळी त्यांच्यांतच तो न भूतो न भविष्यति असें वैर मांडतो. जो स्नेहसंबंध अंतःकरणाच्या प्रेमपाशानें आपण जोडतो तो एका व्यवहाराच्या सुरीनें कापला जातो. व्यवहाराच्या या असल्या घातकी कृत्यांचें प्रदर्शन नित्यशःचें आपल्या डोळ्यापुढें आहे. तरी व्यवहार हा अबाधित व अनादिअनंत असल्या कारणानें तो नाहींसा ह्मणून कालांतरींही व्हावयाचा नाहीं. व्यवहार हा चाललाच पाहिजे व्यवहार दुनियेचें कर्तें कांडच होय. त्याच्या अंगांत लोकांचीं मनें तोडण्याचा जसा दुर्गुण आहे तसाच त्यांचीं मनें जोडण्याचा सद्गुणही त्याच्या ठिकाणीं वास करीत आहे. व्यवहारामुळें दोघांची एकत्र भेट होते, स्नेहभाव जडतो व परस्परांचीं मनें इतकी तन्मय होऊन जातात कीं त्याच्यांतील भिन्नभाव नष्ट होतो. सारांश व्यवहार ही जगाची चालक शक्तीच होय पण व्यवहार हा किती दुष्ट आहे पहा ! एकीकरणाचें काम साध्य होतां क्षणींच तो आपल्या प्रतिक्रियेचा उपचार करण्यास प्रारंभ करितो. हळू हळू परस्परांच्या मनांत संशयवृत्ती उठतात व तदनुसंगानें एकमेकाची सर्व कृत्यें विपरीत भासूं लागतात. थोड्याच काळांत कलीचा उद्भव होतो व शेवटीं कलुषित झालेल्या मनांचीं अखेर परस्परांचें अहित चिंतण्यांत व वैर साधण्यांत होत. असला हा चमत्कारिक व्यवहार आहे. याच्या छंदानें मनुष्यास उपरती होऊन तीं वैतागून गेलेलीं आहेत. व्यवहारांत फारसें लक्ष्य नसावें असें ह्मणतात त्याचें हेंच कारण असावें व्यवहार मनाजोगा झाला नाहीं ह्मणजे जो दुःखावेग होतो तो फार असह्य असतो व्यवहारामुळें सुखाची झोंप अंतरते, नित्य जीव काळजींत राहातो आणि सुखानंदासाठीं जी मांडणूक मांडावी ती अखेरीस दुःखाची सांठवण होते. व्यवहार हा अमृताचा पेला आहे पण त्याचें प्राशन यथाकाळ व यथानियम न होईल तर मात्र त्याच अमृताचें विष बनतें. या व्यवहाराची मीमांसा आजपर्यंत कित्येक तत्वज्ञ करीत आले आहेत पण त्यांचा निर्णय स्पष्टसा कोठेंच दिसत

नाहीं. परंतु सरासरी त्या निर्णयाची दिशा अशी दिसते कीं, मनुष्यानें आपण होऊन सद्भावानें वागावें ह्मणजे व्यवहार परिणामीं सुखद, गोड व आनंददायी होतो. एतदर्थ व्यवहार हा फार संभाळून व जपून कसा करावा हेंच मुख्य शिकलें पाहिजे.

मनुष्य जेव्हां एखादा व्यवहार करितो तेव्हां तो अगदीं मोकळ्या मनानें, सढळ हातानें व सरळपणानें करितो. प्रथमारंभीं विश्वासावर सर्व गोष्टी घडून जातात. पण पुष्कळ प्रसंगीं त्या विश्वासाचा दुरुपयोग फार होतो आणि मग मनुष्यास त्या व्यवहाराबद्दल पश्चात्ताप करावा लागतो. असा प्रसंग सहसा येऊं नये ह्मणून प्रारंभालाच सावधगिरी ठेवावी. व्यवहारास आरंभ करण्याच्या वेळेस भीड सोडून द्यावी. व्यवहारास रतिनरती चोख असावें. त्यांत भीड मुरवत कामाची नाहीं. ज्यांच्याशीं आपण व्यवहार करणार ते आपले पक्के शत्रू आहेत, निदान ते शत्रू होण्याचा संभव आहे, अशा समजुतीनें व्यवहाराच्या कार्याची उठावणी करावी. प्रसिद्ध बेकन तत्ववेत्ता असें ह्मणत असे कीं, आपल्या स्नेह्याजवळ देखील गोष्टी करितांना तो आपला कधीं काळीं शत्रू होईल तेव्हां त्या गोष्टी आड येणार नाहींत अशा धोरणानें आपलें भाषणही नियमित ठेवावें आणि हाच नियम सर्व व्यवहारास चांगला लागू पडतो. पूर्वींच्या काळीं नुसत्या शब्दावर व बिनबोभाट मोठमोठे व्यवहार घडत असत. पण तसा विश्वास ठेवून व्यवहार करण्याचा सांप्रतचा मनु नाहीं. इंग्रजी राज्यांतील न्याय मंदिरांमध्ये तर तोंडाच्या शब्दास किंमतच येत नाहीं. लोकांची नैतिक विचार दृष्टी अलीकडे जरी मोठी विस्तृत झाली आहे तरी कांहीं बाबतींत ती फार कोतीच आहे. खरें बोल ह्मटल्यानें मनुष्य खरें बोलत नाहीं इतकेंच नाहीं तर पुष्कळसे लोक देवाच्या शपथेवरहि बिनधडक जाणून बुजून खोटें सांगण्यास प्रवृत्त होतात. कित्येकांचा तर हा खोटी साक्ष देण्याचा धंदाच झाला आहे. थोड्याशा लाभा साठीं व द्रव्याच्या लोभानें हें पाप करण्यास मनुष्य धजावतो व परमेश्वराच्या नुसत्या स्मरणानें पाप वासना ज्या दुरावत असत तो पापभीरूपणा नाहींसा झाला आहे. पूर्वींच्या धार्मिक शिक्षणामुळें पापमार्गांत पाय टाकण्यास उचलतां क्षणींच जो अविचारी मनास अंकुश टोंचत असे तो नाहींसा झाल्यामुळें मनःपूत आचरण करण्या इतकी लोकांचीं मनें खालावलीं आहेत अशा परिस्थितींत व्यवहार कसून व नियमानुसार असावा हें बरें. नुसत्या वचनावर विश्वासून उपयोगाचें नाहीं. आपणांस पुढें ह्या व्यवहाराची शहानिशा न्याय मंदिरांत यथासांग व यथाशास्त्र करावी लागेल हें धोरण लक्षांत ठेविलें पाहिजे. आपले लोक इतके कलहप्रिय झाले आहेत कीं, न्याय दरबारीं जाऊन तिसऱ्याच्या हातानें पुरें माप पदरांत बांधून घेतल्याखेरीज त्यांस कधींहि समाधानी वाटत नाहीं. आपसांत, सलोख्यानें, चार चौघांच्या सल्ल्यानें एखादें प्रकरण तें मिटतें घेतील अशी गोष्ट होणें नाहीं. मनुष्यप्रणीत कायद्याच्या मंगळसूत्राच्या जोरावर ते आपल्या योग्य हाविभागा पेक्षां जास्त वाटा मिळावा व दुसऱ्याचा भागहि त्यांस न मिळतां तो आपणांसच लाभावा ह्मणून आपल्या सद्वासना बाजूस सारतात. न्यायासना पुढें नेहमीं न्याय्यच मिळतो असें नाहीं. पुष्कळ वेळां कायद्याच्या तराजूंत खोट्याचें खरें व खऱ्याचें खोटें माप पडतें. ह्मणून कायद्याच्या शास्त्राप्रमाणेंच आपण व्यवहार केला पाहिजे. सर्व व्यवहार इत्थंभूत कागदोपत्रीं सहीसूचांनीं मंडित असा असावा ह्मणजे न्यायदरबारींहि तो बाधत नाहीं. इतक्या गैर विश्वासानें कामें करावीं असें सांगणें फार कटु वाटेल पण तोच विहित मार्ग होय हें विसरूं नये.

व्यवहार ज्या इच्छेनें आपण करितो तो सुफलदायी व्हावा या साठीं तो शास्त्रोक्त झाला पाहिजे. कायदेशास्त्र नको असल्यास एका गोष्टीची मनाशीं पक्की गांठ मारली पाहिजे कीं, आज जो व्यवहार मी करीत आहे. तो मला लाभो वा न लाभो, त्याचा पुनश्च उच्चार मी करणार नाहीं व त्या व्यवहाराचा न्याय मागण्यास न्यायमंदिरापुढें उभें राहणार नाहीं. अशाच मनानें व्यवहार केला ह्मणजे परिणामीं मनास रुखरुख लागत नाहीं.

शास्त्रोक्त व्यवहार केल्यानें किंवा उदारबुद्धीनें केल्यानें, व्यवहारांत बिघाड आला असतांहि मनास क्षुब्ध होण्यास कारण राहत नाहीं. व्यवहारदक्षता ती हीच होय. व्यवहारांत पडले असतां मार्गांत जे तीक्ष्ण धारेचे कांटे लागतात ते लागूं नयेत ह्मणून व्यवहार हा चांगला करण्यास प्रत्येकानें जपावें.

---

रा. रा. गणेश बापूजी उटगीकर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, वाशीम यांनीं आपल्या कामाचा चार्ज रा. रा. धोंडू हरी ढाकेगकर आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस दिला व या आठवड्या पासून त्यांनीं सरकारी कार्याची कलम खाली ठेविली व पेनशनीच्या काळाला प्रारंभ केला. त्यांची चाकरी एकंदर साडेतीस वर्षें झाली. सन १८७४ सालीं जुलै महिन्यांत प्रथम यांस बुलढाण्यास डिपुटी क्लार्क आफ कोर्टाची जागा मिळाली. त्याच दर्जावर उमरावती व इलिचपूर येथें त्यांची बदली झाली. पुढें सहा वर्षांनीं ते क्लार्क आफ कोर्ट झाले. कांहीं दिवस ते मुलकी शिरस्तेदार व जुडिशिअल कमिशनरचे डिपुटी क्लार्क होते. १८८१ च्या एप्रिलमध्यें ते तहशिलदार झाले व त्या हुद्यावर ते बाळापूर, दर्यापूर, इलिचपूर व अकोट या ठिकाणीं पांच सहा वर्षें पर्यंत होते. पुढें ८६ सालीं ते एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर होऊन चार वर्षांनीं येथील स्मालकाज कोर्टाचे न्यायाधीश झाले. मध्यंतरी १८९९ च्या मार्च पासून तीन वर्षें पर्यंत हे हैदराबादेला वऱ्हाडच्या कारभाराचे हेड क्लार्क होते व कांहीं दिवस ट्रान्सलेटरही होते. त्यानंतर अलिकडचीं सहा वर्षें ते वाशिम, मलकापूर, इलिचपूर व उमरावती येथील दिवाणी कार्टाचे न्यायाधीश होते. एकंदरीनें हे आपल्या चाकरींत स्वतांच्या कर्तबगारीनें चांगल्या हुद्याला चढले व सरकारदरबारांत चांगल्या वजनदारीनें व दक्षतेनें ते आपलीं कामें करीत असत. यांचे वडील कै० बापूजी रंगनाथ हे एक्स्ट्रा असि० कमिशनर असल्या मुळें प्रारंभाला यांस वयाचे २४ वे वर्षींच डिपुटी क्लार्कची जागा मिळाली. जसा चाकरीचा प्रारंभ चांगला झाला तसा तिचा शेवटही चांगला उत्कृष्ट झाला हें त्यांत भूषणावह होय. चाकरीवर असतांना यांनीं सरकारी अधिकाराचा जोरा कोठें दाखविला नाहीं व गोडीगुलाबीनें सर्वांबरोबर वागून आपल्या वडिला प्रमाणेंच त्यांनीं लौकिक संपादन केला आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो.

सरकारी माणसाची चाकरी संपली ह्मणजे ते निरुपयोगी होतात व त्यांचा नित्याचा अंमलदारीचा उद्योग सुटला ह्मणजे त्यांस निरुद्योगामुळें कांहीं करमत नाहींसें होतें व खरा विश्रांतीचा काळ जड व कंटाळवाणा होत असतो असें ह्मणतात पण तसा प्रकार राजश्री गणेश बापूजी हे होऊं देणार नाहींत असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. विश्रांतीच्या काळाचा चांगला विनियोग करण्यासाठीं त्यांनीं पूर्वींच कांहीं स्वतंत्र उद्योग योजून ठेविला असला पाहिजे असें आमचें अनुमान आहे. विश्रांतीचा काळ सुखानें व आनंदानें जाण्या इतका मनापुढें निराळा व्याप व कार्यक्रम उभा पाहिजे व तो ज्याचा त्यानेंच शोधून काढला पाहिजे. आह्मी मात्र इतकें सूचवितों कीं ही सरकारी मंडळी अधिकारावर असतांना कोणत्याच सार्वजनिक कार्याला फारशी मदत करीत नसतात, व त्यांच्या कडे हें ऋण पुष्कळसें सांचलेलें असतें तेव्हां त्या कर्जाची फेड करण्याचा प्रयत्न पेनशनदार मंडळीनें अवश्य करावा. आमच्या या सूचनेचा आमचे मित्र चांगला आदर करितील व स्वतां कृतकार्य होतील अशी आह्मांस उमेद आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— थंडी चांगली आरोग्यकारक अशी पुनः पडत आहे पण मध्यंतरीं जो वारा सुटतो व अंगाला झोंबतो तो नकोसा वाटतो. किरकोळ दुःखणीं वाढलीं असून प्लेगाचें पाऊल पुढें आहे.

नवीन दवाखाना— मुंबईच्या ग्रँट मेडिकल कालेजांत शिकलेले डाक्टर विश्वंभर प्रभाकर लिमये एल. एम अँड एस. यांनीं येथें नवीन दवाखाना काढला आहे.

आलिशान नामदार चीफ कमिशनर सर हेली साहेब यांची स्वारी १६ वे तारखेला येथून निघून उमरावतीस गेली तेथें त्यांचा मुक्काम एकंदर पांच दिवस होता. उद्यां साहेब बहादूर इलिचपुरास जाऊन दोन दिवसांनीं परत येतील व रेल मार्गानें जबलपुरास जातील

रा. रा. हनुमजी फईजी, डिपुटी कमिशनर यांची स्वारी बाळापूर तालुक्यांत फिरत असून पुढील मुक्काम येणें प्रमाणें होतील.

| तारीख | मुक्काम |
| --- | --- |
| २० फब्रुवारी. | पातूर |
| २१ | शाळराजुरा |
| २२ | आलेगांव |
| २३, २४ | निखलवाडा |
| २५ | चान्नी |
| २६ | पिंपळगांव |
| २७ | व्याळें |

रा. रा. गोपाळ वामन बापट एक्स्ट्रा असि. कमिशनर हेही बाळापूर तालुक्यांत वार्षिक पाहणी निमित्त फिरत असून सस्ती वाहळें, लाखनवाडा, चानी, आलेगांव, पातूर या मार्गानें मार्च ३ रे तारखे पर्यंत अकोल्यास परत येतील.

रा. रा. बाळकृष्ण यंधूजी चौकळ बी. ए. एल एल. बी. नायब तहशिलदार मंगरूळपीर यांस वाशिमास बदलेले असून रा. रा. रामचंद्र नारायण साठे नायब तहशिलदार, वाशीम यांस मंगरूळास आफि. तहशिलदार नेमण्यांत आलें.

४ फेब्रुवारीला संपणाऱ्या आठ वड्यांत प्लेगाचें मान या प्रांतांत वाढलें असून जिल्हे वारीनें आंकडे येणें प्रमाणें:—

| जिल्हा | प्लेगाचे मृत्यू |
| --- | --- |
| अकोला | ३१ |
| बुलढाणा | ११९ |
| उमरावती | १६ |
| इलिचपूर | ११ |
| एकूण | १७७ |

---

## आकोला बाजारभाव

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| हुंडी दर्शनी | ९९॥। | | |
| सोनें २४। | | चांदी | ७६ |
| ज्वारी | ४६–४९ | मगस | ८२ ते ८४ |
| गहू काठे | ६० | बनशी | ८९ |
| हरभरा | | | ९५२ |
| तूप | | | ९॥ रु. मण |
| तेल | | | ४॥। रु. मण |
| रुई | | | रु. १४ |
| कपाशी | | | ३९।४० |

---

## जाहीर नोटीस.

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाज यंदा आकोलें येथें तारीख २२ व २३ एप्रील सन १९०५ शनिवार व रविवार इसवी रोजीं भरणार आहे. तरी सदहू समाजाचे सभासदांनीं आपली वर्गणी यंदाचे स्थानिक सेक्रेटरी यांचेकडे परस्पर अगर आपले गांवासाठीं एजंट मुक्रर केले असल्यास एजंटचे मार्फत लवकर रवाना करण्याची कृपा करावी. रा० रा० शंकर नारायण डांगे, (१) रामचंद्र विष्णु नहाजनी, (२) वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर यांस यंदाचे स्थानिक सेक्रेटरी नेमलेले आहेत. कळावें. ता० १८।२।०५ इ०

रशियन पत्राची चिथावणी— " सर्व युरोपियन राष्ट्रांनीं लक्ष द्यावें ! अशार वेळ आहे. जपानाला चिरडून टाकणें अत्यंत जरूरीचें आहे. हें कांहीं एकट्या रशियाचेंच काम नाहीं. सर्वांनीं इकडे लक्ष पुरविलें पाहिजे. "

सपवाल्याचें उद्गार— " निःशस्त्र व गरीब मजुरावर हत्यार चालविणाऱ्या शेंदाड शिपायानो, जपानी वीरापुढें मात्र तुह्मी पाठमोरे होऊन कां पळून जातां? त्यांच्यापुढेंही येथल्यासारखाच पराक्रम कां गाजवीत नाहीं ? "

बंदुकीचा टप्पा— आधुनिक बंदुकीची गोळी ९९० यार्डावर एकापुढें एक उभे असलेल्या तीन घोड्यांच्या शरीरांतून पार जाऊं शकते याच्या निम्म्या अंतरावर असलेल्या चार घोड्यांना चीत करते किंवा मध्यें असलेल्या झाडांच्या बुध्यांतून पार घुसून पलीकडे उभ्या असलेल्या मनुष्याला ठार मारूं शकते.

—एका सहामाहींत अमेरिकेंतल्या पांच शहरातल्या शाळांतील, आठ वर्षांपासून चवदा वर्षांच्या आंतल्या वयाचे १६००० विद्यार्थी एकदम ढोकें फिरल्यामुळें किंवा पुढें अभ्यास रेटत नाहीं ह्या सबबीवर शाळेंतून काढून घेण्यांत आले. हें पाहून तिकडचा अभ्यासक्रम सोपा करण्याची खटपट सुरू आहे. आमच्या इकडे कसा प्रकार आहे ?

राक्षसी लोक— आर्तिक महासागरांत एक वर्षभर सफर करून नेंसेन नांवाचा एक गृहस्थ परत आला आहे. तो ह्मणतो, ' आमचें गलबत ग्रीनलंडच्या नैऋत्यकोनास लागलें असतांना त्या बेटाच्या अंतर्भागांतून एक राक्षसी मनुष्यांची टोळी आमच्या गलबतापाशीं आली; यांतील अगदीं सुजा प्राणी सात फूट उंचीचा असून सगळ्यांत उंच नऊ फूट उंचीचा होता ! त्यांचा वर्ण तांबडसर असून आकृति अमेरिकेच्या जुन्या रहिवाशांप्रमाणे होती.

उदार स्वार्थत्याग— लढाईमध्यें बाप मरून जीं जपानी मुलें पोरकीं झालीं आहेत त्यांची जोपासना करून त्यांना शिक्षण देण्याचें काम जपानी सरदारांच्या स्त्रियांनीं आपल्या अंगावर घेतलें आहे. या कार्याकरितां त्यांनीं आपले सर्व चैनीचे खर्च बंद केले असून दागदागिनेही विकून टाकिले आहेत.

जनावरांचा फन्ना— हल्लीं खानदेशांतून आगगाडीनें डब्बेचेडब्बे भरून गाई, बैल वगैरे गुरें मुंबईच्या कसायखान्याकरितां रवाना होत आहेत. निर्जीव झाडांचा संहार होऊं नये ह्मणून फारेस्टचा कडक कायदा सरकारानें केला. तसा शेतकीस लागणाऱ्या सजीव गुरांच्या रक्षणार्थ सरकारानें एखादा कायदा करावा.

पत्रकाराचें उद्गार— गेल्या आठवड्यांत पास झालेल्या युनिव्हर्सिटीसंबंधाच्या बिलाविषयीं लिहितांना इं. प्र. कर्ते लिहितात ' ही बिलरूपी शिळा या नांवानें जनतेवर आदळली ' हें ऐकून जरी विषाद वाटला तरी निदान आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कर्झनशाहाच्या दुसऱ्या हप्त्याची सूचक अशी ही नांदीच आहे आणि युनिव्हर्सिटीच्या कायद्याशीं तुलना करून पहातां पोलादाच्या शस्त्राला रुप्याचें मुलामा होय असें आह्मांस वाटतें.

√ भयंकर मनुष्य -- सुरेंद्रनाथ बानर्जी हा एक मोठा भयंकर मनुष्य आहे; सत्तावन साल पुनः घडवून आणण्याची त्याची खटपट आहे, असें विलायतेंत एका बड्या अधिकाऱ्यानें बोलून दाखविलें !

दुष्ट गोळी—चुकून गोळी लागून हिंदी मनुष्याचा प्राण निघून गेल्याचें तार्जे वर्तमान मिदनापुराहून आलें आहे. मि० वुड नांवाचे एक युरोपियन आपल्या एका सवंगड्यास घेऊन शिकारीस गेले होते त्या सवंगड्याजवळ एक भरलेली बंदूक होती; ती फुटदिशीं उडाली आणि गोळी जी निघाली ती तिच्या मार्गांत एक गरीब ' नेटिव्ह ' आल्यामुळें त्याच्या अंगांत घुसून तिनें त्याचा प्राण घेतला ! पुढें ठरल्याप्रमाणें माजिस्ट्रेटसाहेबांपुढें खटला जाऊन आरोपीस १६० रुपये दंड करण्यांत आला. या रुपयांपैकी शंभर रुपये मयताच्या बायकोस देण्यांत आले आहेत. नेटिवाच्या प्राणाची किंमत १०० रुपये धरली, ती कांहीं थोडी नाहीं !

### चमत्कारिक यंत्रें.

—एक पत्र पाठविण्याचें मजेदार यंत्र निघालें आहे. त्यांत एक आणा टाकावा व आपल्याला काय मजकूर कळवावयाचा असेल तो त्यांत बोलावा; ह्मणजे त्यांत ठेवलेल्या फोनोग्राफांत पत्र येतें व ते त्या यंत्राच्या कंपनी मार्फत इच्छित ठिकाणीं पाठविलें जातें तेथें ती बांगडी फोनोग्राफवर लावून बोललेला मजकूर जशाच्या तसा ऐकतां येतो.

–एक नवीन तारेचें यंत्र निघालें आहे त्याचे योगानें एका मिनटांत २००० शब्द पाठवितां येतात, व मौज ही कीं तारयंत्रा. नेंच टाईप रायटर लिहिलें जातें.

–एक समुद्राचा तळ दिसणारें यंत्र निघालें आहे. त्याच योगानें पाण्याचे आंत ३६० फूट ठेवलेलें वर्तमानपत्र वाचतां येतें. या यंत्राचे योगानें समुद्रांत बुडालेले बायकर वगैरे पुष्कळ जिनसा काढल्या.

साहेब तो साहेब— इंग्लंडांत बेक नांवाच्या साहेबांवर खटला करण्यांत आला होता. या खटल्यांत पुढे असें दिसून आलें की, मि. बेक यांस विनाकारण कैदभोगावी लागली, आणि त्रास झाला. ही गोष्ट सरकारच्या नजरेस आल्याबरोबर ब्रिटिश ट्रेझरींतून त्यांना २००० पौंड नुकसानी बद्दल देण्याचें ट्रेझरीनें ठरविलें. परंतु ही रकम फार थोडी असल्यामुळें बेक साहेबांनीं ती घेण्याचें नाकारिलें. यानंतर पुनः ट्रेझरीनें विचार करून बेक साहेबांस ५००० पौंड देण्याचें ठरविलें आहे. आपल्या नामदार टिळकांवीही अशीच गोष्ट होती. पण टिळक हे साहेब नाहींत तेथें कसें करितां?

एका विद्वान स्त्रीचे उद्गार— संसारांत पुरुष व स्त्री हें एकमेकांचें जोडीदार आहेत. पुरुष ह्मणजे ज्ञान स्वरूप होय व स्त्री ह्मणजे प्रेम स्वरूप होय. दोन्ही स्वरूपांचा मिलाफ व्हावा असा ईश्वरी संकेत आहे. पुनर्विवाह, वैधव्य, व वेष या सर्व गोष्टी प्रत्येकाच्या मर्जीवर असाव्यात. परंतु योग्य मार्ग ह्मणजे जन्म मृत्यु प्रमाणें विवाहही एकवारच होणें रास्त.

साहेबाची आख्यायिका—

एकदां मुंबईस एक प्रतिष्ठित एतद्देशीय गृहस्थ आपल्या चलाख घोड्याच्या गाडींतून पुढें चालले होते व पाठी मागून एक गौरकाय ' साहेब ' आपल्या रुडुखुडू चालणाऱ्या घोड्याच्या गाडींतून येत होते. पुष्कळ धडपड केली तरी ' साहेबां ' ची गाडा पुढें जाईना; त्याबरोबर ' नेटिव ' माणसांची गाडी ' साहेबां ' च्या गाडीपुढें रहावी हा अपमान सहन न होऊन लागलीच त्या तल्लख गौरकायानें त्या देशी सभ्य गृहस्थांस त्यांच्या या असभ्य वर्तनाबद्दल शासन करण्यांकरितां ह्मणून चाबूक उगारला ! हे गौरकाय दुसरे कोणी नसून खुद्द सर लो व्हॅरन् हेच होत.

पक्का प्रौढ विवाह— नॉरफोक मधील पुलहॅम सेंट मेरी चर्चमध्यें नुकताच एक जरठ वधूवरांचा विवाह झाला. वधूचें वय ७८ वर्षांचें व वराचें वय ७२ वर्षांचें होतें.

विलक्षण कायदा— मोराव्हिया मधील वेस्टन नांवाच्या गांवा म्युनिसिपालिटीकडून रस्त्यांत विडी ओढण्याची मनाई करण्यांत आली आहे व जो कोणी रस्त्यांतून विडी ओढीत जाईल त्यास जबर दंड करण्यांत येतो.

स्त्रियांचें कर्तव्य— प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचें असें ह्मणणें आहे कीं, स्त्रियांनीं आपल्या मुलांची उत्तम प्रकारची काळजी घेणें एवढेंच त्यांचें कर्तव्य आहे. पुरुषाप्रमाणें इतर धंदे करण्याची त्यांस जरूर नाहीं. त्यांनीं एवढें आपलें कर्तव्य चांगल्या रीतीनें बजाविलें ह्मणजे झालें.

जोड्यांच्या दुकानांतील रीत— जपानांत जोड्यांच्या दुकानांत एक मोठा प्लॅटफार्म केलेला असतो, त्यावर गिऱ्हाइकास प्रथम बसवितात. नंतर एक मुलगी चहाचा पेला भरून आणिते व तो गिऱ्हाइकापुढें ठेवते. तो चहा घेत घेत गिऱ्हाईक आपल्यास जो माल पाहिजे असेल तें दुकानदारास कळवितो. त्याप्रमाणें माल काढण्याविषयीं नोकरास सांगून दुकानदार गिऱ्हाइकाजवळ येऊन बसतो, व गोष्टी सांगूं लागतो. एखादा मनुष्य, स्त्री अगर मुलगी यांच्या पायांत ज्या तऱ्हेचा जोडा दिसेल त्यावरून त्यांची जात ओळखतां येते.

रुक्मिणी हरण — एक अंमलदार एका नाटकांतील मुख्य काम करणाऱ्या स्त्रीवर फार आषक होऊन रंगभूमीवर ती स्त्री काम करीत असतां एकदम स्टेजवर चढला. व तिला दोन्ही हातांनीं उचलून मोठ्या चलाखीनें बाहेर तयार ठेवलेल्या गाडींत घालून सपाट्यानें गाडी हांकीत घेऊन गेला. इकडे नाटक करणारी व प्रेक्षक मंडळी घुरघुरे खात राहिली !

—एका स्कॉटिश ग्रंथकारानें नुकताच असा एक उल्लेख केलेला आहे कीं, लंडनमध्यें जे लोक राज्य हांकीत आहेत त्यांच्या गोड गोड बोलण्याला कोणीही भाळतां कामा नये. साम्राज्यविस्ताराची जनिकार हांव हें आपल्या सर्वांच्या स्वतंत्रतेला एक मोठें भय आहे. साम्राज्य ह्मणजे जुलमाची सुरवात होय.

That the Irish people should be a free people, with a natural right to govern themselves; that no Parliament is competent to make laws for Ireland except an Irish Parliament sitting in Ireland, and that the claim of any other body of men to make laws for or to govern Ireland is illegal and unconstitutional, and a grievance intolerable to the people of this country. आयरिश लोक हे स्वतंत्र असावेत. स्वतःचा राज्यकारभार स्वतः चालविण्याचा त्यांना नैसर्गिक हक्क आहे, आयर्लंडमध्यें परंतु आयरिश पार्लमेंट खेरीज आयर्लंडकरितां कायदे करण्याला योग्य कोणी नाहीं, सबब आयर्लंडसाठी कायदे करण्याकरितां आणि आयर्लंडवर राज्य करण्याकरितां दुसरी जर एखादी संस्था आपला हक्क बजावीत असेल, तर तो हक्क बेकायदेशीर असून आयर्लंडमधील लोकांना असह्य आहे.

√ क्रॉसिरच्या सगळ्या इंग्लिशांकडून पुष्या केल्या जात नाहींत या गोष्टीला अनुसरून ' मराठा ' सारखीं पत्रें ह्मणत आहेत कीं, We shall never see Justice for India until there is a revolution in India. परंतु डेमोक्रॅटिक लोकांचे अमेरिकेचा मेळावे हे अद्याप आहेत. गयगयीच्या हिंदुस्थानाला हे विचार लागूं नाहींत. हिंदुस्थानातील लोकांना स्वतःच्या आकाशावर व इंग्लिशांच्या वचनावर पूर्ण विश्वास आहे.

विलक्षण गर्भ —पुढ्ढे तेलंगी मावाच्या एका वीस वर्षांचे मुलाचें पोट फोंड झालें कांहीं तरी रोग असेल ह्मणून वरच्या मंडळींनें पुष्कळ दिवस पर्यंत औषधोपचार करून पाहिले तथापि कांहीं गुण पडला नाहीं. आणि दिवसेंदिवस पोट मोठेंच होत गेलें शेवटीं वेदना फारच होऊं लागल्यामुळें त्याला अवदुल मंजालील मोठे हास्पिटलांत आणल्यावर तेथें डाक्टरांनीं ऑपरेशन करून पोट चिरून पाहिलें तेव्हां पोटांतून मुलाचा गर्भ निघाला ! हल्लीं तो मनुष्य हास्पिटलांत असून बहुधा वांचेल असें ह्मणतात.

विलायतेवर सरशी—रंगून येथें मेणबत्त्या करण्याचे कारखाने निघाले आहेत. यांत या मेणबत्त्या विलायतेहून आलेल्या मेणबत्त्यांपेक्षां चांगल्या असतात. या व्यापारी स्पर्धेत विलायती व्यापाऱ्यांचा टिकाव लागणार नाहीं असें ह्मणतात.

साहेबांना अर्धचंद्र — आफ्रिकेंत सर्वत्र युरोपियन लोकांचें वर्चस्व झालें आहे. फक्त मोरोक्कोचें संस्थान तेवढें स्वतंत्र राहिलें आहे. आतां आपलीही घडगत नाहीं असें पाहून सुलतानानें आपल्या संस्थानांतल्या सगळ्या युरोपियन नोकरांना काढून टाकून स्वतः सगळा कारभार पहावयाचा असें ठरविलें आहे.

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आयुर्वेदौषधालय---मुर्डी

व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मानी अ० स० डाक्टर विश्राम रामजी घोले यांनीं आमची औषधें बारकाईनें तपासून हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमची औषधें त्या त्या रोगांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मांसच दिलें आहे हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आह्मी अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टिक, विर्यस्तंभक.
रक्त शोधक, मनोत्साहकांतिवृद्धिवर्धक; सुवर्ण-
मासिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक
वनस्पती मिश्र अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें, तो दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच होणार नाहीं करितां धातु शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोग रहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें. यांच्या सेवनानें नपुंसकत्व स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रिय शिथिलता, कडकी, गर्मी संबंधी पुरलेले विकार, मुत्रसंकोच, धातुचा पातळपण' स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हात, पाय, मुत्रमार्ग, व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशुळ मुर्छाव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तावकार, बाळंतरोग, मधुमेह, जुनाट परमा मुष्टिमैथुनानें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनतें. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची शुद्धि. वृद्धिं, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दुध व अन्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, मुलें व यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीहि घेणारांस टपालखर्च माफ आहे चार रुपयाचे आंत घेणारा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही० पी० नें खालील पत्त्यावर मिळतील.

दरः– एकदम ३५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु०, ११५ गो० ३ रु०, १६५ गो० ४ रु०, २७५ गो० ६ रु०, ५५० गो० १० रु०.

२ अपूर्व नेत्रांजन—यानें वडस, साहरा, फुल, खुपऱ्या, बिंदु, काच, इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरें होऊन दृष्टी तीव्र व थंडगार रहाते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रण– कोणत्याही नवा जुना परमा, व तज्जन्य दाह, तिडीक मुत्राची लाली, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इ. विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ११ भर बाटलीस २ रु०

४ दंतबलवर्धक पूड–दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात. ड. ६ आणे.

५ विंचूंचे विष— औषध लावितांच उतरतें. मुळी ३ तो० ८ आणे.

६ गजकर्ण– खरूज, नायटे वगैरे विकार ३ दिवसांत जातात. ड. ६ आणे.

७ सर्व हिमज्वरांवर– औषध घेतांच कशाही प्रकारचे ज्वर असले तरी तें औषध घेतांच जाऊन पुन्हां उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगवर रामबाण औषध–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं जरूर संग्रह करून तापावर गोळ्या, गांठीस मलम, व वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा यांचा एकवार अनुभव पहावाच. गुणाबद्दल खात्री पटेलच. परोपकारार्थ माफक किं. २ रु. अ. ख. सो.

९ सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवू. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिट आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसव, तेलें, व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोग्यानें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृति मान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

## अत्यंत अगत्याची विशेष सूचना.

हल्लीं वर्तमानपत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती पुढें असून प्रत्येक जाहीरात निंदक लेखांनीं सुशोभित करून त्या तो पुढें येऊं पहात आहे, यामुळें खेर. खोटेपणाबद्दल आमचे अनेक ग्राहक शंसक होतात व तसें होणें रास्तही आहे. हा प्रकार केवळ आपल्या समान विद्यार्थी, आळशी व बेअकली जनांच्यामुळें एकानें जो धंदा सुरू करावा त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें यामुळें अशा जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ० प्रांतात ऊत आलेला असून आमच्या आंजर्ले वगैरे गांवी तर तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक यांची आह्मांस निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे. आह्मांस ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास घोले डाक्टरांनीं सर्टिफिकिट दिले व ज्यांच्या औषधांनीं कोट्यावधी ग्राहक रोगमुक्त झाले व नित्य होत आहेत यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करितां अशाच कायम राहून हा सार्वजनिक कल्याणकारक करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून ऊर्जीतावस्थेस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशही बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावी एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकुल संबंध नाहीं हें लक्षांत ठेवून औषधें मागणें तीं खालील बिनचूक सही व पत्त्यावरच मागवावीं ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य होईल.

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

पत्ता:---मु. मुर्डी, ता. दापोली. जि. रत्नागिरी



# ORIENTAL
## GOVERNMENT SECURITY
LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED.
Established 1874.
Head Office--**BOMBAY**
*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
FUNDS EXCEED
## TWO CRORES AND TEN LAKHS
Claims paid for over One Crore and Fifteen lakhs.
**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life *Assurance*, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER-SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and Khandesh,*

## जाहिरात.

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं,

आमचा विडीचा व्यापार पुष्कळ वर्षांपासून चालू आहे, परंतु आमच्या व्यापारास कमीपणा आणण्याकरितां व माल लोकांस नापसंत होण्याकरितां कांहीं दुष्ट बुद्धीच्या लोकांनीं बऱ्याच खटपटी केल्या त्यापैकीं झीनाभाई बेचरदास मुक्काम मलकापूर प्रांत वऱ्हाड यांनीं आमच्या नांवाचीं खोटीं लेबलें खोट्या मालावर लावून आमचे नांवानें माल विक्री करून बरेच दिवस आपला उदर-निर्वाह केला. परंतु आह्मी त्यास सुमारें सोळा महिन्यापूर्वीं मलकापूर येथें धरून त्याजवर सदर कृत्याबद्दल फौजदारी खटला केला. या कज्जांत त्यास कैद व दंड या प्रमाणें शिक्षा झाली असून त्याच इसमानें पुन्हां तसेंच खोटें काम गेल्या कार्तीक महिन्यापासून सुरू करून माल विक्री करीत होता. करितां त्यास पुन्हां आह्मी मलकापूर येथें पकडून त्याजवर फौजदारी खटला केला त्यांत त्यास तारीख २८ माहे जून सन १९०४ इ० रोजीं सहा महिने सक्त-मजुरी व ?०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा झाली तरी अशीं खोटीं कामें करून माल-विक्री करणारांनीं व आपल्या नांवाचा खोटा माल घेणारांनीं सावध रहावें. तरी आमचे नावाचा माल घेणारे ठोक व्यापारी लोक यांनीं व किरकोळ वगैरे इसम यांनीं सदर ट्रेडमार्क रजिस्टर नंबर व आमचे नांव पाहून माल घेत जाणें.

सही—बाळाराम पुलया द० खु०

सही— गुंडाप्पा नसाप्पा दस्तु

येलप्पा नरसप्पा

शुक्रवारपेठ कामाट पुरा,—पुणे सिटी

---

## जाहिरात

लक्ष लावून एक वेळ वाचा ! वाचा !!

एम. एम् ॲन्ड सन्स

ग्राफर रबर स्टांप मेकर वॉच रीपेरर— आणि स्टेशनरी मरचंट आकोला [वऱ्हाड].

आज पर्यंत कोणत्याही कंपनींनी इमीटेशन रासकोप अपना या नांवाचे घड्या किमतींत विकली नसेल ती आह्मी रुपेय ६ मध्यें ग्यारंटी वर्षे ६ ची देतो आहे. तर त्वरा करावी आणि घड्याळाबरोबर काच, कमान, पेटी आणि याचे बरोबर घड्याळें घेणाराचें नांवाचे रबरी पेनपेनसील स्टांप तयार करून पाठवूं आणि तीन घड्याळें घेणारास व्ही. पी. खर्च माफ व एक डझन घेणारास एक घड्याळ बक्षिस देऊं हे घड्याळ एक वेळ घेतले तर पुनः १० वर्षे पर्यंत व्यावयास नको आणि दुसरे हर एक जातीचें घड्याळ किंवा हर एक जातींचें स्टेशनरी सामान माफक दरानें व सचोटीनें खात्री लायक पाठवूं. या शिवाय रबराचे छाप नांवाचे हर एक जातीचे करून देऊं. आणि रबर स्टांपाच्या नमुन्याकरितां अर्ध्या आण्याचे टिकीट पाठवावे ह्मणजे नमूना फुकट पाठवूं. आणि फोटो काढून घेण्याची ईच्छा असेल त्यांनीं येथें यावें. नाहीं पेक्षां आह्मांस बोलावावें. ह्मणजे आह्मी येऊं. आणि २५ रुपया पेक्षां जास्त माल घेणारास दर रुपयास ०=॥ अर्धा आण्या प्रमाणें कमिशन देऊं. आणि या शिवाय कांहीं विचारावयाचें असेल तर पत्र व्यवहार करावें ह्मणजे उत्तर देऊं. नाहींपेक्षां समक्ष येऊन भेटावें ह्मणजे समजेल. आणि कोणास बायसिकलवर बसायाला शिकणें असेल त्यानीं यावें. शिकविण्या बद्दल फी रुपये १० पडेल. रबरस्टांप करितां हर एक गांवास एजंट पाहिजेत. कमिशन भरपूर मिळेल या सर्व कामाची व सामानाची मागणी करावी ह्मणजे खात्री होईल.

एम्. एम्. ॲन्ड सन्स आकोला

---

## जाहिरात

### स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

थी ग्लोब स्टोअर्स कंपनी.

जनरल मरचन्टस

काळबा देवी पोस्ट

मुंबई.

---

### मुंबई बॅंकची सेव्हिंग्स बॅंक

या बॅंकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षचें १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी पत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.


नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

---

## दांडेकर ब्रदर्स, काळबादेवीरोड--मुंबई





आमचे दुकानीं सर्व प्रकारचे फोनोग्राफ किं. रु. ८ पासून १५०० पर्यंत उत्तम सुरेली ( नरमादी उभ्या व आडव्या सुरांच्या ) स्वदेशी व विलायती हात व पाय हारमोनियम ( वाज्यांच्या पेट्या ) किं. रु. ३० पासून ३५० पर्यंत. सिनेमेटोग्राफ ( सजीव हालचाल करणारीं चित्रें दाखावणारीं यंत्रें ) फोनोग्राफचें सर्व सामान व हारमोनियम पेट्याचे सूर, कांचेचीं बटणें, चांबडें, भाते वगैरे व ब्यूगुल, फ्लूटस ( बांसरी ) विजेसारखा प्रकाश देणारे ग्यासलेट तेलापासून जळणारे दिवे वगैरे सर्व सामान अति स्वस्त दरानें मिळेल. व हारमोनियम व फोनोग्राफ उत्तम रीतीनें रिपेअर करून दिले जातील. रविवर्मा चित्रांचीं फोटो, झिंकोची रमणयि मोठीं पोस्ट कार्डे शेंकडा रु. ०-३-६

आमचे कारखान्यांत रबरी शिक्के उत्तम प्रकारें तयार करून दिले जातील.

---

## जाहिरात

गुण न आल्यास पैसे परत

### परम्यावर रामबाण औषध

शंभरां पैकीं शंभरांस गुण

दोनच दिवसांत हटकून गुण येतो

कसाही जुनाट व नवा परमा खात्रीनें नाहींसा होऊन लघवीची जळजळ व तिडीक एकच भाग घेतल्यानें बंद होते.

किंमत १। रुपया ट. ह. ।≡

पेथील चांदीचीं भांडीं वगैरे पाठ १ रुपयास ०॥ कमिशन.

पत्ताः— एन्. जी. कान्हेर ॲन्ड को.

[ नाशीक सिटी ]

---

### कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु-पेबलनें माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा

ठिकाणा— कॉटन मार्केटा समोर कच्छी बाजार, आकोला.

---

### कापडाचें दुकान

किंमत रोख किंमत रोख

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी सुती माल विक्रीस तयार आहे. व्यापारी लोकांकरितां खालीं लिहिल्यां प्रमाणें नफा ठेविला आहे.

मुंबईचें मालास अर्धा आणा

देशावरील मालास एक आणा

एकदां आमच्या दुकानचा माल घेऊन अनुभव घ्यावा ह्मणजे सचोटीची खात्री होईल.

शा० हरगोवनदास विठ्ठलदास

ठिकाणाः— ग्रेन मार्केट समोर हाशम शेटच्या तीन मजली मकानांत आकोला

( ताजनापेठ )

---

## जाहिरात

अगत्य वाचा अगत्य वाचा

### वैद्यराज पी. सी. जोगळेकर यांचा दवाखाना

आमच्या दवाखान्यांत हरएक प्रकारची इंग्रजी, मराठी व पेटेंट औषधें व ती औषधे तयार करण्यासाठीं लागणारे सामान हे सर्व माफक दरानें विकत मिळण्याची अगदीं उत्तम सोय केली आहे. तसेंच येथें कोणत्याही रोगाची चांगले प्रकारे नाडी परीक्षा करून त्या रोगावर औषध योजना उत्तम रितीनें केली जते. बाहेर गांवचे लोकांनीं प्रकृतीचें मान बरोबर खुलासेवार लिहून कळविल्यास त्यावरून आह्मी त्यांना चांगली खात्रीची औषधें व्ही० पी० नें पाठवूं. रोगपरीक्षेबद्दल एक रुपया फी पाठवावी. आमचे येथें खालीं लिहिलेल्य रोगावर अगदीं रामबाण औषधें आहेत. एकवेळ अनुभविक तडाका पहावा.

रोगांची नावें

तापावर, पांथरीवर, पोटदुखीवर, ओकारीवर, उदरावर, गर्मीवर, जुलाब बंद होण्यास, कपाळदुखीवर, परम्यावर.

वरील रोग कितीही जुनाट व कोण त्याही कारणानें झालेले असोत फक्त सात दिवसांतच चांगला आराम वाटेल. जास्त हकीकत पत्र पाठविल्यास कळवूं.

पी सी. जोगळेकर

वैद्यराज.

आकोला.

---

### शेत—शेतकी आणि शेतकरी

" शेत, शेतकी आणि शेतकरी " या नांवानें पंध्रवड्याचें वर्तमानपत्र सुरू झालें. वर्गणी सालीना सर्व खर्चासुद्धां दीड रुपया पत्ता—बंगला नंबर १९९ रेल्वे स्टेशन नजीक, पुणें.

---

☞ हें पत्र आकोले येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....................२ आणे

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत....१ रु
दर ओळीस............८।०६
दुसरे खेपेस...............८।

All Subscriptions to be paid in advance
Single copy ........................ 2 as

Advertments
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10......3 as
Repetitions Per line...2 as

REGISTERED N. N. 4

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXIX AKOLA MONDAY 27 FEBRUARY 1905 NO 9

वर्ष ३९ आकोला सोमवार तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १९०५ इ० अंक ९

दांडेकर ब्रदर्स, काळकादेवीरोड---मुंबई



आमचे दुकानीं सर्व प्रकारचे फोनोग्राफ किं. रु. ८ पासून १५०० पर्यंत उत्तम सुरेली ( नरमादी उभ्या व आडव्या सुरांच्या ) स्वदेशी व विलायती हात व पाय हारमोनियम ( वाज्यांच्या पेट्या ) किं. रु. ३० पासून ३५० पर्यंत. सिनेमॅटोग्राफ ( सजीव हालचाल करणारीं चित्रें दाखवणारीं यंत्रें ) फोनोग्राफचें सर्व सामान व हारमोनियम पेट्यांचे सूर, कांचेचीं बटणें, चांवडें, भाते वगैरे व ब्यूगुल, फ्लूटस ( बांसरी ) विजेसारखा प्रकाश देणारे ग्यासलेट तेलापासून जळणारे दिवे वगैरे सर्व सामान अति स्वस्त दरानें मिळेल. व हारमोनियम व फोनोग्राफ उत्तम रीतीनें रिपेअर करून दिले जातील. रविवर्मा चित्रांचीं फोटो, शिकोची रमणीय मोठीं पोस्ट कार्ड शेंकडा रु. ०-३-६
आमचे कारखान्यांत रबरी शिक्के उत्तम प्रकारें तयार करून दिले जातील.

## इकडे लक्ष द्या !

सय्यद बद्रुदीन यांचें.
बुक बाईंडींगचें दुकान.
[ आकोला अगरवेस. ]

आमचे दुकानी खालीं लिहिल्याप्रमाणे हरएक प्रकारचे बुकबाईंडींगचें काम मुंबई, कलकत्ता, अलहाबाद, मद्रास येथील नमुन्या प्रमाणें तयार केले जातील.

बुक बाइंडिंगचे दर.

अर्ध्या कापडाचे बायंडिंग २ ते ८ आणे पावेतो.

सबंध कापडाची बायंडिंग आठ आंण्यापासून एक रुपया पर्यंत.

चांमड्याचे बायंडिंग---एक रुपया पासून अडीच रुपया पर्यंत.

फाइल बोर्ड--- ४॥ रु. डजन. आमचे येथें तयार मिळतील.

सदर्हू कामें उत्तम प्रकारचीं केलीं जातील.

पत्ता---सय्यद बद्रदीन बुक बाईंडर
आकोला.

## धर्मार्थ

विंचवावर औषधी

वृश्चिक दंशावर रामबाण व झटपट गूण देणारे १२ मनुष्यांस पुरेल इतकें औषध धर्मार्थ. ट. ह. अर्धा आण्याचें तिकिट पाठवा.

कुलकर्णी कंपनी.
गिरगांव बॅक रोड
मुंबई.

## नोटीस.

नोटीस---बेशमी कोंडी मर्द न्याहा काकडे राहणार पुसला परगणे वरूड ता. मोर्शी जिल्हा उमरावती यांस.

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तुह्मा जवळ स्थावर जिनगी मौंजे उराड येथील शेत सर्वे नंबर १४८ एकर २३८१८ आकार रु. ३३ आणि पुसला येथील राहतें घर व कोटा व जंगम जिनगी ह्मैस १, वगारा २, बैल २, वंडी १, असे असून त्या सर्व इस्टेटीचा उपभोग तुह्मी घ्यावा. पण आतां असें कळते कीं, दुसऱ्या कांहीं आतांच्या व इतर लोकांच्या नादी लागून तुह्मी इस्टेटीची वाताहत मांडली आहे. तसें करण्याचा अधिकार तुह्मास नाहीं. कैलासवासी न्याहा काकडे यांचे वेळीं इस्टेटीस कर्ज वगैरे कांहीं नव्हते. सध्यांही कोणतेंच कोणाचें कर्ज नाहीं, तुह्मीं अन्नवस्त्र वगैरे जिवात जीव आहे तों पर्यंत वरील जिनगींतून करीत जावे. इत्यादि सर्व कारणे लक्षांत ठेवून तुह्माला स्थावर किंवा जंगम जिनगीची अफरातफर आमचे परवानगी शिवाय करण्याची सक्त मनाई आहे. या संबंधाने जो कोणी तुमच्याशीं जिनगीच्या खरेदी, फरोकी, किंवा कर्जा संबंधानें व्यवहार करील ती रद्द होऊन तो फसेल इतकेच नाहीतर जो कोणी वारसाच्या नात्यानें जिनगीवर आपला हक्क दाखवील तोही रद्द केला जाईल करितां या नोटिशीनें कळवितो कीं, तुह्मी वरील स्थावर व जंगम जिनगीचें मृत्युपत्र खरेदी, गहाण, फरोक, वगैरे व्यवहार इस्टेटी संबंधानें करूं नये व कोणी करून घेवूं नये केल्यास या नोटिशीनें रद्द केलें जाईल कळवें. ता. १८ माहे फेब्रुवारी सन १९०५ इ.

( सही ) पंढो वल्लद पुंजाजी काकडे जात कुणबी राहणार पुसला नि. खुद्द

## नोटिशीचे उत्तर

बेशमी गदाधर श्रीधर जहागिरदार मौंजे अडगांव यांसः---

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, आपण ता. १६।१।०५ च्या वऱ्हाडसमाचारांत दिलेली नोटीस पावली. त्यास उत्तर कीं:- आसादेवीचे आह्मी मुखत्यार होतों पण मुखत्यारपणानें आह्मी क्वचित प्रसंगींच काम करीत होतों. आणि जेव्हां जेव्हां त्यांचेसाठीं मीं काम केलें तेव्हांचे तेव्हांच त्याचा हिशोब आसाबाईस समजावून दिला. असो. असादेवीची कोणचीच मिळकत आह्मांपाशीं नाहीं. या उपर जर तुह्मा फिर्याद कराल तर सर्व खर्च मात्र तुह्मापासून घेतला जाईल कळावें. ता. १८-२-०५ इ०

सही
गणेशीलाल मुसदीलाल गौड ब्राह्मण
राहणार अडगाव दस्तुर खुद्द.

## नोटीस.

१ दळीरामसा रतनसा २ व्यंकटसा रतनसा रंगारी पातुरडे तालुका जळगांव जिल्हा अकोला यांसः-

खालीं सही करणार इजकडून नोटिशीनें विनंती करण्यांत येते कीं, तुमचेकडेस माझे जेठ मारुतीसा भवानसा यांची खाते बाकी रुपये ५९८३८३ एकोणसाठ रुपये तीन आणे तीन पै रतनसा सोनांसा या नांवानीं सुमारें १०-१२ वर्षांची आहे. तुह्मी माझे सख्खे बंधू असूनही व मागितले असतांही रुपये दिले नाहीत. दर तिसऱ्या वर्षी दाम दुप्पट मानानें ९४७। नवसें सत्तेचाळीस रुपये चार आणे बारा वर्षाला होतात. तर इंग्रजी कायदा मुदत न दाखवितां पित्यास ऋण मुक्त करावे. कन्येचा पैसा बुडविण्यांत नर्काची प्राप्ती असते असें शास्त्र आहे. रकम देऊन पावती घ्यावी. ता. २२।२।०५ इ०

सहीची निशाणी
पार्वती भ्रतार तुकारामसा रंगारी बाळापूर निशाणी बांगडी दस्तुर तुकारामसा भवानसा रंगारी
बाळापूर ( पेठ )

## नोटीस

तोताराम वल्लद जानू सोनार राहणार आंत्री प्रगणे बाळापूर ता. मलकापूर जि. बुलढाणें यांस.

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न झाल्या नंतर माझे आईबापांनीं दोन वेळा तुमचे घरीं आणून घातले परंतु मला न वागवितां तुह्मी टाकून दिले आहे. दोन वर्षांपासून मी वयांत आली आहे. तरी तुह्मी मजला वागवीत नाहीं करितां मजला येथें कर्ज काढून निर्वाह करावा लागतो. या करितां झालेलें कर्ज रुपये २०० दोनशें ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत कर्ज देऊन मजला घेऊन जावे. मी संसार करण्यास तयार आहे. मुदती प्रमाणें वर्तन न झाल्यास मी हीच फारकत समजून दुसरा वरठाव करीन. मग तुमचा मजवर कोणतेच प्रकारचा हक्क राहणार नाहीं. कळावें ही नोटीस दिली ता. २१।२।१९०५ इ.

( सही )
भागी मर्द तोताराम सोनार हल्लीं मुक्काम पिंप्रीगोळी ता. मलकापूर जि. बुलढाणें नि. बांगडी.

## नोटीस

नोटीस बेशमी शेख दगडू वल्लद महंमद यासीन मुसलमान मौंजे धोत्रा नाइकाच प्रगणे डोंगरसेवळी तालुके चिखली जिल्हा बुलढाणें यांसः---

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, आमची खरेदी मालकिची शेतें मौंजे धोत्रा येथील शेत सर्वे नंबर १० एकर गुंठे ९०१७ आकार रुपये २॥। व मौंजे हिवर प्रगणे आंबडापूर येथील सर्वेनंबर ३४ एकरगुंठे २४८२८ आकार रुपये १२ ही दोन्हीं शेतें सालोम तुह्मास बटाईनें दिलीं होतीं त्याची मुदत संपली आतां सदरहू शेतें आह्मी बटाईनें देण्यास इच्छीत नाहीं करितां दोन्हीं नंबर आमचे ताब्यांत देऊन पावती घ्यावी. स्वामित्वानें वाहत असल्यास दोन्हीं शेतांचें स्वामित्व रुपये ३०० तिनशे देणें लागतील, कबूल असेल तर कबुलायत लिहून द्यावी. जर तुह्मी शेतें आमचे ताब्यांत दिली नाहीं तर तुह्मास स्वामित्व कबूल आहे असें समजून आह्मी त्या शेताची लागवण करणार नाहीं. नोटिशीचा खर्च तुह्मास देणें लागेल. कळावें. तारीख १७-२-१९०५ इ०

सही
कडापा शिवापा आपा मिटकरी
राहणार धोत्रा दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ८ शके १८२६

## आपला शिक्का
### ( अनुकरणाचें रहस्य )

आपले लोकांत अवल्या दृष्टीनें पाश्चिमात्य गोष्टींचें सर्वस्वी अनुकरण करूं लागले आहेत ही गोष्ट खरी नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्र आपल्यावर राज्य करितें आहे आणि तदनुसार तिकडचेच विचार, कल्पना व आचार हींच नित्यशः आपल्या डोळ्यापुढें खेळत आहेत व त्यांचाच व्यासंग सदा सर्वकाळचा आपणांस घडत आहे. अर्थात अशा स्थितींत पाश्चिमात्य प्रवाहा बरोबर आपण वाहात गेलों तर मोठा दोष घडला असें ह्मणतां येत नाहीं. कारण पुष्कळ गोष्टींत आपला निरुपायच होत असतो. तरी आपलेपणा ह्मणून जो कांहीं एक विशेष आहे त्यास आपण अनोळखी व परकी होतां कामा नये. आपलेपणाची अशी कांहीं तरी विशिष्ठ खूण आपल्या सर्व कार्यांत असली पाहिजे. दुसऱ्यांच्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण करणें ह्मणजे कांहीं वाईट नाहीं परंतु तें अनुकरण करण्यांत आपल्या राष्ट्रीयत्वाचा छाप त्यावर मारण्यास आपण विसरतां कामा नये.

आपली स्वभाषा ही शब्दसंपन्न व अर्थ संपन्न करणें हें आपलें काम आहे. तिच्यांत ती संपन्नता अंगभूत नाहीं ह्मणून तिचा त्याग करावा व दुसऱ्याच भाषेचा अवलंब करावा ही गोष्ट उचित नव्हे. आपली भाषा आपणच संपन्न केली पाहिजे व ती करणें ह्मणजे दुसऱ्या भाषांतील शब्द आपल्या भाषेच्या मुशींत ओतून त्यांचा व आपल्या भाषेचा एकजीव केला पाहिजे. त्या शब्दांमधील परकीयत्वाचा विटाळ घालविण्यासाठीं आपल्या भाषेची दीक्षा त्यांस दिली पाहिजे. ज्याप्रमाणें एखाद्या अन्य धर्मीय मनुष्यास ख्रिस्ती करावयाचें असल्यास त्यांस बाप्तिस्मा घालावा लागतो तद्वत् परकीय भाषांमधील शब्दांना आपल्या स्वभाषेंत घ्यावयाचें असल्यास त्यांच्या पूर्वजन्मांच्या दोषप्रक्षालनार्थ आपल्या भाषेची संथा त्यांस देऊन त्यांस शुद्ध करून घ्यावें. अशी शुद्धता प्राप्त झाल्यावर त्यांस आपल्या भाषेंत यथेष्ट नांदण्यास कोणचीच हरकत नाहीं. अशा या प्रायःश्चित्ताच्या शास्त्रानें आपल्या भाषेस परकीयांचा विटाळ न होतां ती शुद्धसत्व राहील, त्यांत भेसळ होणार नाहीं आणि इतर भाषेंतील शब्दांस आपल्या भाषेच्या जातींत येण्यास प्रत्यवाय न राहिल्यामुळें आपल्या भाषेची शब्दशक्ती व अर्थशक्ती या बहुगुणित होतील. भाषा ह्मणजे एक महान् राष्ट्रच होय. ज्या प्रमाणें राष्ट्रांत हजारों लोक पाहिजेत, पुष्कळसे विद्वान् विचारी, महात्मे, पंडित, शास्त्रज्ञ, धनाढ्य कुसबी कारागीर आदिकरून नाना गुणमंडितांचा समाज पाहिजे तद्वत् भाषेच्या रहाशींत सर्व अर्थबोध करणाऱ्या शब्दांची विपुलता पाहिजे. राष्ट्राचें शक्तिसामर्थ्य व कर्तृत्व त्या राष्ट्रांतील लोकांच्या गुणसमुच्चयावर पारखावयाचें असतें. तसेंच भाषेची सुसंपन्नता, श्रीमंती व थोरवी हीं तिच्या राज्यांत स्वैर वागणाऱ्या नाना अर्थव्यंजक शब्दसमूहावर ओळखावयाची असते. आपली भाषा ही प्रौढ, भारदस्त व अर्थप्रचुर करावयाची असल्यास आपण तिच्या शब्दभांडारांत होईल तितकी भर घातली पाहिजे. ही भर घालणें ह्मणजे दुसऱ्या भाषेंतील संपत्ती लुटून आपल्या भाषेच्या जामदारखान्यांत आणून ठेविली पाहिजे. हाच एक विहितमार्ग आहे. दुसऱ्याच्या भाषेंतील आपण मुळींच घेणार नाहीं तर आपल्या भाषेची वाढ खुंटून जाईल व कालांतरानें इतर भाषांशीं झुंझ घेतांना आपली भाषा निर्जीव ठरेल. अर्थात् आपल्या भाषेंत दुसऱ्या भाषेंतील शब्दांना मज्जाव होतां कामा नये. फक्त ते शब्द जशींचे तसेच कोरे करकरीत न घेतां त्यांच्या डोक्यावर आपल्या भाषेचा मोर्तब ठाकावा ह्मणजे मग चलनी नाण्या प्रमाणें त्यांस आपल्या व्यवहारांच्या वापरांत घेण्यास हरकत नाहीं. आपल्या राष्ट्रीयत्वाच्या खुणेची रेघ प्रत्येकाचे माथ्यावर ओढल्या खेरीज दुसऱ्याचें अनुकरणानें कांहीं एक घेऊं नये. हीच स्वत्वाची खूण प्रत्येकानें आपल्या मनाशीं पटवावी.

## दुष्ट स्वप्न

लोकवार्ता पुष्कळ वेळां खरी ठरते, कधीं तिच्यामध्यें सत्याचा उल्लेख अंशतः होतो. आणि क्वचित् प्रसंगीं ती निराधार व खोटी पडते. अशा या त्रिविध लोकवार्तें संबंधानें अनुमान काढीत बसणें फार फायद्याचें असतें. हीं अनुमानें पुष्कळ प्रसंगीं मार्गदर्शक होतात व त्यांच्या पासून कित्येक मनोरंजक, लाभकारक व भविष्यवादी गोष्टी शिकण्या सारख्या असतात. लोकवार्ता पुष्कळदां खऱ्या ठरतात आणि ह्मणूनच अशी ह्मण पडली आहे कीं, 'जें पिकतें तेंच विकतें.' अशी बोलवा आहे कीं, आमच्या मुनसिपालिटीचे अष्टविध कारभार सरकार आपल्याच हातीं घेणार आहे व मुनसिपालिटीच्या दरवाजाला कुलूप लावण्याचा विचार आहे. असा हा विचार येथील सभासद मंडळीच्या अपात्रतेमुळें अमलांत देणार आहे असें ह्मणतात. स्थानिक स्वराज्याच्या अधिकाराला आमच्या लोकांची पात्रता नाहीं आणि ह्मणूनच येथील मुनसिपालिटीचे अधिकार कांहीं काळ पावेतों रद्द करावेत असा लोकांच्या बोलण्याचा भावार्थ दिसतो.

ही बातमी खरी किंवा खोटी याच्या संबंधानें आह्मापाशीं कोणताच आधार नाहीं. पण तिची चर्चा करावी अशी मात्र मोठी उत्कंठा वाटते. अशा दुष्ट स्वप्नाची शहानिशा केल्या शिवाय मनाला स्वस्थताच वाटत नाहीं. येथील मुनसिपालिटी नवीन कर बसवीत नाहीं व नव्या करा संबंधानें तिची गती वादविवादा पलिकडे जात नाहीं ह्मणून सरकार आपलेंच सत्ता चालवूं इच्छित आहेत असें लोक बोलतात. येथील मुनसिपालिटीत वकिलांची संख्या मोठी आहे ही गोष्ट देखील वर वरच्या सरकारी अधिकाऱ्यास आवडत नाहीं असें ऐकतों. नामदार चीफ कमिशनर साहेबांचा अभिप्राय असा बनलेला दिसतो कीं हें शहर मोठें भरभराटीचें आहे तरी लोकांस नवे कर बसवून घेण्याची इच्छा नाहीं. स्वल्प कालांतच आमच्या शहरीं नवीन करांची अंमलबारी सुरू होईल अशी आमची खात्री आहे पण ही गोष्ट मुनसिपालिटीच्या द्वारानें पद्धतशीर घडून येते किंवा सरकारी वटहुकूमानें एकदम घडून येते याची प्रचिती पहावयाची आहे. पाणीपट्टीचा कर बसविण्याचा विचार म्युनिसिपालिटीनें केला होता पण तो विचार बहुमता विरुद्ध असल्यामुळें नाजूस ठेवावा लागला.

आमच्या मुनसिपालिटीचा पूर्व इतिहास फार रम्य व वर्णनीय आहे. स्थानिक स्वराज्याचा स्पृहणीय उत्कर्ष या मुनसिपालिटींत दिसून येईल असें आमचें ठाम मत आहे. मतभेदा मूळें आमच्या या संस्थेच्या कार्याला चांगलें तेज आलें आहे. सरकारी वर्ग व बिन सरकारी वर्ग अशा येथें दुफळ्या नाहींत. वादविवादाची मर्यादा कधींच उल्लंघण्यांत आलेली नाहीं. व वादविवादा मुळें कृतीचा लोपही कधीं झालेला आमच्या पाहण्यांत नाहीं. उलटोत्तर आमच्या दृष्टीनें येथील मुनसिपालिटी मुनसिपल कारभारच काय पण प्रसंग पडल्यास सर्व जिल्ह्याचा अधिकार चालवूं शकेल या विषयीं कोणासही शंका येणार नाहीं. तंटा जेव्हां पडतो तेव्हां तो सरकारी इच्छेचा भंग होतो ह्मणून पडतो असें आह्मांस वाटत नाहीं. सदिच्छा सर्वजणांचीच असते पण तिच्या कार्यक्रमाच्या मार्गा विषयीं द्विधाभाव दृष्टीस पडतो पण अशा भिन्न भावामुळें मूळचा संकल्प दूषित न होतां चांगल्या रितीनेंच तो पार पडतो असा अनुभव आहे. या अनुभवांत कधींच विपरीत भाग आह्मांस दिसून आलेला नाहीं. असा खरा प्रकार असून जर आमच्या मुनसिपालटीचा गौरव करावा असें सरकारास वाटणार नाहीं व एखादा भलताच हुकूम अमलांत येईल तर आह्मी असें ह्मणूं कीं, मुनसिपालिटींतील सद्गृहस्थांनीं अशा संस्थेंत राहूंच नये आणि आजपर्यंतचा रमणीय इतिहास यथाकाल आटोपतां घरावा. आह्मी उमेद धरितों कीं, वरील दुष्ट अफवा खोटी होईल व निराशे मुळें आमच्या मनानें सुचविलेला तीरस्थपणाचा किचा वळवावाही लागणार नाहीं.

## स्वराज्यप्राप्ती

म्युनिसिपालिटी गांवास असणें ह्मणजे त्या शहराचें तें एक मोठें भूषण असून सरकारा कडून लोकांस प्राप्त झालेला हा एक मोठाच हक्क होय असें समजतात. ह्या अधिकाराची थोरवी 'स्थानिक स्वराज्य' या गोड शब्दांनीं गाण्याचा जुना प्रघात आहे. ह्या मोठेपणाच्या नांवास भुलून तिच्या संप्राप्तीची लोकांस मोठी हाव सुटते व तिच्यासाठीं ते नाना प्रयत्न करून तो साध्य करून घेतात. अप्राप्य वस्तु प्राप्त झाली ह्मणजे मनास मोठा आनंद व भूषण वाटणें सहाजिक आहे. परंतु

॥ जगीं मोठेपणा नाहीं सुखा सार्थी ॥

ही महोक्ति पक्की ध्यानांत ठेविली पाहिजे. मोठेपणा बरोबर एक मोठी थोरली जबाबदारी अंगावर येऊन पडते आणि त्या मोठेपणाचा आनंद व गौरव हीं त्या जबाबदारीच्या काळजींत विरून जातात. हीच स्थिती सध्यांच्या आकोल्याच्या मुनिसिपालिटीची आहे. आज इतकीं वर्षें ह्या लोकसंस्थेनें जो उत्कृष्ट कारभार चालवला त्याचें परिमार्जन ह्या म्युनिसिपालिटीचा हक्क काढून घेण्यांत होतें कीं काय अशी मोठी भीति वाटत आहे. ह्याच प्रसंगास मलकापूर शहरास म्युनिसिपालिटीचा अधिकार एप्रिलपासून मिळणार आहे असें आनंदाचें वर्तमान ऐकूं येत आहे. मलकापुराची भरभराटी होत आहे व त्यास म्युनिसिपालिटी मिळावी अशा बद्दल तेथील लोकांचे पुष्कळ दिवसांचे प्रयत्न व त्यांस सरकारी अधिकारी मंडळींची मिळालेली सहाय्यता हीं सुफळ झाली ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. सध्यांचीं स्थानिक स्वराज्यें ह्मणजे नामधारी स्वराज्यें होत व तीं नेहमीं जीवितसंशयांत असतात ही जबाबदारी ओळखून मलकापूर म्युनिसिपालिटी आपला मोठेपणा संभाळून राहील अशी आह्मांस उमेद आहे.

## दिल दुखी

परवांच्या कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाचें प्रसंगीं लार्ड कर्झन साहेबांनीं जें भाषण केलें तें पुष्कळांस आवडलें नाहीं इतकेंच नाहीं तर त्या संभाषणामुळें लोकांचीं मनें दुखावलीं गेलीं आहेत. आपली सर्वस्वी नापसंती दर्शविण्यासाठीं आणि विरुद्ध लोकमत जाहीर करण्यासाठीं मुद्दाम कलकत्यास पुढील १० व तारखेस जाहीर सभा भरणार आहे. युनिव्हर्सिटीच्या पदवीदानाचे प्रसंग दर वर्षाच्या वर्षास येत असतात व मामुली प्रमाणें गोड भाषण होऊन समारंभाची यथासांगता होत असते. कर्झन साहेब हे मोठे वक्ते असून यांची वाणी फार मधुर आहे. परंतु या प्रसंगीं त्यांच्या त्या अमृतमय वाणींतून लोकांच्या अंतःकरणास झोंबतील असे कटू शब्द कसे आले या बद्दल सर्वांस मोठें आश्चर्य वाटत आहे. कर्झनशाही ह्मणजे मोठमोठ्या चळवळींची कारकीर्द होय. या रहाशींत लोकांस भयभीत करून सोडणाऱ्या गोष्टी घडून आल्या आहेत. लॉर्ड साहेब प्रथम जेव्हां आले तेव्हां त्यांच्या बद्दल लोकांस मोठी उमेद वाटत होती पण ती सर्व उमेद चार दोन वर्षांच्या अवधींत खचून गेली. जर कोण त्या कारकीर्दींत लोकमताची पायमल्ली झाली असेल तर ती ह्या कारकीर्दींत होय. लाट साहेबांनीं लोकांची नाराजी फार केली आहे. आणि परवांचें भाषण हें त्यांचेंच एक उदाहरण होय.

मुलांना उपदेश दाखल कर्झन साहेबांनीं 'सत्य भाषणाचा' अमोलिक धडा शिकविला आहे. हा भाषणाचा विषय मोठा अप्रासंगिक व समयास अनुचित असा होता, इतकेच नाहीं तर ह्या भाषणाच्या ओघांत लाट साहेबांनीं हिंदुस्थानच्या लोकांवर तोंडपुजे, स्तुतीपाठक, असत्यवादी इत्यादि जे वृथा आरोप केले त्यामुळें तो उपदश विषयुक्त शल्या प्रमाणें लोकांच्या हृदयांत बसला. पदवीदाना सारख्या मंगलप्रसंगीं अशा बीड येणाऱ्या शब्दांचा उपयोग व्हावा व तोही खुद्द मुत्सदी म्हणून नाणवेलेल्या कर्झन साहेबांच्या कडून व्हावा हा प्रमाद लहानसान नव्हे. लोकांनीं पदवीदान समारंभाच्या भाषणाविषयीं आपलें विरुद्ध मत जाहीर करण्याची मुद्दाम खटपट करावी असा हा अशुभ प्रसंग युनिव्हर्सिटीच्या इतिहासांत प्रथमचाच होय.

असो. मुंबई युनिव्हर्सिटीच्या पदवीदानाचे प्रसंगीं पदवीधरांना डा. मॅकिकन यांनी जो उपदेश केला त्यांत वरील प्रमाणें कटुता भरली नव्हती हें भाग्यच होय. त्यांच्या उपदेशाचा सारांश असा होता कीं, कोणीहि उतावीळपणानें, सर्व गोष्टींची पुरती शहानिशा केल्या खेरीज आपलें ठाम मत बनवूं नये. तुमच्यावर आतां मोठी जबाबदारी आली आहे व ती आळखून तुह्मी वागलें पाहिजे. आपल्या महत्वाकांक्षा व उमेदी सर्व सफलच होतील असें नाहीं तरी मनुष्यानें आशापूर्ण असणें फार चांगलें. दररोज हजारों घडामोडी व चमत्कार घडत आहेत. संशोधना व शास्त्रीय शोध यांनीं अगम्य ज्ञानभांडाराची मुख्य किल्ली आपल्या हातांत देऊन आपणांस त्या ज्ञानाची गोडी लावून दिली आहे. अशा या शोधांच्या युगांत राहाणें ही एक मोठी गोष्ट आहे त्यांत प्राविण्य मिळविणें ही त्याहांपेक्षां मोठी गोष्ट होय; आणि सर्वांत मोठी गोष्ट म्हटली म्हणजे ह्या सर्व घडामोडींत सत्यस्वरूपी महान शक्तीचा अदृश्य हस्त आहे हें समजणें होय.

तिबेट मिशननें तिबेट देश कसा काबीज केला व आपलें वर्चस्व तेथें कसें प्रस्थापित केलें याचा इतिहास सर्वश्रुतच आहे. तिबेटच्या लढाईचा खर्च कोणी द्यावयाचा या प्रश्नाचा निकाल बहुतेक लागल्या सारखाच आहे. एकट्या हिंदुस्थानाच्या हितासाठीं ही लढाई मारली असल्या कारणानें हा सर्व खर्च एकट्या हिंदुस्थानावर लादण्यांत येणार आहे. लढाईचें रणवाद्य सुरूं झाल्यापासून हिंदुस्थानच्या लोकांनीं ही लढाई नको म्हणून एकसारखी सरकारच्या कानाशीं ओरड केली होती पण त्यांच्या हाकेस कोण भीक घालतो ! सरकारच्या अनियंत्रित सत्तेपुढें कोणाचें काय चालतें ! सरकारला साम्राज्याची हाव अनिवार असल्याकारणानें त्यांनीं तिबेटवर लढाईचा मोर्चा फिरवला आणि गरीब तिबेटी लोकांची एकदांची पादाक्रांती केली.

तिबेट देश आपल्या देखरेखी खालीं राहावा हें राज्यधोरण कर्झन साहेबांनीं पक्कें ठरविलें होतें. रशियन साम्राज्याची लाट जी पूर्वेकडे येत होती ती कदाचित हिंदुस्थानच्या उत्तर सरहद्दी पर्यंत भेऊन थडकेल अशा दूरवरच्या विचारानें कर्झन साहेबांनीं हें शांततेचें मिशन मुद्दाम पाठविलें होतें. ह्या मिशनचा मुख्य हेतु ब्रिटिश साम्राज्याची बळकटी होय व यासाठीं जो खर्च झाला तो सर्व साम्राज्यातील प्रजाजनापासून वसूल केला पाहिजे. परंतु हिंदुस्थानानेंच हा सर्व खर्च दिला पाहिजे असें म्हणणें म्हणजे हा एक इंग्रजी कुटिल राजनीतिचा मासलाच होय. गरीब हिंदस्थानावर जुलूम करून पैसा काढणार नाहीं तो वेडा असा हा सध्यांचा मनु आहे. जितका पैसा सरकार मागतील तितका पैसा प्रजेला द्यावा लागणार यांत अंतर नाहीं. लोकांच्या जवळ दुःखोवेगानें मोठा उसासा टाकण्यापेक्षां जास्त कांहीं उरलें नाहीं. त्यांनीं आपली मान सरकारच्या हातीं दिली आहे व सर्व हवाला त्यांजवर टाकला आहे. या उपर ते तारोत वा मारोत त्याचें पापपुण्य त्यांच्याच डोक्यावर.

निरोप

वऱ्हाड प्रांताचे शेवटचे अलिशान रेसिडेंट नामदार लेफ्टेनंट कर्नल सर डी. डब्ल्यू. के. बार के. सी. एस. आय. हे होत. यांची सरकारी चाकरी या महिन्याच्या अखेरीला संपूर्ण झाली व पहिल्या मार्च पासून ते पेनशनदार होत आहेत. निजाम सरकारच्या दरबारांत सर बार साहेबांस मोठमोठ्या मेजवान्या होत आहेत आणि त्यांचा निरोप घेण्याचे समारंभ सध्यां चालू आहेत. या साहेबांची आठवण पुष्कळ वर्षें राहील किंबहुना वऱ्हाडावर नव्या स्थानिक सरकाराचा अंमल यांच्याच मुत्सदीपणाचें सुफल आहे असें आह्मी पक्कें स्मरण ठेवूं. सर बार साहेब हे केवळ वऱ्हाडच्या राज्यकारभारातील क्रांतीला निमित्तमात्र कारणीभूत झाले. राजकीय गोष्टी एक दोन दिवसांत घडून येत नसतात. त्यांची मांडणी व घटना पुष्कळ काला पासून चालू असते आणि हे पूर्व प्रयत्न परिपक्वतेला येत चालले म्हणजे लार्ड कर्झन सारखे कर्तृत्ववान मुत्सदी राजकीय क्रांती जलदी घडवून आणितात. ब्रिटिश सरकाराला वऱ्हाडप्रांत मिळाला, त्यांचें जुने मनोरथ सफल झालें व भिजत पडलेला प्रश्न एकदांचा चांगला निकालास लागला हें पुष्कळ अंशीं बरें झालें. हैदराबाद दरबाराशीं असलेला आमचा संबंध तुटला तेव्हां ती क्रांती आह्मांस आवडला नाहीं तरी पण ही आवड नावड दुःखोद्गागा पाठीकडे थोडीच जावयाची असते. आतां आह्मी नव्या अंमलाखालीं रूळत चाललों आहों अणि ईश्वर कृपेनें अधीक सुखाचा भाग्योदय नवीन अंमलाखालीं होईल अशा आशेनें मनाचें मोठें समाधान केलें आहे. वऱ्हाडाला ही नवीन राजकीय स्थिती सर बार साहेब यांच्या कारकर्दीत आली ह्मणून पुनः त्यांचें अभिनंदन करून आह्मी त्यांचा शेवटचा निरोप घेतो आणि ते विलायेतस परत गेल्या नंतर त्यांच्या विश्रांतीचा काल त्यांस सुखद होवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

## युद्धाचें कथानक

रुसो—जपानी युद्धाचा पेटलेला वणवा अजि बात विझल्या सारखा दिसतो; इतकेंच नाहीं तर रशियानें तहाचें बोलणेंहि सुरूं केलें आहे आणि थोड्याच अवकाशांत बरा वाईट असा तहनामा होऊन या युद्धाची परिसमाप्ती होईल असा अदमास आहे. सध्यां वाद फक्त एकाच बाबतींत आहे. जपान लढाईचा खर्च मागत आहे व रशिया तो देण्यास तयार नाहीं. तरी हो ना करितां करितां शेवटीं जपानच्या ह्मणण्याप्रमाणेंच रशियास होकार भरावा लागेल यांत शंका नाहीं.

रशियानें हा तह करण्याचा जो घाट आणिला आहे तो कांहीं सुखानें होत आहे असें थोडेंच आहे; परंतु रशिया मोठ्या पेंचांत सांपडला आहे. दाही दिशांनीं आकाश फाटून तें कोसळूं लागलें आहे. आणि अशा निर्वाणीच्या स्थितींत त्यास गत्यंतरच राहिलें नाहीं. रशियाची जी ही आज मानखंडना होत आहे ती त्याच्या मनांत एकसारखी डाचत राहील. आणि वेळ पाहून तो त्याचें पुरें उट्टें काढल्या शिवाय स्वस्थ राहणार नाहीं. अर्थात हा होणारा तह फार दिवस टिकणारा नव्हे.

रशियाची अंतःस्थिती दिवसानुदिवस मोठी भयंकर होत आहे वेळींच उपायांची योजना अमलांत आली नाहीं तर कोणत्या थरास गोष्ट पोहोंचेल हें सांगतां येत नाहीं. दंगे धोपे व संप यांस तर ऊत आला आहे. रक्तपाताचीं व राज्यक्रांतीचीं जीं दुष्ट चिन्हें मावळत चाललीं आहेत असें वाटत होतें, तीं स्पष्टतर दिसूं लागलीं आहेत. सर्व लोकांची ओढ राज्यक्रान्ती घडवून आणण्याकडे दिसत आहे. याच मुळें रुसो—जपानी युद्धाचें तोंड सध्यां मिटलें आहे. तरी आपसांत जी यादवी रशियन लोकांनीं माजविली आहे तिच्या हलकल्लोळा कडे सर्व राष्ट्रांचे डोळे लागले आहेत.

## सुदैवाची कहाणी

गेल्या आठवड्यांत येथें सेशन कचेरी भरली होती. तामखा नांवाच्या एका बाळापूरच्या मुसलमानावर खुनाचा खटला चालला होता. यथाशास्त्र सर्व खटला आटोपून दुसरे दिवशीं निकालाची सुनावणी व्हावयाची होती. परंतु त्या खुनी मनुष्याचें नशीब मोठ्या जोरावर होतें. शौचास जाण्याच्या निमित्तानें त्यानें जो पोबारा केला तो केलाच ! शिपायाच्या हातावर त्या बहादरानें चांगलीच तुरी दिली यांत शंका नाहीं. धांवाधांव करून पुष्कळ तपास झाला पण त्याचा पत्ताच लागला नाहीं. खुनी मनुष्य शिपायांच्या तावडींतून निसटून जाण्याची गोष्ट क्वचित् प्रसंगींच घडून येते ! त्या चोराचें धारिष्ट, चपलाई व युक्ती हीं खरोखर आश्चर्यानें तोंडांत बोट घालण्यास लावण्या सारखींच होत. मीवाशीं बेतलेल्या संकटांतून बिचारा अचानक सुटला !

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— सांप्रतचें हवामान फार क्षणिक व चमत्कारिक झालें आहे. दोन दिवस चांगली थंडी पडली होती व एकाएकी दोन दिवस ऊन कडक पडूं लागलें व दोन ऋतुमधील संधीचा काल येत आहे असें वाटलें व भावी ग्रीष्माचा पूर्व रंग या दृष्टीनें हें ऋतुमान उग्र दिसलें. परंतु पुन्हां अकस्मात सोसाट्याचा वारा सुटला आकाश अभ्रानीं संव्याप्त झालें, विजा चमकूं लागल्या, व कित्येक ठिकाणीं पर्जन्य वृष्टी झाली, गारा पडल्या व वृक्ष उलथून पडले. सध्यां अकालीं पावसाचीं चिन्हें दृग्गोचर होत आहेत. अर्थात् रोगराईस हें हवामान बरेंच मानवेल असें अनुमान आहे.

रा. रा. महमद यासीनखान डिपुटी कमिशनर वर्ग १ ला हे हैद्राबादकडे होते पण चालू वर्षापासून त्यांची चाकरी मध्यप्रांताच्या सरकाराकडे बदलण्यांत आली आहे. त्यांस सध्यां दोन वर्षांची फर्लो रजा दिली असल्यामुळें विद्यमान व्यवस्था तशाच कायम ठेवण्यांत आल्या.

वऱ्हाडांत ३८ हायकोर्ट वकील व ८७ दुय्यम प्रतीचे वकील मिळून १२९ वकिलांस चालू सालासाठीं सनदा देण्यांत आल्या.

आलिशान नामदार चीफ कमिशनर सर लेली यांनीं या प्रांताची पाहणी पुरी केली व ते परवां सायंकाळीं जबलपुरास जाऊन पोहोंचले.

**हरास**— आकोला जिल्ह्याचे अपकारीचे हरास येत्या बुधवारीं व गुरुवारीं येथें होणार आहेत.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें २४। | चांदी ७६ |
| जवारी ४६–४९ | जवस ९९ |
| गहू काठे ६० | बनशी ८९ |
| सरकी | ९०२ |
| तूप | १०॥ रु. मण |
| तेल | ९ रु. मण |
| रुई | रु. १४॥ |
| कपाशी | ३९ |

## वर्तमानसार

**विलक्षणच**—कांहीं दिवसांपूर्वी कलकत्त्यांतील एका नाटक मंडळीनें सुधारकांची मस्करी करण्याच्या हेतूनें एक नाटकप्रयोग करून त्यांत पुढल्या शतकांतला एक पुरुष दाखवला होता. तो असा कीं, त्याची स्त्री शिक्षणालंकृत होऊन अनेक सार्वजनिक व सामाजिक कार्यांत गुंतल्यामुळें तिचें गर्भारबाळंतपणाचें काम तिच्या त्या नवऱ्यानें घरीं राहून पत्करलें होतें ! हा प्रकार कसाहि असो; पण हैद्राबादच्या 'विजयवैभव' पत्रानें नुकतीच एक अशी बातमी प्रसिद्ध केली आहे कीं, तेथें तेलंगी जातीच्या एका वीस वर्षांचे शूद्र पोरास पोटांत गर्भ राहिला असून सध्यां तो त्याला फारच दुर्वह झाल्या कारणानें डाक्तरानें पोट चिरून तो बाहेर काढला ! तेथील दवाखान्यांत तो बाळंत मनुष्य अद्याप जिवंत आहे ह्मणतात.

विडीनें प्राण हानी—मुंबईस एकजण दरवाजा बंद करून निजल्या निजल्या विडी पीत असतां ठिणगी अंथरुणावर पडून जळून मेला.

नवेंच मत—लॅन्सेट पत्रामध्यें चार्लस साहेब लिहितात कीं, तंबाखू खाणारे व पिणारे लोकांची प्रकृति सुदृढ असते.

लग्नाची चमत्कारिक तऱ्हा—अमेरिकेंत न्यूयार्क स्टेटमध्यें एका गृहस्थाचें दुसऱ्या एका गांवच्या स्त्रीशीं लग्न व्हावयाचें होतें; पण क्वारंटाइनमुळें या गांवांतल्या माणसाला त्या गांवांत जाऊं देईनात. तेव्हां त्यानें दोन फोनोग्राफ आणविले, व एकांत आपले प्रश्न भरून पाठविले, व दुसरा कोराच पाठविला. वधूनें त्या प्रश्नांचीं उत्तरें दुसऱ्या फोनोग्राफमध्यें भरून पाठविलीं. आणि हे पाद्रीभटाच्या समक्ष केल्यामुळें त्यांचें लग्न सशास्त्र ठरलें.

औदार्य—ना. आगाखान हे अलिगड कॉलेजमध्यें आरबी भाषेंतल्या ग्रंथांचा संग्रह करण्यासाठीं ६००० रुपये देणार आहेत. त्याचप्रमाणें आरबी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं १५०० रुपयांची वार्षिक स्कालरशिप देणार आहेत.

मजेची गोष्ट—कोल्हापूरचे येथे झालेले मागी सरकार यांस त्यांच्या दिवाणांनीं सांगून ठेविलें होतें कीं, कोणी युरोपियन गृहस्थ आला असतां उभें रहात जावें. एके प्रसंगीं गव्हर्नर साहेबांचा दरबार भरला असतां महाराजही त्या दरबारांत होते. इतक्यांत दरबार हॉल मध्यें एक लष्करी गोरा शिपाई आला. महाराज दिवाणांच्या सांगीप्रमाणें सोजीर आलेला पाहून एकदम उभे राहिले ह्मणून नामदार गव्हरनर साहेबही उभे राहिले. गव्हर्नर साहेब उभे राहिल्या वरून सर्व दरबार उभें राहिलें! हा प्रकार तरी काय आहे ह्मणून नामदार गव्हरनर साहेबांनीं बारीक चौकशी केली. चौकशी अंतीं त्यांस सर्व गूढ समजलें.

दुधाची पूड—एक प्रकारें दुधाची पूड बनविण्याची युक्ति निघाली आहे. या युक्तीनें कोणत्याही देशांतील दूध कोणत्याही देशांत स्वल्प खर्चानें विक्रीसाठीं पाठवितां येईल.

देवी काढणें बरें नाहीं—मुंबईच्या सर्व रहिवाशांस देवी काढिलेल्या असाव्या असा नियम आहे, परंतु नुकतेंच एका युरोपियन गृहस्थानें, मी वनस्पत्याहारी आहे. तेव्हां माझ्या लहान मुलाच्या रक्तांत दुसऱ्या प्राण्याच्या अपवित्र रक्ताची भेसळ न करण्याची परवानगी मिळावी, अशी कोर्टास विनंती केल्यावरून त्यास वरील नियम लागू नसावा असें ठरविण्यांत आलें आहे. देवी काढण्याच्या विरुद्ध सध्या इंग्लंडांत फार चळवळी चालू आहेत.

विलक्षण सर्कस—मुंबईस हल्लीं एक सर्कस आली आहे. तींत घोडे, सिंह, वाघ, हत्ती, मांजरें, उंदीर हीं खुशाल परस्परांशीं मैत्रीनें वागतात. वाघ घोड्यावर बसतो, सिंह हत्तीवर स्वारी करितो व मांजर उंदरास खेळवितें.

देणगी.—बनारसच्या हिंदु कॉलेजांत मदत देण्याकरितां नागपुरच्या लोकांनीं वर्गणीची यादी काली दादा साहेब चिटनवीस यांनीं या कामी १००० रु. दिले रावबहादूर बामनराव कोल्हटकर यांनीं २०० रुपये दिले, व इतर अनेक लोकांकडून नाहीं तरी सुमारें १९०० रुपयांचें आंकडे पडले.

पंचाईत पडली—भरतखंडांत २९ अमेरिकन स्त्रियांनीं इंग्रज सरदाराशीं लग्नें केलीं. पैकीं दहाजणींना संतति झाली नाहीं व सहांना मुले नाहींत या मुळें आतां पुढें अमेरिकन स्त्रिया इंग्रजांना मिळतील किंवा नाहीं या विषयीं एका इंग्रजी पत्रकर्त्याला शंका वाटत आहे.

### पदवी रद्द केली

गिलगिटचे राजेसाहेब महमद अकबरखान यांस बहादूर ही पदवी देण्यांत आली होती. परंतु त्यांनीं कांहीं दुर्वर्तन केल्यामुळें त्यांची ती पदवी काढून घेण्यांत आली आहे. 'दुर्वर्तन केलें' ह्मणजे काय केलें हें समजलें असतें तर बरें झालें असतें. दिलेली बहुमानाची पदवी रद्द होणें हा अपमान लहान सहान नाहीं.

एका वकिलास शिक्षा—अलाहाबाद येथील हायकोर्टांतील एका वकिलाची कायद्याविरुद्ध काम करण्याबद्दल दोन वर्षांपुरती सनद काढून घेण्यांत आली. ह्या वकिलावर असा आरोप होता—काम चालवीत असतां एका साक्षीदारानें आपल्या कुळाच्यावतीनें खोटी साक्ष दिल्याचें त्यास आढळून आल्यावरून त्याजवर खटला चालविण्याची त्यानें परवानगी घेतली. परवानगीची मुदत संपण्यापूर्वीं सदर्हू वकील साक्षीदाराच्या घरीं गेला व अमुक रकम दिल्यास मी खटला काढून घेतों असें सांगू लागला. त्यावरून त्या साक्षीदारानें त्या वकिलाला एक हजार रुपये दिले व तो खटला जिरवून टाकला. तेवढ्या रकमेनें वकिलाची समाधानी न झाल्यामुळें हा खटला उघडकीस आला. सदर्हू खटल्याबद्दल आपण अगदीं सौम्य शिक्षा देत आहों असें जज्ज ह्मणाले.

### जाहीर नोटीस.

या नोटिसीनें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यात येतें कीं माझी मुलगी नामे बकू मर्द रावजी राहणार मौजे अंबोडा ता. आकोट इजला मौजे खुदावंदपूर येथील सरवई नंबर २ एकर गुंठे १९-३१ आकार रुपये ५०-१०-९ याचे खाते अमीन व० निवाजी बारी याचे नावांनीं असून त्यांतील नऊ रुपयांची जमीन माझी स्वतःची कांहीं विशेष शर्तीवर व अटीवर व्यवस्था करण्यासाठीं बक्षीस दिली होती पण ती व्यवस्था करण्याची मजला कांहीं जरूर न राहिल्यामुळें वरील बक्षीसपत्र तसेंच रद्द राहिलें आहे. सदरहु नऊ रुपयांची जमीन आज पावेतो माझे ताब्यांत असून मीच तिचा आजपावेतो उपभोग घेत आहे. वरील बक्षीसपत्राचे आधारें कांहींच अमलबारी झाली नाहीं करितां सर्वांस जाहीर करण्यांत येतें कीं वरील बक्षीस पत्राचे आधारें कोणीही कोणत्याच प्रकारचा देवघेवीचा व्यवहार करूं नये केल्यास तो बातल समजला जाईल ही जाहिरात दिली. कळावें ता. २२।२।०५ इ०

सही

हिरामण वल्लद लक्ष्मण केदार
राहणार आकोट गची आड
निशाणी खुद्द हातची.

## जाहिरात

तमाम लोकांस या जाहिरातीनें कळविण्यांत येतें कीं माझ्या भावाची ह्मणजे गणपतीची बायको नामे सिराई इनें माझा मुलगा गंगाराम यास दत्तक घेतलें होतें. पण त्यास तिनें घरा बाहेर काढून दिलें आहे व तिनें त्या सर्व इस्टेटीची अफरातफर मांडली आहे. करितां तिजपासून कोणीही गहाण, खरेदी, बक्षिस कांहीं घेऊं नये. व तिला कर्ज देऊं नये. तिला कोणचाही व्यवहार करण्याची कायद्यानें मनाई आहे. व तिच्याशीं जो कोणी असा व्यवहार करील तो फेसल व सर्व जबाबदारी त्याजवर राहील. सबब या जाहीर खबरीनें कळवीत आहे. कळावें ता. २२।२।०५

सहीची निशाणी
मारुती टगळाजी कान्हेरकार
राहणार जवळ निशाणी
खुद्द हातची रेघ

### नोटीस.

बेसमी सिराई मर्द गणाती कान्हेरकार राहणार जवळ ता. खामगांव पोस्ट शेगांव यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, तुह्मी माझा धाकटा मुलगा गंगाराम यास दत्तक घेतलें होतें. परंतु आतां तुह्मी त्यास घरांतून काढून दिलें आहे व आपली इस्टेट विकून किंवा गहाण, बक्षीस करून तिची विल्हेवाट व बरबादी करण्याचा तुमचा मानस दिसतो तर आपण तसें कांहीं करूं नये ह्मणून मुद्दाम कळवीत आहे. तुह्मांस इस्टेटीवर कर्ज काढण्याची मुळीं गरज नाहीं. तुह्मास मेरे तावातकाल अन्नवस्त्र देण्यास मी तयार आहे. तुह्मी जिवंत आहा तों पर्यंत त्या इस्टेटीचा सुखानें उपभोग घ्यावा. ती सर्व इस्टेट दत्तक मुलाची ह्मणजे गंगारामची आहे. तुह्माला इस्टेटी संबंधानें कोणचाहि व्यवहार करण्याची कायद्यानें मनाई आहे. या उपर व्यवहार केल्यास तो बातल समजला जाईल कळावें. ता. २२-२-०५ इ०

सहीची निशाणी
मारुती टगळाजी कान्हेरकार
राहणार जवळ याचे
हातची रेघ

### नोटिसीचा जबाब

रा. दुलीचंद ओंकारदास मालक श्यामलाल ओंकारदास साहु दुकान खामगाव यांस:—

खालीं सही करणार असें कळवितों कीं तुह्मी मजला शुद्धवऱ्हाडी छापखान्यांतून आज १-१॥ महिना झाला नोटीस दिली होती कीं, आमचे मुखत्यार मळगाव येथें येऊन त्यांनीं तुह्मास दुकानचा चार्ज समजून घेतला असतां तुह्मी दिला नाहीं, व तुह्मास तुमचे असलेले कुलमुखत्यारपत्र नोटीस दिले तारखे पासून रद्द केलें आहे ह्मणून मजकुरा बद्दल नोटीस व जाहिरात दर लिहि त्या पत्रांत असल्याबद्दल परस्पर समजलें आहे. सबब या नोटिसीनें तुह्मास मी असें कळवीत आहे कीं, तुमचे मुखत्यार आलेले हे आम्हास बेअब्रू करून अपमान करण्याचे कामीं पाठविले होते किंवा दुकानचा चार्ज मागण्यास आले होते याजबद्दल खुलासा आपणाकडुन झाला नाहीं. दुसरें आलेले गुमास्ते यास तुम्ही चार्ज द्यावा अशा बद्दल आपले पत्रही आम्हास दिलें नाहीं त्यांत आम्ही चार्ज समजून देण्यास कोणतेही तऱ्हेनें नाकबूल नाहीं परंतु आमचे पगासाचे पैसे आपणाकडे रुपये १५० दीडशें निघत आहेत ते तुह्मी देऊन चार्ज घ्यावा, व असें माझें ह्मणणें आहे कीं रुपये नवकरीचे घेत रयां शिवाय तुह्मास मी कांहीं समजत नाहीं ह्मणून सांगितलें होतें. यांत माझा कांहींच अपराध नसतां लोकांचे सांगण्यावरून आपण मजला नोटीस व जाहिरात दिली हे आपले सारखे मोठे मनुष्यास योग्य नाहीं. कारण मीहि आज १७-१८ वर्षांपासून तुमचा नौकर असोन कुलमुखत्यार आहे. असो. तुह्मास या लेखावरून असें कळवितों कीं, तुह्मी माझे नवकरीचे दाम रोख देऊन आपला चार्ज समजून घ्यावा नाहीं तर यापुढें तुमचा मी जबाबदार नाहीं हे पक्के समजावें. कळावे ता. १४।२।१९०५ इ.

दस्तुर गोविंद गुरुपोलस

( सही )
विठु वल्लद रामजी माळी बेलांडकार
राहणार मळगांव.

## जाहिरात.

### हिंदुस्थानांतील सर्व व्यापाऱ्यास विनंती

घडी, रेशमी पागोटी, मंदील, सुती व रेशमी कांड, सतरंजी, पटके, बरदार, दुपटे माल सुती हातविणकरीचा कसोसीनें खरेदी करून पाठवूं. रकम आगाऊ आल्यास अडत दरशेकडा १ रुपया घेऊं. किरकोळ खर्च निराळा. औषधी लागल्यास रोख निमे आल्यास बाकीचे व्ही. पी. नें पाठवूं. एकवेळ तरी मागवून अनुभव घ्या. सुखकर व फायदेशीर ठरल्यास पुन्हा मागवा असें सांगावयास नको.

पत्ता— तुकारामसा भवानसा रंगारी बाळापूर पेठ, जिल्हा आकोला प्रांत वऱ्हाड.

## जाहिरात.

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, आमचा विडीचा व्यापार पुष्कळ वर्षांपासून चालू आहे, परंतु आमच्या व्यापारास कमीपणा आणण्याकरितां व माल लोकांस नापसंत होण्याकरितां कांहीं दुष्ट बुद्धीच्या लोकांनीं बऱ्याच खटाटी केल्या त्यापैकीं झिनाभाई बेचरदास मुक्काम मलकापूर प्रांत वऱ्हाड यांनीं आमच्या नांवाची खोटी लेबलें खोट्या मालावर लावून आमचे नांवानें माल विक्री करून बरेंच दिवस आपला उदर-निर्वाह केला. परंतु आह्मी त्यास सुमारें सोळा महिन्यापूर्वीं मलकापूर येथें धरून त्याजवर सदर कृत्याबद्दल फौजदारी खटला केला. त्या कामांत त्यास कैद व दंड या प्रमाणें शिक्षा झाली असून त्याच इसमानें पुन्हां तसेंच खोटें काम गेल्या कार्तीक महिन्यापासून सुरू करून माल विक्री करीत होता. करितां त्यास पुन्हां आह्मी मलकापूर येथें पकडून त्याजवर फौजदारी खटला केला त्यात त्यास तारिख २८ माहे जून सन १९०४ इ० रोजीं सहा महिने सक्तमजुरी व ९०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा झाली तरि अशीं खोटीं कामें करून माल-विक्री करणारांनीं व आमच्या नांवाचा खोटा माल घेणारानीं सावध रहावें. तरी आमचे नावाचा माल घेणारे ठोक व्यापारी लोक यांनीं व किरकोळ घेणारे इसम यांनीं सदर ट्रेडमार्क रजिस्टर नंबर व आमचे नांव पाहून माल घेत जाणें.

सही—बाळाराम पुलया द० खु०

सही— गुंडाप्पा नसाप्पा दस्तु

येलप्पा नरसप्पा

शुक्रवारपेठ कामाट पुरा,—पुणे सिटी

## जाहिरात

लक्ष लावून एक वेळ वाचा ! वाचा !!

एम. एम् अॅन्ड सन्स

ग्राफर रबर स्टांप मेकर वॉच रीपेरर— आणि स्टेशनरी मरचंट आकोला [वऱ्हाड]

आज पर्यंत कोणत्याही कंपनींनी इमीटेशन रासकोप अगर या नांवाचे घोड्या किंमतींत विकली नसेल ती आह्मी रोख ६ मध्यें ग्यारंटी वर्षें ६ ची देतो आहे. तर त्वरा करावी आणि घड्याळाबरोबर काच, कमान, पेटी आणि याचे बरोबर घड्याळें घेणाराचे नांवाचे रबरी पेनपेनसील स्टांप तयार करून पाठवूं आणि तीन घड्याळें घेणारास व्ही. पी. खर्च माफ व एक डझन घेणारास एक घड्याळ बाक्षिस देऊं हे घड्याळ एक वेळ घेतले तर पुनः १० वर्षे पर्यंत ध्यावयास नको आणि दुसरे हर एक जातीचें घड्याळ किंवा हर एक जातीचें स्टेशनरी सामान माफक दरांनें व सचोटीनें खात्री लायक पाठवूं. या शिवाय रबराचे छाप नांवाचें हर एक जातीचें करून देऊं. आणि रबर स्टांपाच्या नमुन्याकरितां अर्ध्या आण्याचे टिकीट पाठवावें ह्मणजे नमूना फुकट पाठवूं. आणि फोटो काढून घेण्याची ईच्छा असेल त्यांनीं येथें यावें. नाहीं पेक्षां आह्मांस बोलावावें. ह्मणजे आह्मी येऊ. आणि २५ रुपया पेक्षा जास्त माल घेणारास दर रुपयास ८॥ अर्धा आण्या प्रमाणें कमिशन देऊं. आणि या शिवाय कांहीं विचारावयाचें असेल तर पत्र व्यवहार करावें ह्मणजे उत्तर देऊं. नाहींपेक्षां समक्ष येऊन भेटावें ह्मणजे समजेल. आणि कोणास बायसिकलवर बसायाला शिकणें असेल त्यानीं यावें. शिकविण्या बद्दल फी रुपये १० पडेल. रबरस्टांप करितां हर एक गांवास एजंट पाहिजेत. कमिशन भरपूर मिळेल या सर्व कामाची व सामानाचा मागणी करावी ह्मणजे खात्री होईल.

एम. एम्. अॅन्ड सन्स आकोला

## जाहिरात

### स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.

जनरल मरचन्टस्

काळबा देवी पेठ

मुंबई.

## मुंबई बॅंकची सेव्हिंग्स बॅंक

या बॅंकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई बॅंक
आकोला ३।७।०३ } J. Kinniburgh
एजंट

मंत रा. सा. मल्लापाअण्णा वारद,
सोलापूर—यांनीं अनुभव घेऊन पसंत केलेल्या

## वक्षेकृत कफनाशक गोळ्या.

लहान मुलांस कफ दाटून श्वास लागतो, खोकला येतो, कफ थुंकतां येत नाहीं, दूध किंवा अन्न खावेनासें होऊन मुलें घाळ पडतात, ज्याला—

सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, मुंबई हे पण यांचे वापरीत आहेत.

### पोटांतलें, डबा, सुशी,

असें ह्मणतात; त्यांवर अगदी इजा न होतां खातरीनें

### दोन तासांत गुण देणाऱ्या

डॉ. देशमुख M.D. मुंबई यांनीं उपयोग क- रून पसंत केल्या आहेत.

अनेक डॉक्तर, वैद्य यांच्या वीस वर्षांच्या अनुभवानें आबालवृद्धादि सर्वांस सारख्या उपयोगी ठरलेल्या.

अनुपान कागदासह
५ गोळ्यांचे कुपीस ।- रु.
२५ „ „ १ रु.
१०० „ „ २

रोखीनें अगर व्हा. पे. पार्सलनें मिळतील. ग्राहकांचा पत्ता पोष्टाचे नांवासह सुवाच्य असावा. व्यापाऱ्यांस कमिशन मिळतें त्याचा ठराव समक्ष अगर पत्रद्वारें करावा.

मालक—वि. शि. वर्दे, सावंतवाडी.

## जाहिरात

गुण न आल्यास पैसे परत

परम्यावर रामबाण औषध

शंभरां पैकीं शभरांस गुण

दोनच दिवसांत हटकून गुण येतो

कसाही जुनाट व नवा परमा खात्रीनें नाहींसा होऊन लघ्वीची जळजळ व तिडीक एकच माग घेतल्यानें बंद होते.

किंमत १। रुपया ट. ह. ।=

येथील चांदीचीं भांडी वगैरे पाठ १ रुपयास ०॥ कमिशन.

पत्ताः— एन्. जी. कान्हेरे अॅन्ड को. [ नाशीक सिटी ]

## कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु-पेबलनें माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागजी भाई लध्धा

ठिकाणा— कॉटन मार्केटा समोर कच्छी बाजार, आकोला.

## कापडाचें दुकान

किंमत रोख किंमत रोख

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी सुती माल विक्रीस तयार आहे. व्यापारी लोकांकरितां खालीं लिहिल्या प्रमाणें नफा ठेविला आहे.

मुंबईचे मालास अर्धा आणा
देशावरील मालास एक आणा

एकदां आमच्या दुकानचा माल घेऊन अनुभव घ्यावा ह्मणजे सचोटीची खात्री होईल.

शा० हरगोवनदास विठ्ठलदास

ठिकाणाः— ग्रेन मार्केट समोर हासम सेठच्या तीन मजली मकानांत आकोला ( ताजनापेठ )

## जाहिरात

अगत्य वाचा अगत्य वाचा

### वैद्यराज पी. सी. जोगळेकर यांचा दवाखाना.

आमच्या दवाखान्यांत हरएक प्रकारची इंग्रजी, मराठी व पेटेंट औषधें व ती औषधे तयार करण्यासाठीं लागणारे सामान हे सर्व माफक दरानें विकत मिळण्याची अगदीं उत्तम सोय केली आहे. तसेंच येथें कोणत्याही रोगाची चांगल्या प्रकारे नाडी परीक्षा करून त्या रोगावर औषध योजना उत्तम रितीनें केली जातें. बाहेर गांवचे लोकांनीं प्रकृतीचें मान बरोबर खुलासेवार लिहून कळावल्यास त्यावरून आह्मी त्यांना चांगली खात्रीची औषधें व्ही० पी० नें पाठवू. रोगपरीक्षेबद्दल एक रुपया फी पाठवावी. आमचे येथें खालीं लिहिलेल्या रोगावर अगदीं रामबाण औषधें आहेत. एकवेळ अनुभविक तडाका पहावा.

रोगांची नांवें

तापावर, पांथरीवर, पोटदुखीवर, ओकारीवर, उदरावर, गर्मीवर, जुलाब बंद होण्यास, कपाळदुखीवर, परम्यावर.

वरील रोग कितीही जुनाट व कोणत्याही कारणानें झालेले असोत फक्त सात दिवसांतच चांगला आराम वाटेल. जास्त हकीकत पत्र पाठविल्यास कळेल.

पी सी जोगळेकर
वैद्यराज.
आकोला.

## शेत—शेतकी आणि शेतकरी

"शेत, शेतकी आणि शेतकरी" या नांवाचें पंध्रवड्याचें वर्तमानपत्र सुरू झालें. वर्गणी साळीना सर्व खर्चासुद्धां दीड रुपया पत्ता—बंगला नंबर १९९ रेल्वे स्टेशन नजीक, पुणें.

☞ हें पत्र आकोले येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

ॐनमः श्रीगणेशाय.

## आर्यवैद्यौषधालय--मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ० स० डाक्टर विश्राम रामजी घोले यांनीं आमची औषधें नारकाईनें तपासून हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत आहून आमची औषधें त्या त्या रोगांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मांसच दिलें आहे हें अवश्य लक्षांत ठेवावें.

अशी अत्यंत खात्रीच्या औषधांचा गण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तजक, व पौष्टिक, विर्यस्तंभक.
रक्त शोधक, मनोत्साहकांतिवुद्धिवर्धक; सुवर्ण.
माक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक
वनस्पती मिश्र अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें, तो दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारिरिक सौख्याचा खरा काम मुळींच होणार नाहीं करितां धातु शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोग रहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें. यांच्या सेवनानें नपूंसकत्व स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रिय शिथिलता, कडकी, गर्मी संबंधी पुरलेले विकार, मुत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हात, पाय, मुत्रमार्ग, व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशुळ मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मधुमेह, जुनाट परमा मुष्टिमैथुनानें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनतें. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची शुद्धि. वृद्धि, वर्यिस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दुध व अन्न भरपूर पचूं लागते. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, मुलें व यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर किंतीहि घेणारांस टपालखर्च माफ आहे चार रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही० पी० नें खालील पत्त्यावर मिळतील.

१ दरः- एकदम ३५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु०, ११५ गो० ३ रु०, १६५ गो० ४ रु०, २७५ गो० ६ रु०, ५५० गो० १० रु०.

२ अपूर्व नेत्रांजन—यानें वडस, रांझरा, फुल, खुपऱ्या, बिंदु, काच, इत्यादि नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार रहाते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळयाच्या डबीस १ रु०

३ परमापीर अपूर्व मिश्रण- कोणत्याही नवा जुना पर्मा, व तज्जन्य दाह, तिडीक मुत्राची लाली, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इ. विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १॥ भर बाटलीस २ रु०

४ दंतबलवर्धक पूड–दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात. ड. ६ आणे.

५ विंचूंचें विष— औषध लावितांच उतरतें. मुळी २ तो० ८ आणे.

६ गजकर्ण- खरूज, नायटे वगैरे विकार ३ दिवसांत जातात. ड. ६ आणे.

७ सर्व हिमज्वर–औषध घेतांच कशाही प्रकारचे ज्वर असले तरी तें औषध घेतांच जाऊन पुन्हां उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगवर रामबाण औषध–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं जरूर संग्रह करून तापावर गोळ्या, गांठीस मलम, व बात चढू नये ह्मणून बातावर मात्रा यांचा एकवार अनुभव पहावाच. गुणाबद्दल खात्री पटेलच. परोपकारार्थ माफक किं. २ रु. अ. स. सो.

९ सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फक्त पाठवु. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिट आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसव, तेलें, व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोगीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृति मान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

## अत्यंत अगत्याची विशेष सूचना.

हल्लीं वर्तमानपत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक जाहिरात लोक इतरांना सुशोभित करून जो तो पुढें येत आहे, यामुळें खरे. खोटेपणाबद्दल आमचे अनेक ग्राहक सांशक होतात व तसें होणें रास्तही आहे. हा प्रकार केवळ आपला समाज निरुद्योगी, आळशी व बेअकली बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरू करावा त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें यामुळें अशा जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ० प्रांतात ऊत आलेला असून आमच्या आंजर्ले वगैरे गांवी तर तो पुर्णावस्थेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक यांची आह्मांस निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं इग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्यास त्यास तो स्वतंत्र आहे. आह्मांस ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास घोले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिले व ज्यांच्या औषधांनीं कोट्यावधी ग्राहक रोगमुक्त झाले व नित्य होत आहेत यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करितां अशाच कायम राहून हा सार्वजनिक कल्याणकारक करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उत्तरोत्तर उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशही बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावी एकवार अनुभवानेंच खात्री होईल. इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें लक्षांत ठेवून औषधें मागणें ती खालील बिनचूक सही व पत्यावरच मागवावीं ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य होईल.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः---मु. मुर्डी, ता' दापोली. जि. रत्नागिरी

## ORIENTAL
### GOVERNMENT SECURITY
LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED.
Established 1874.
Head Office--**BOMBAY**
*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
FUNDS EXCEED

## TWO CRORES AND TWENTY FIVE LAKHS
Claims paid for over One Crore and Twenty lakhs.

### IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality

UNQUESTIONABLE SECURITY

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured

The Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

No man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
Chief Agent
*for C. P. Berar and Khandesh*